
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २१२२

# संयुक्त सोशलिस्टच का?

## मधु लिमये



REFBK-0018170

1-00

POPULAR PRAKASHAN

REFBK-0018170

निबंध 2922

# सार्वत्रिक निवडणुकीची पार्श्वभूमी व संयुक्त सोशलिस्ट पार्टीची भूमिका

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.
अनुक्रम ७५८२८ - वि: निबंध
क्रमांक २९२२ नोंः दिः ३।३।५७
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ग्रंथालय समृद्धी योजना १२७०
१८७६०

केंद्रीय व राज्य पातळीवर भारताचा कारभार कोणी चालवावा, याचा कौल स्वतंत्र भारतातील पंचवीस कोटी मतदार १९६७ च्या फेब्रुवारी महिन्यात देतील. आझादीच्या गेल्या वीस वर्षांत काँग्रेसला अमर्यादित सत्ता सतत भोगता आली खरी, पण या वेळी प्रथमच विरोधकांच्या जबरदस्त आव्हानास तोंड देण्याची पाळी सत्ताधारी पक्षावर आलेली आहे. काँग्रेसची प्रतिष्ठा आता साफ धुळीस मिळाली आहे. ही निवडणूक काँग्रेस जिंकू शकेल काय, आणि शिवाय देशापुढील विविध समस्या काँग्रेस सोडवू शकेल काय, या संबंधीच्या नाना शंका-कुशंकांनी काँग्रेसचे निष्ठवान पाठीराखेही बेजार झाले आहेत. आमदारकी-खासदारकीच्या तिकीट-वाटपावरून चाललेली वाचावाची व असंतुष्ट काँग्रेसजनांच्या राजीनाम्यांची मालिका या दोन गोष्टींमुळे काँग्रेसची जनतेवरील पकड ढिली झाली आहे. राज्यशकट वाहू शकणाऱ्या एखाद्या लोकप्रिय पुढाऱ्याच्या अभावी, काँग्रेसी नेतृत्व निवडणुकीतील यशाबद्दल कमालीचे साशंक बनलेले आहे. लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात काँग्रेस इतकी नामोहरम झाली की लोकसभेतील आपले मताधिक्य किमान ६०–७० जागांनी घटेल असा कबुलीजबाब काँग्रेसचे नेते देऊ लागले आहेत. 'काँग्रेस सिंडीकेट 'मधील एक सदस्य तर चक्क म्हणाला की लोकसभेच्या ५२० जागांपैकी तीनशेच जागा आता काँग्रेसच्या वाट्याला येतील.

अगदी जवाहरलाल नेहरूंच्या दिवसांतही काँग्रेस पक्षाला एकूण मतदानात सरळसरळ मताधिक्य कधी मिळवता आले नाही. ४५–४६ टक्के मतदानाच्या जोरावर काँग्रेस पक्ष सुमारे ७० टक्के जागा मिळवून आला याची तीन प्रमुख कारणे सांगता येतील. एक तर आपली निवडणूक पद्धत मतदान व त्याच्या जोरावर मिळणाऱ्या जागा यांचा योग्य परस्पर संबंध प्रस्थापित करत नाही. राजकीय पक्षांची मोठी संख्या व आपापसात निवडणूक समझौता करण्यात त्यांना येणारे अपयश ही आणखी दोन कारणे.

पण काँग्रेसच्या शक्तीस जाणारे तडे व सद्यःस्थितीत बदल व्हावा अशी जनतेची तीव्र आकांक्षा या दोन गोष्टींमुळे विरोधी पक्षांना मताधिक्य मिळण्यास व त्याच

प्रमाणे त्यांनी बिगर काँग्रेसी शासन स्थापण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झालेली आहे. पण मोठ्या दुर्दैवाची गोष्ट अशी की या महान संधीचा फायदा उठविण्यासाठी आपापसात नवा मिलाफ व नवी सुसूत्रता आणण्यात विरोधी पक्ष यशस्वी झालेले नाहीत, व एकसंघ असलेले विरोधी पक्षही दुभंगले आहेत.

समाजवादी ऐक्याच्या प्रयत्नास मर्यादितच यश मिळाले. समाजवादी ऐक्याच्या नव्या एकसंघ पक्षातून म्हणजेच संयुक्त सोशलिस्ट पार्टीतून फुटून निघण्याचा निर्णय काही मंडळींनी घेतलाच !

कम्युनिस्ट पार्टी वरपासून खालपर्यंत दुभंगली. पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश व इतर काही राज्यांत, मतदार-संघांचे वाटप करण्याचा प्रश्न हे दोन कम्युनिस्ट पक्ष सोडवू शकले नाहीत. यासंबंधी लवादाची सूचनाही फेटाळली गेली.

स्वतंत्र बुद्धीच्या उपक्रमशीलतेला वाव देण्यासाठी आपण पक्ष स्थापला, असे स्वतंत्र पार्टीचे म्हणणे. सरकारचे काटेकोर नियम व भरमसाट कर यांच्या बंधनातून मानवी उद्योगशीलतेस मुक्त करावे हे स्वतंत्र पार्टीचे उद्दिष्ट असले तरी आज या पक्षाचे रूपांतर एका सरंजामशाही पक्षात झाले आहे. जनतेस उद्योगप्रिय माणसांच्या पक्षांचे आकर्षण फारसे वाटणार नाही ही जाणीव स्वतंत्र पार्टीच्या नेत्यांना झाली व निवडणुकीत जनतेचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळविण्यासाठी सरंजामशाहीस पक्षात स्थान देण्याचा मार्ग त्यांनी अवलंबिला. स्वतंत्र पार्टीस आपल्या ताकदीवर व आपल्या विचारसरणीवर जनतेत स्थान मिळविता आले नाही व म्हणूनच जुन्या राजामहाराजांवर तिची मदार संपूर्णपणे आहे. स्वतंत्र पार्टीतील हे राजेमहाराजे व ‘ आधुनिक ’ विचारसरणीचे नेते यांचे कुठेकुठ आपापसात जमत नाही. रामगढच्या राजानें काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यावर स्वतंत्र पार्टीची बिहार-शाखा नामशेषच झाली. (राजेसाहेबांचे काँग्रेसमध्येही बिनसल्यामुळे आपल्या साऱ्या अनुयायांसह त्यांनी नुकतीच काँग्रेसही सोडली.)

आपला पक्ष एकसंघ राखण्यात जनसंघास तेवढे यश आलेले दिसते. उत्तर व वायव्य भारतात जनसंघाचे काम वाढले असले तरी पूर्व भारतात किंवा नर्मदेपलीकडील दक्षिण भारतात हा पक्ष मूळ धरू शकलेला नाही.

फाटाफुटीने व मतभेदांनी दुभंगलेल्या विरोधी पक्षांचे चित्र आज हे असे आहे ! जनकाँग्रेसच्या निर्मितीमुळे या निराशाजनक परिस्थितीचा अधिकच विचका झाला आहे. राष्ट्रनिष्ठेचा नवा दृष्टिकोण काँग्रेस पक्ष जनतेस देऊ शकत नाही, तर विरोधी पक्ष काँग्रेसची जागा बळकावू शकत नाहीत. याचा अनिष्ट परिणाम असा झाला आहे की जात, धर्म, भाषा व संस्कृती यांच्या पारंपारिक निष्ठा उफाळून आल्या आहेत. विरोधकांतील सैद्धांतिक तत्त्वांवर आधारलेला बेबनाव तर आज भारतात असंबद्ध व निरर्थक ठरतो. परदेशी बड्या राष्ट्रांचा प्रभाव व त्यांच्या

पैशाचा हस्तक्षेप यांमुळे विरोधकांत नवे मतभेद भडकवले गेले आहेत. विचारवंतांनाही स्तिमित करेल असे हे आजचे राजकीय चित्र आहे व चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीची पार्श्वभूमी ही अशी आहे.

अशा या परिस्थितीत संयुक्त सोशलिस्ट पार्टी मतदारांना कोणती दिशा दाखवते व कोणते मार्गदर्शन करते ?

संयुक्त सोशलिस्ट पार्टी क्रांतिकारक आर्थिक–सामाजिक परिवर्तन, राष्ट्रीय ऐक्य व लोकशाहीवादी स्वातंत्र्य यांना वाहिलेली आहे. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसचा पराभव करण्याची ताकद आज कोणत्याही एकच एक पक्षात नाही याची संसोपाला पुरेपूर जाणीव आहे. त्याचप्रमाणे एखाद्या राज्यातही काँग्रेसची जागा घेण्याचे सामर्थ्य कोणत्याही एकच एक पक्षात नाही याचीही जाणीव सं. सो. पा.ला आहे. देशावर काँग्रेसची राजवट अशीच अनिश्चित काळ लादली जाऊ नये यासाठी विरोधी पक्षांत कोणत्या तरी स्वरूपाची एकजूट होणे केवळ अटळच नाही तर आवश्यकही ठरते. वेगवेगळी सैद्धांतिक लेबले व तात्त्विक मतभेद बाजूला ठेवून विरोधी पक्षांनी किमान ऐक्य साधावे अशी भूमिका घेऊन संयुक्त सोशलिस्ट पार्टी आज भारतीय जनतेपुढे येत आहे. गेल्या निवडणुकातील मतदान व सध्याचे पक्ष–संघटन या दोन कसोट्या लावून विरोधी पक्षांनी मतदारसंघांचे आपापसात वाटप करावे अशी सं. सो. पा. ची सूचना आहे. हे धोरण यशस्वी होण्यासाठी विरोधी पक्षांत देवघेवीची सहनशील वृत्ती असली पाहिजे. पण नेमकी हीच तडजोड व हेच औदार्य आज विरोधी पक्षांत अभावाने आढळून येते व त्यामुळे सं. सो. पा. च्या आवाहनास प्रतिसाद मिळाला आहे तो मर्यादित प्रमाणात.

विरोधी पक्षांच्या या निवडणूक–करारात काही पक्ष सहभागीच झालेले नाहीत, तर काही करार राज्य–पातळीवर न होता काही जिल्ह्यांपुरते झालेले आहेत. निवडणूक–करार करण्यात सैद्धांतिक मतभेद आडवे आले असेही म्हणता येणार नाही. एकाच तत्त्वाचा पुरस्कार करणारे पक्षही मतदार संघांचे आपापसात वाटप करू शकलेले नाहीत! यालाही अपवाद आहेतच. उजवे कम्युनिस्ट व मुस्लिम लीग यांच्यांत वैचारिक साधर्म्य नसले तरी हे दोन्ही पक्ष केरळमधील विरोधकांच्या आघाडीत सामील झाले आहेत. त्याचप्रमाणे तामिळनाडमध्ये द्रवीड मुन्नेत्र कळघम्‌ने एका बाजूस स्वतंत्र पार्टी व मुस्लिम लीग यांच्याशी व दुसऱ्या बाजूस पारंपारिक डाव्या पक्षांशी निवडणूक–करार केले आहेत. राजस्थानात संसोपा, जनसंघ व स्वतंत्र पार्टी यांच्यांत आणि मध्यप्रदेशात संसोपा, जनसंघ व जनकाँग्रेस यांच्यांत असे करार घडवून आणण्याचे प्रयत्न चाललेच होते. पण काँग्रेस व विरोधी पक्ष यांच्यांत सरळसरळ दुरंगी सामने घडवून आणावेत हे आपले उद्दिष्ट संसोपा सफळ करू शकलेली नाही.

समाजवाद व लोकशाही यांचा पुरस्कार करणाऱ्या साऱ्या शक्ती आपल्या झेंड्याखाली एकत्रित करणे व विविध क्षेत्रांतील पक्ष-संघटना बलवान करणे हे संयुक्त सोशलिस्ट पार्टीचे आजचे आद्य कर्तव्य आहे. नोकरशाही, भांडवलशाही—सरंजामशाही यांची चौकट खिळखिळी करण्यासाठी जनतेची प्रभावी चळवळ उभारणे ही संसोपापुढील कामगिरी आहे.

क्रांतिकारी संघर्षाचा पक्ष बनण्यासाठी संयुक्त सोशलिस्ट पार्टी प्रयत्नशील आहे. सुस्पष्ट समाजवादी कार्यक्रम, प्रखर देशभक्ती, विकेंद्रित लोकशाही यांचा जयघोष करणारी ही पार्टी, शोषित-पिडित वर्गांच्या हातची तलवार बनली पाहिजे. अर्थातच आजच्या घटकेस संसोपा अशी पार्टी नाही; पण संसोपाने कमीत कमी वेळात अशी प्रखर क्रांतिकारी पार्टी बनले पाहिजे.

जनतेत आपले काम व संघटन वाढविणे संयुक्त सोशलिस्ट पार्टी सर्वात महत्त्वाचे मानते. पण त्याचबरोबर संसोपाची इतर विरोधी पक्षांसंबंधीची भूमिका रचनात्मक(पॉझिटिव)आहे. भारतातील सर्वच पक्षांत आज जोराचे विचारमंथन चालू आहे. खुद्द समाजवादी पक्षातही गेल्या १८ वर्षांत बरेच बदल झाले. एकमेकांना घाईघाईने लेबले चिकटवणे किंवा विशेषणे लावणे योग्य होणार नाही.

संयुक्त सोशलिस्ट पार्टी याच भूमिकेतून साऱ्या पक्षांची दोन वेगवेगळ्या वर्गांत गणना करते. ज्या पक्षांबरोबर संघटनात्मक ऐक्य संभवते व ज्यांच्या बरोबर नजदीकच्या कालखंडात असे ऐक्य संभवत नाही, अशा दोन वर्गांत पक्षोपक्षांची संसोपा विभागणी करते. यापैकी पहिल्या वर्गातील पक्षांना एकसारखे प्रयत्न करून समाजवादी झेंड्याखाली आणण्यासंबंधी संसोपा आशावादी आहे. दुसऱ्या वर्गातील पक्षांशी संसोपा मित्रत्वाचे संबंध बांधून वैचारिक देवाणघेवाण चालू ठेवत आहे.

विरोधकांतील काही पक्षांच्या निष्ठा व सिद्धांत, एकपक्षीय राजवट व चुकीचा( बास्टर्ड )आंतरराष्ट्रीयवाद यांच्याकडे झुकलेले आहेत. दुसऱ्या बाजूस, इतर काही विरोधी पक्ष मालमत्तादार वर्गाविषयी नरमाईचे धोरण स्वीकारतात व अल्पमतातील गटांसंबंधी आक्रमक पवित्रा घेतात. आणि द्रवीड मुन्नेत्र कळघम्‌सारखे पक्ष राष्ट्रीय ऐक्याऐवजी प्रांतीय वेगळेपणावर भर देतात——पण त्याचबरोबर काही प्रमाणात पददलितांच्या सामाजिक आकांक्षाही व्यक्त करतात.

उदाहरणार्थ, रिपब्लिकन पार्टी मागासलेल्या वर्गातील नव्या जागृतीचे प्रतिनिधित्व करते. समान व समृद्ध जीवनाची जी तहान पददलितांना लागलेली आहे, ती तहान रिपब्लिकन पार्टीद्वारा व्यक्त होते. अशा या शक्तींशी अतिशय जवळचे संबंध स्थापन करणे संसोपास आवडेल.

वर उल्लेखलेल्या ‘ डाव्या ’ पक्षांना परकीय-निष्ठा व हुकूमशाही यांच्यापासून अलग करण्याच्या आणि ‘ उजव्या ’ पक्षांना मालमत्तेचे सामाजीकरण आणि

अल्पमतातील गटांसंबंधी उदार व सहनशील वृत्ती या तत्त्वांच्या दिशेने झुकविण्याच्या शक्यतेकडे संसोपा कानाडोळा करणार नाही. या ' डाव्या-उजव्या ' विरोधी पक्षांतील अंशमात्र दुष्टप्रवृत्ती खुद्द काँग्रेस पक्ष व काँग्रेस सरकार यांच्या सामर्थ्यशाली दुष्टप्रवृत्तींमुळेच जगतात, ही गोष्ट संसोपा कधीही विसरू शकणार नाही!

संयुक्त सोशलिस्ट पार्टी जन-आंदोलने उभारत असताना, लोकसभा व विधानसभांतून सत्ताधारी पक्षाचा गैरकारभार चव्हाट्यावर आणण्याची संधी वाया दवडणार नाही. जनतेच्या आकांक्षा, निराशा व सुखदु:खे यांची प्रतिबिंबे विधानसभांत व लोकसभेत उमटावीत असे प्रयत्न संसोपा करील व त्याच दृष्टिकोणातून आजच्या विधानसभांत व लोकसभेत परिवर्तन घडवील. आपली संसदीय कामगिरी प्रभावी व धारदार ठरावी म्हणून संसोपा विरोधी पक्षांचे सुसूत्रीकरण सतत इच्छिते. विविध संसदीय समित्या, विधान परिषदा व राज्यसभा यांच्या निवडणुकांतही संसोपा इतर विरोधी पक्षांशी हीच सहकार्याची भूमिका घेईल.

जनतेच्या आकांक्षांना वाचा फोडावी आणि अन्याय व दडपशाही यांच्याविरुद्ध जन-आंदोलनांना नेतृत्व पुरवावे असे प्रयत्न संसोपा अत्याहतपणे चालू ठेवील. जन-आंदोलनाने व विशिष्ट प्रश्नांवरील लढ्यात इतर पक्षांचे सहकार्यही परिस्थितीनुसार घेण्यात येईल.

संयुक्त सोशलिस्ट पार्टीच्या मते निवडणुका हा व्यापक जन–आंदोलनांचाच एक भाग आहे. काँग्रेसचा पाडाव करून पर्यायी समाजवादी सरकार स्थापणे हे पक्षाचे ध्येय आहे. पण आजच्या परिस्थितीत, काँग्रेसचा पाडाव व पर्यायी समाजवादी सरकारची स्थापना या दोन्ही गोष्टी एकाच फटक्यात व एकाच वेळी साधता येणार नाहीत. या दोन उद्दिष्टांतील मध्यंतराच्या काळात नवनवे प्रयोग, नवनवी सरकारी रचना, विविध राजकीय मोर्चे बांधावे लागतील. यासाठी लवचिक भूमिका घेण्याची तयारी भारतातील विविध राजकीय पक्षांना दाखवावी लागेल. अशी लवचिक भूमिका आपल्या परीने घेण्यास संसोपा तयार आहे. अल्पमतावर आधारलेली काँग्रेस राजवट संपविण्यासाठी, ' डाव्या–उजव्या ' साऱ्याच विरोधी पक्षांनी मतदारसंघांचे आपापसात वाटप करावे या संसोपाच्या धोरणामागील प्रेरणा हीच आहे. विरोधी पक्षांतील एकजुटीच्या संसोपाच्या प्रयत्नांना योग्य प्रतिसाद मिळालेला नाही, हा मुद्दा येथे अलाहिदा ठरतो.

संयुक्त सोशलिस्ट पार्टी आपल्या नाव–निशाणीवर, आपल्या प्लॅटफॉर्मवरून निवडणुका लढवील. पक्षाचे अस्तित्व व पक्षाचे वैशिष्ट्य दुय्यम महत्त्वाचे ठरेल अशा कोणत्याही गटात पक्षाचे आमदार–खासदार सामील होणार नाहीत. निवडणुकीसाठी इतर पक्षांबरोबर किमान किंवा समान कार्यक्रम आखला जाणार नाही. तथापि संसोपाचे असे मत आहे की बिगर–काँग्रेसी शासनाच्या कार्यक्रमाची

चर्चा आपल्या पक्षात व इतर विरोधी पक्षांत आजच सुरू व्हावी. आपल्या स्पष्ट–स्वच्छ कार्यक्रमाच्या आधारावर संसोपाचे प्रतिनिधी अशा चर्चांत सहभागी होऊ शकतील.

काँग्रेससह किंवा काँग्रेसविना एखादी कम्युनिस्ट–विरोधी 'लोकशाही आघाडी', किंवा एखादी 'डावी आघाडी' किंवा एखादी 'धर्मनिरपेक्ष आघाडी' स्थापण्यास संसोपा तयार नाही. संसोपाच्या मते अशा आघाड्यांमुळे समाजवादी धोरणाचे मुख्य उद्दिष्ट साधणार नाही, विरोधी पक्षांत आणखीच फाटाफूट पडेल व सत्ताधारी पक्षाचे आसन मात्र अधिकच बळकट होईल !

# संयुक्त सोशलिस्ट पार्टीचा संक्षिप्त इतिहास

संयुक्त सोशलिस्ट पार्टीचे उगमस्थान राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत शोधावे लागेल. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसमधील ( म्हणजेच कॉंग्रेसमधील ) जहाल क्रांतिकारकांनी १९३४ मध्ये कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टीची स्थापना केली. राष्ट्रीय चळवळीस समाजवादी वळण देऊन, किसान–कामगारांना त्या लढ्यात सामील करून घ्यावे व राष्ट्रीय स्वातंत्र्याचा संग्राम अधिकच तीव्र करावा हे कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टीचे ध्येय होते. कम्युनिस्ट पार्टीशी बंधुत्वाचे संबध बांधून समाजवादी एकजूट साधण्याचा प्रयत्नही कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टीने केला. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीचा पाया व्यापक करण्याच्या उद्दिष्टात पक्षास भरघोस यश मिळाले व १९४२ च्या ' चलेजाव ' चळवळीचे नेतृत्व पक्षानेच केले. परंतु सोशलिस्ट–कम्युनिस्ट एकजुटीचे प्रयत्न मात्र अपयशी ठरले. कम्युनिस्ट पक्षाचे परदेशी लागेबांधेच याला कारणीभूत ठरले. रशियन प्रभुत्वाखालील कम्युनिस्ट इंटरनॅशनल या संघटनेचे आदेश बरहुकूम मानण्याचे भारतीय कम्युनिस्टांचे धोरण व स्वतंत्र राष्ट्रीय भूमिका घेण्यात भारतीय कम्युनिस्टांनी केलेली कुचराई यांमुळे सोशलिस्ट–कम्युनिस्ट एकजूट होऊ शकली नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कॉंग्रेस-अंतर्गत पक्ष म्हणून काम करणे कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टीस अवघड झाले. कॉंग्रेस विसर्जित करण्याचा सल्ला महात्मा गांधींनी दिला होता, पण कॉंग्रेसी श्रेष्ठींना हा सल्ला मान्य नव्हता. देशात क्रांतिकारी बदल करण्याचे हत्यार म्हणून कॉंग्रेसचा उपयोग करून घेण्यास हे नेते तयार नव्हते. ब्रिटिशांविरुद्ध चाललेल्या दीर्घ लढ्यात महात्मा गांधींनी वेगवेगळ्या वर्गांना कॉंग्रेसमध्ये आणून एक अपूर्व व बलवान जन–संघटन रचले होते. असे हे विशाल संघटन आपल्या नियंत्रणाखाली ठेवण्यात तेव्हांच्या कॉंग्रेसी श्रेष्ठींचा मोठाच फायदा होणार होता आणि हा फायदा आपल्या हातून सुटू नये याविषयी त्यांच्यांत एकमत होते. कॉंग्रेसचे एका क्रांतिकारी समाजवादी पक्षात रूपांतर करण्यास किंवा गाधींजींची उच्च नीतितत्त्वे टिकविण्यासाठी त्यांना हा पक्ष विसर्जित न करता जिवंत ठेवावयाचा होता अशातला काही भाग नाही. याउलट तेव्हांच्या वजनदार कॉंग्रेसी

नेत्यांनी पक्षातील लोकशाही स्वातंत्र्यास आळा घातला व सत्ता टिकविणारी एक पद्धतशीर यंत्रणा उभारली. सत्तेसाठी झगडणाऱ्या कॉंग्रेसमधील गटांपेक्षा संपूर्णपणे वेगळे असलेले, व वेगळ्या आर्थिक-समाजिक कार्यक्रमावर आधारलेले सुसंघटित पक्ष कॉंग्रेसच्या विशाल छत्रीखाली नांदावेत ही गोष्ट या नेत्यांना सहन झाली नाही. कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टीने कॉंग्रेस सोडावी यासाठी एकामागोमाग एक असे घटनात्मक व संघटनात्मक उपाय योजण्यात आले. महात्माजींचा खून झाला व या उपाय-योजनांस अधिकच चालना मिळाली आणि सोशलिस्टांचा कॉंग्रेस-त्याग अटळ ठरला.

१९४८ मध्ये कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टी स्वतंत्रपणे राजकीय रिंगणात उतरली ते आपल्या नावामागील 'कॉंग्रेस' हे विरूद सोडून देऊन. सोशलिस्ट पार्टीने जनमनाचा कौल १९५१-५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत अजमाविला. पक्षाचे सदस्यत्व खुले करण्यात आले व १९४९ मध्ये पक्षाने आंदोलने चालविण्याची भूमिका पत्कारली. या दोन गोष्टींमुळे पक्षाचा झपाट्याने विस्तार होत असल्याचे काहीसे फसवे चित्र निर्माण झाले. प्रौढ मतदानाच्या कायद्यानुसार होणाऱ्या या पहिल्या निवडणुकीत सोशलिस्ट पार्टीच्या यशासंबंधी फार मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या गेल्या. पक्षाचे तेव्हांचे सरचिटणीस श्री. अशोक मेहता यांच्या शब्दांत ही परिस्थिती वर्णावयाची झाल्यास " ......जनतेची कॉंग्रेसवरील निष्ठा निश्चित पणे ढळू लागली आहे. वाढत्या ठामपणे या निष्ठा सोशलिस्ट पार्टीस वाहिल्या जात आहे. मतदारांच्या मते कॉंग्रेसला योग्य पर्याय म्हणजे सोशलिस्ट पार्टी होय..."

आपल्या संघटनात्मक सामर्थ्याचा अंदाज न घेता, सोशलिस्ट पार्टीने वारेमाप जागा लढविल्या. शिवाय जनतेच्या आर्थिक-सामाजिक-राजकीय मागण्यांसाठी लढे चालवून ज्या मतदारसंघांत पक्ष-संघटन उभारण्यात आले आहे, अशाच जागा निवडून त्या लढविण्याचे धोरणही पक्षाने अवलंबिले नाही. सोशलिस्ट पार्टीचे डावपेच असे होते की जास्तीत जास्त ठिकाणी उमेदवार उभे करावेत व लोकांतील असंतोषाच्या जोरावर कॉंग्रेस पराभूत होईल याच हिशोबावर विजयाची अपेक्षा बाळगावी. याच हिशोबावर पक्षाने लोकसभेसाठी २५६ व विविध विधान-सभांसाठी १७९९ जागा लढविल्या. पण निवडणुकात मात्र सोशलिस्ट पार्टीस फार मोठा पराभव पत्करावा लागला. पार्टीला लोकसभेसाठी १ कोटी १० लाख व विधानसभांसाठी १ कोटी मते मिळाली खरी–पण ही मते इतकी दूरवर विखुरलेली होती की त्यामुळे फारच थोडे उमेदवार यशस्वी होऊ शकले. निम्म्यापेक्षा अधिक उमेदवारांना एकूण मतांपैकीषष्ठांश मतेही न मिळाल्यामुळे यांच्या अनामत रकमा जप्त झाल्या. पार्टीला लोकसभेच्या १२ व विधानसभांच्या ६२५ जागा तेवढ्या मिळू शकल्या. भारताच्या दक्षिण, पूर्व व वायव्य भागांत कॉंग्रेसला पर्यायी पक्ष सोशलिस्ट पार्टी नाही; उलटपक्षी प्रांतीय, जमातवादी,

जातीयवादी व परराष्ट्र-धार्जिण्या पक्षांनी हे स्थान मिळवलेले आहे ही गोष्ट या निवडणुकांनी स्पष्ट केली.

निवडणुकीतील या फटक्याने सोशलिस्ट पार्टीत–विशेषतः पार्टीच्या वरच्या थरात–नैराश्याची लाट पसरली पण त्याचबरोबर आत्मपरीक्षणही सुरू झाले. देशात इतके पक्षोपपक्ष नांदावेत, पण त्यापैकी एकाही पक्षाने काँग्रेसला पर्यायी पक्षाचे स्थान मिळवू नये याची चिंता पार्टीस वाटू लागली. प्रगतिशील शक्तींचे मतदान दुभंगल्यामुळे काँग्रेसचे मात्र फावते हा धोका पार्टीच्या ध्यानात आला. समानधर्मी पक्ष व गट यांना आपल्या झेंड्याखाली आणण्याची योजना हाती घेण्यात आली. पार्टी मजबूत करण्याच्या व पार्टी वाढविण्याच्या या धोरणाचा परिपाक श्री. कृपलानींच्या कृषक मजदूर प्रजा पार्टीशी सोशलिस्ट पार्टीचे विलिनीकरण करण्यात झाला. या विलिनीकरणातून प्रजा सोशलिस्ट पार्टी जन्मास आली.

प्रजा सोशलिस्ट पार्टीत दोन परस्पर-विरोधी मतप्रवाहांचा संघर्ष सुरू झाला. प्रसोपा हा काँग्रेसला पर्यायी पक्ष म्हणून बांधावा की पक्षाने काँग्रेसशी सहकार्याची क्षेत्रे शोधावीत हा वादाचा मुद्दा. काँग्रेसला आतून किंवा बाहेरून सुधारणे अशक्य आहे, व त्यामुळे एक नवी लोकशाहीवादी, राष्ट्रवादी पण क्रांतिकारी पर्यायी पार्टीच देशातील कोंडी फोडू शकेल असे काँग्रेसविरोधी भूमिका घेणाऱ्यांचे म्हणणे होते. काँग्रेसशी सहकार्याची भूमिका मांडणाऱ्या श्री. अशोक मेहतांचे म्हणणे अतिशय सोपे होते. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा होता की आर्थिक विकासाच्या बाबतीत भारतास फार मोठी मजल मारावयाची आहे. भांडवलशाही किंवा रशियन मार्ग भारताला टाळावयाचा असल्यास, जनतेने आपणहून हालअपेष्टा सोसून भांडवल-संचय केले पाहिजे. साहजिकच विरोधी पक्षांनी सरकारची अडवणुक न करता, राष्ट्र-उभारणीच्या कार्यात सत्ताधारी पक्षास साहाय्य केले पाहिजे. हा सिद्धांत कागदावर मोठा तर्कशुद्ध वाटतो! पण सामाजिक-आर्थिक चौकटीतील विषमता व अन्याय–आणि अशी ही अन्याय्य चौकट कायम टिकविण्यासाठी सत्ताधारी पक्ष व नोकरशाही यांचे संगनमत, या दोन्हीही गोष्टी हा सिद्धांत जमेस धरत नाही. सत्ताधारी काँग्रेस पक्ष मूलभूत व क्रांतिकारी बदल करावयास तयार आहे, पात्र आहे; आणि त्यासाठी विरोधी पक्षांचे सहकार्य घेण्यासही तयार आहे हे श्री. अशोक मेहतांनी गृहीत धरले. पण ही गोष्ट मुळातच चूक होती.

सत्य परिस्थितील अन्यायांविरूद्ध झगडण्याऐवजी 'सहकार्याची क्षेत्रे' शोधण्यावर भर दिला पाहिजे असे श्री. अशोक मेहतांचे तर्कशास्त्र. विरोधी पक्षांना टीका करण्याची मुभा त्यांनी दिली. पण विरोधी पक्ष त्यासाठी कोणतीही उपाययोजना करणार नसल्यास, सरकारी पक्षही त्यांच्या सूचना कशाला स्वीकारणार होता? उलटपक्षी, आर्थिक विकासासाठी जनतेने वाढते कर सहन केले पाहिजेत, काम-

गारांनी आपले पगार गोठविण्यास (एकाच जागी स्थिरावण्यास) आणि शेतकऱ्यांनी आपल्याजवळील अधिक धान्य सोडून देण्यास संमती दिली पाहिजे असल्या सूचनांमुळे काँग्रेस सरकारच्या हटवादी धोरणांना अधिकच जोर चढला असता. अशोक मेहतांच्या सहकारवादी भूमिकेमुळे सरकारच्या वतीने जनतेपुढे क्षमायाचना करण्याची पाळी प्रगतिशील विरोधी पक्षांवर येणार होती !

श्री. अशोक मेहतांच्या या सहकारवादी धोरणामुळेच १९५५ मध्ये प्रजा सोशलिस्ट पार्टी दुभंगली व समाजवादी चळवळ क्षीण बनत गेली. स्वत: श्री. अशोक मेहतांच्या नेतृत्वाखाली एक मोठा गट प्रसोपातून काँग्रेसमध्ये जाण्यात या धोरणाचे पर्यवसान झाले.

अशोक मेहतांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर, दुभंगलेल्या समाजवादी चळवळीचे दोन तुकडे एकत्र जोडले गेले व संयुक्त सोशलिस्ट पार्टी स्थापन झाली.

या एकजुटीमुळे नव्या आशा फुलल्या व बिगर-कम्यूनिस्ट प्रगतिशील शक्तींच्या एकोप्याची शक्यता दिसू लागली. त्यामुळ किसान-कामगार चळवळी प्रखर बनल्या व जनतेत क्रांतिकारी वारे वाहू लागले. पक्षाचे विधानसभांतील, लोकसभेतील बळही वाढले. दुर्दैवाने भूतपूर्व प्रसोपातील काही मंडळी संसोपातून फुटून निघाल्यामुळे समाजवादी चळवळीवर आघात झाला. या काही मित्रांच्या गमनाबद्दल संसोपास मन:पूर्वक खेद वाटतो. नव्या प्रसोपाच्या आरोप-प्रत्यारोपात गुंतून न पडता संसोपाने त्यांना निवडणूक-समझौता करण्याचे आवाहन केले. परंतु देशातील समाजवादी मतदार संघ आपापसात वाटून घेऊया, व आपापसातील वाद मिटविता न आल्यास उभयतांस मान्य असलेल्या पंचांचा निर्णय बंधनकारक मानूया, या संयुक्त सोशलिस्ट पार्टीच्या आवाहनास प्रसोपाकडून प्रतिसाद मिळाला नाही. संसोपाच्या नेत्यावर असंस्कृत हल्ले चढविण्याचे धोरण प्रसोपाने सोडले नाही व संसोपाच्या आमदार-खासदारांविरुद्ध उमेदवार जाहीर केले.

इतर विरोधी पक्षांशी निवडणूककरार करण्याच्या संसोपाच्या धोरणाचा प्रसोपा नेते धिक्कार करतात. परंतु काँग्रेसची मक्तेदारी संपुष्टात आणण्याच्या व्यापक उद्दिष्टासाठी संसोपा जी गोष्ट राष्ट्रीय व राज्य पातळीवर उघडपणे करत आहे, तीच गोष्ट गुपचूपपणे आपल्या पुढाऱ्यांना चार-दोन जागा राखण्यासाठी करावयास प्रसोपाचा नकार नाही !

प्रसोपा पुढाऱ्यांच्या या विधायक कारवायांमुळे, संयुक्त सोशलिस्ट पार्टीने आपला रस्ता किंवा सारसार विचार सोडला नाही. प्रसोपा पुढाऱ्यांना पाडण्यासाठी, आपल्या मार्गाबाहेर जाऊन त्यांच्याविरुद्ध उमेदवार उभे करण्याची चाल संसोपा खेळू इच्छित नाही.

काँग्रेसचा पाडाव करण्याची ताकद आज कोणत्याही एका पक्षात नाही याची

पुरेपूर कल्पना असल्यामुळे, संयुक्त सोशलिस्ट पार्टी व्यापक राष्ट्रीय हित नजरेपुढे ठेवून, विरोधी पक्षांशी निवडणूक–समझौते करण्याची संधी वाया घालविणार नाही.

चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरही संयुक्त सोशलिस्ट पार्टी आपली राजकीय भूमिका अधिक जोमदारपणे पुढे चालवील. समाजवादी शक्तींचे आपल्या झेंड्याखाली एकत्रीकरण करणे; आणि सुस्पष्ट व काळबद्ध कार्यक्रमाची अंमलबजावणी करणारे बिगर-काँग्रेसी पर्यायी शासन स्थापण्यासाठी विरोधी पक्षांशी सहकार्य करणे हेच धोरण संसोपा अधिक जोरकसपणे यापुढेही चालवील.

# संयुक्त सोशलिस्ट पार्टीची तत्त्वप्रणाली

पक्षाचा कार्यक्रम हा अंतिम उद्दिष्टाकडे नेणारा एक टप्पा असतो व दीर्घ कालावर पसरलेल्या अशा अनेक छोट्या-मोठ्या टप्प्यांनी अंतिम उद्दिष्टाची पूर्तता केली जात असते. देशातील राजकीय वाद व प्रचार आजतगायत अंतिम उद्दिष्टावरच केंद्रित झाला असून लगेच हाती घ्यावयाच्या कार्यक्रमाकडे दुर्लक्षच झालेले दिसते.

अंतिम उद्दिष्टासंबंधीचा हा वाद व हा प्रचार देशाच्या राजकीय मनोधारणेस बाधक ठरू शकेल व शकलेला आहे. ' आर्थिक व सामाजिक समता, ' ' जातरहित व वर्गरहित समाजरचना, ' ' पिळवणुकीची समाप्ती व समान संधी,' ' शांतता व लोकशाही ', ' अन्न, वस्त्र व आसरा यांचे सर्वांना किमान प्रमाण,' ' स्वातंत्र्य, मूल्ये व चांगूलपणा ' वगैरेसारख्या वाक्प्रचारांचे तर पीकच आले असून, सर्वच व्यासपीठांवरून हे वाक्प्रचार ऐकावयास मिळतात. अशा वाक्प्रचारांचा वरचेवर वापर केल्यामुळे त्यांसंबंधी चिंतन करण्याची क्रिया थांबते व परिणामतः निष्क्रियता निर्माण पावते. उक्तीमध्ये क्रांती पण आचरणात पारंपारिकता व प्रतिगामीपणा अशी परिस्थिती या साचेबंद वाक्प्रचारांच्या नियमित वापराने रूढावते, प्रतिष्ठित बनते. आपापली अंतिम ध्येये लोकांपुढे ठेवताना, सर्वच राजकीय पक्षांनी त्या ध्येयाकडे नेणारा स्पष्ट रस्ता निश्चितपणे दाखवला पाहिजे अशी ठाम मागणी भारतीय जनता जोपर्यंत करत नाही तोपर्यंत या निष्क्रियतेची भीती वाढतच जाईल व लोकशाहीस त्यामुळे धोका पोचेल.

ध्येयाकडे नेणारा रस्ता असा सुस्पष्टपणे दाखविला पाहिजे. एरवी ध्येय हे धूसर व अस्पष्टच राहील आणि कानांना मंजुळ वाटणाऱ्या निरर्थक शब्दजंजाळाने ध्येयमार्गाची ही पोकळी भरून काढली जाईल! म्हणूनच अंतिम तत्त्वे व ती तत्त्वे सफल करणारा निश्चित कार्यक्रम यासंबंधी स्पष्टतेचा संसोपाचा आग्रह आहे. या स्पष्ट विवेचनानंतर आपण समाजवादी व पुरोगामी असल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही सरकारची उक्ती व कृती यांत आजच्यासारखी तफावत राहू शकणार नाही. इतर पक्षांपेक्षा वेगळे असलेल्या समाजवादी उद्दिष्टांचा अर्थपूर्ण तपशील त्यामुळे जनतेस समजावून घेता येईल. सर्वच राजकीय पक्षांनी आपापली ध्येये व त्यांकडे नेणारे

आपापले वेगवेगळे सुस्पष्ट कार्यक्रम असे जनतेपुढे मांडले तर भारताची राजकीय मनोधारणा साफ व स्वच्छ राहील आणि तीची कृती ठाम व जोमदार बनेल.

आचार–विचारांच्या तपशीलवार व सुस्पष्ट मांडणीऐवजी त्यांना मोघम व गूढगुंजनात्मक स्वरूप देण्याची प्रवृत्ती भारतीयांत आढळते. भारतातील बरेच पक्ष आज समाजवादाची घोषणा करतात व त्यामुळे एका संदिग्ध समाजवादा-विषयी स्वैर व अर्थशून्य चर्चा आज जोरात चाललेली आढळते. या प्रकारास भारतीय जनतेने आळा घातलाच पाहिजे. अस्पष्ट व गोलमाल तत्त्वांना अर्थपूर्ण बनविण्याचा आग्रह भारतीय जनतेने राजकीय पक्षांकडे धरला पाहिजे.

समता, सामाजिक मालकी, लोकशाही, विकेंद्रीकरण आदी शब्दांचे अर्थ निश्चित करून घेण्याचा संसोपाचा प्रयत्न आहे. देशातील व दुनियेतील मालमत्ता व उत्पन्न यांच्या संदर्भातच समतेची अर्थपूर्ण व्याख्या करता येईल. कमाल व किमान उत्पन्नातील प्रमाण व खाजगी मालकीचे क्षेत्र समानतेच्या व्याख्येने निश्चित केले पाहिजे. प्रत्येक राष्ट्राच्या संरक्षणखर्चातील एक विशिष्ट भाग आंतरराष्ट्रीय साठ्यात ओतून, एका समान विश्वाच्या उभारणेची पहिली पायरी बांधली पाहीजे.

उत्पादनाची साधने म्हणून वापरल्या जाणाऱ्या सर्व मालमत्तेचे समाजीकरण केले पाहिजे. ज्या मालमत्तेसाठी सामान्यतः मजूर ठेवावे लागत नाहीत अशा मालमत्तेपुरतीच खाजगी मालकी मर्यादित केली जाईल. इतकीच नव्हे तर अशा मालमत्तेपासून मिळणारे मासिक उत्पन्न हे हजार रुपयांहून अधिक असता कामा नये. सामाजिक मालकीचे निरनिराळे स्तर असून खेडे ते राज्य सरकार अशा विविध सरकारी पातळींवर ते विखुरलेले असतील.

सामाजिक मालकी प्रस्थापित करण्याचा कार्यक्रम टप्पेवारीने हाती घेण्याची परवानगी पहिल्याच समाजवादी सरकारला देण्यात येईल. मात्र त्याबाबत अशी एक अट असेल की, या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यांत बँका व इतर आर्थिक संस्थांसहित सर्व मोठ्या उद्योगधंद्यांचे सामाजीकरण झाले पाहिजे. जमिनीच्या मालकीहक्काबाबतही निश्चित धोरण स्वीकारले जाईल. पाच माणसांचे एक कुटुंब, बाहेरचे मजूर कामावर न ठेवता अथवा यंत्रांचा उपयोग न करता जेवढी जमीन कसू शकेल, त्याच्या तिप्पट आकाराच्या जमिनीपुरतीच खाजगी मालकी मर्यादित केली जाईल. त्यापेक्षा अधिक जमीन एखाद्याकडे असल्यास ती गरीब शेतकऱ्यांना व भूमिहीन मजुरांना वाटून दिली जाईल. खाजगी मालकांच्या ताब्यांत गेलेल्या सामायिक जमिनी खेड्याकडे परत दिल्या जातील.

संयुक्त सोशलिस्ट पार्टीची सहकाराच्या तत्त्वावर श्रद्धा आहे व आपल्या आर्थिक क्षेत्रातील मोठमोठे हिस्से सहकारी तत्त्वावर चालविण्यास पार्टी उत्सुक आहे. परस्पर साहाय्याचे व स्वावलंबनाचे तत्त्व फक्त उपभोग्य वस्तूंना न लावत

उधारी–शेतमालाचा व्यापार–शेती–ग्रामोद्योग व लहान उद्योगधंदे या साऱ्या क्षेत्रांत वापरले पाहिजे. परंतु सहकारी चळवळीतील नोकरशाहीच्या प्रभुत्वास, आणि सत्ताधीशांचे गट व काही विशिष्ट हितसंबंध यांना ही चळवळ वापरू देण्यास संसोपा कसून विरोध करील. समाजवादी समाजरचनेतील सामाजिक मालकीच्या विविध पद्धतींत सहकारी पद्धतीचे स्थान महत्त्वाचे असेल.

मालमत्तेसंबंधी कायदा करण्याचा अंतिम अधिकार राज्याकडे ( स्टेट ) असतो अशी संयुक्त सोशलिस्ट पार्टीची श्रद्धा असल्यामुळे मालमत्तेची नुकसान-भरपाई करण्याची कल्पनाच पार्टीस नामंजूर आहे. शिवाय जनहितासाठी ज्या मालमत्तेचे सामाजीकरण केले जाईल तिची नजीकच्या काळात योग्य प्रमाणात भरपाई करण्याचे सामर्थ्य कोणत्याही सरकारमध्ये नसेल. याऐवजी संसोपास पुनर्वसनाची कल्पना मान्य आहे. मालमत्तेचे सामाजीकरण करणाऱ्या कायद्यामुळे ज्यांना जीवन जगणेच अशक्य होणार आहे अशांसाठी पर्यायी नोकरी बघणे किंवा छोटीछोटी आर्थिक मदत देणे हाच पुनर्वसनाचा अर्थ संसोपास अभिप्रेत आहे.

मिळकत आणि खर्च या दोन्हीही बाबतीत समानता साधण्यासाठी संयुक्त सोशलिस्ट पार्टी झटेल. उत्पन्नाच्या साधनांवर सामाजिक मालकी प्रस्थापित केल्यानंतरही, मोठमोठे पगार व चैन–आरामासाठी भत्ते मिळवणारा राजकीय पुढारी, नोकरशहा व व्यवस्थापक यांचा वर्ग वाढतच राहील आणि स्वतंत्र धंद्यात अपूर्व यश मिळविणारेही मोठी संपत्ती जमा करू शकतील, खर्च करू शकतील. मोठ्यातल्या मोठ्या माणसाची मिळकत व त्याचा खर्च, सर्वात सामान्य माणसाच्या अनुक्रमे मिळकतीपेक्षा व खर्चापेक्षा, दसपटीपेक्षा अधिक असणार नाही याची खबरदारी घेतली जाईल.

लोकशाही हे काही गोलमाल, अर्थहीन मल्य नाही, तर एक स्पष्ट मार्गदर्शक तत्त्व आहे असे संसोपास वाटते. तर्कशास्त्र व चर्चा यांच्या आधारे जनमत बदलता येते हे लोकशाहीचे गृहीत-तत्त्व असून भाषणस्वातंत्र्य हा तिचा आत्मा आहे. आजच्या युगात विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा प्रधान गुण आहे. कामगाराला उत्पादनपद्धतीच्या नियंत्रणाची अधिक माहिती मिळवून देण्यासाठी तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करणे, आणि प्रत्यक्ष लोकशाहीच्या छोटचा छोटचा केंद्रांना किती राजकीय सत्ता मिळेल हे ठरविणे, या दोन कसोटचा लावून विकेंद्रीकरणाची व्याख्या केली पाहिजे.

यासाठी कार्यक्षमता व उत्पादन यांच्या गरजा भागवू शकणारी राज्ययंत्रणा उभारली पाहिजे. नोकरशाही, थैलीशहा व सत्ता यांच्या गरजा भागविणारी जुनी राज्ययंत्रणा बदलली पाहिजे. ज्या राज्यातील सत्तेचे वाटप प्रत्यक्ष लोकशाहीच्या छोटचा छोटचा केंद्रांत अधिकाधिक प्रमाणात केले जाते, त्या राज्याच्या पद्धतीत व छोटचा उद्योगधंद्यात विलक्षण साम्य आहे. शक्य तेथे, सरकारी नियुक्त

नोकरशहांच्या जागी लोकांचे प्रतिनिधी निवडण्यात येतील. खेडे, शहर व जिल्हा ही सारी प्रत्यक्ष लोकशाहीची केंद्रे असून प्रजासत्ताकाच्या सार्वभौमत्वात त्यांना त्यांचा त्यांचा वाटा मिळेल. सत्तेचे केंद्रीकरण व विभागणी करण्याच्या कोणत्याही योजनेत त्यांना केंद्रीय शाखेचा घटनात्मक दर्जा मिळेल. जिल्हाधिकाऱ्याची ( कलेक्टर ) जागा रद्द करणे, जिल्ह्याच्या नियंत्रणाखाली पोलिस ठेवणे ह्या उपाययोजना प्रथमतः केल्या जातील. महसूल आणि पंचवार्षिक योजना यांच्या रक्कमेचा किमान चौथा हिस्सा खेडे व जिल्हा पंचायतींच्या नेतृत्वाखाली खर्च करण्यात येईल.

समाजवादी सिद्धांत व कार्यक्रम यांचा आधारस्तंभ सदैव लोकशाहीच असेल. लोकांच्या प्रतिनिधींच्या गरजा राज्ययंत्रणेने भागवणे हाच लोकशाहीचा अर्थ आहे. व्यक्ती, पार्टी, सरकार व राज्य या चार मर्यादित व्यक्तित्वांना मान्यता देणे व त्यांचा मान राखणे हा लोकशाहीचा अर्थ आहे. या चार व्यक्तित्वांमार्फत राजकीय कृती घडवली जाते. पण या चार व्यक्तित्वांच्या सीमारेषा अस्पष्ट झाल्या तर लोकशाहीच कोसळून पडते.

भारतीय इतिहासातील गेल्या कित्येक शतकांत साचलेला गाळ काढून टाकावा असे संसोपासारख्या क्रांतिकारी पक्षास तीव्रतेने वाटते. शतकानुशतकांची ही घाण कशी साचली ? पारंपारिक धार्मिक व दैववादी मनोवृत्तीवर पोसलेली विचित्र वर्गव्यवस्था व जातव्यवस्था ही सामाजिक जुलूम व आर्थिक पिळवणूक यांचे थरावर थर रचत गेली. शारीरिक श्रमापेक्षा खाजगी रीत्या भीक मागणे सन्मानाचे असा अर्थ लावणारी जातव्यवस्था, आणि जन्मोजन्मींचा हिशेब पुरा करण्याआधी नवीन कृती टाळणारा कर्मवाद यांनी एका विचित्र संस्कृतीस जन्म दिला. या संस्कृतीत चिंतनाची कठोर शिस्त अंगी लावणे कठीण ठरत असले तरी कृतिशून्य आळशीपणा मात्र सहजसाध्य आहे ! नोकरशाही भांडवलदारीमुळे हा रोग अधिकच बळावला. औद्योगिक व शेतकी उत्पादनापेक्षा सट्टेबाजी व दलाली महत्त्वाची ठरू लागली. सरकारी यंत्रणेचे अफाट जाळे वाढू लागले व उत्पादनापेक्षा बौद्धिके देणे, हस्तक्षेप करणे व नियंत्रण ठेवणे व ' आपल्या माणसांना ' नोकरीस लावणे हीच सरकारी योजना बनली. देखरेख व दलाली यांना प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या या संस्कृतीच्या अवशेषांतील उरले सुरले सत्त्वही नोकरशाही व सरंजामशाही भांडवलशाही समाजरचनेमुळे लुप्त झाले.

भांडवलशाहीने मानवजातीची दोन वर्गांत विभागणी केली आहे. शेती व उद्योगधंदे यांची भांडवलशाही दृष्टिकोणातून विज्ञानाशी सांगड घातल्यामुळे ज्यांचा फायदा झाला आहे ते पहिल्या वर्गात मोडतात. भांडवलदारी–साम्राज्यवादी पद्धतीमुळे ज्यांची उत्पादनशक्ती खच्ची केली गेली अशा काळे ( निग्रो ) व दरिद्री लोकांचा दुसरा वर्ग. या दुसऱ्या वर्गात दुनियेतील दोन-तृतीयांश लोकांची

गणना होते. भांडवलशाहीने उत्पादक शक्ती व उत्पादनाची साधने यांतील संघर्ष जसा तीव्र केला, तसाच भांडवलाच्या संचयाचे मालक व स्थानिक कामगार वर्ग यांच्यातील संघर्षाच्या ज्वाला भडकवल्या. या दोन संघर्षांबरोबर, दुनियेतील एक-तृतीयांश मानवजातीच्या हाती उत्पादनाची साधने केंद्रित करून उरलेल्या दोन-तृतीयांश मानवजातीस जुनाट व निकालात निघणारी उत्पादन-साधने देऊन, एक गंभीर स्वरूपाची तणातण निर्माण केली. भांडवलशाहीने पश्चिम युरोप, उत्तर अमेरिका व त्यांच्या द. आफ्रिका आणि ऑस्ट्रेलेशिया या वसाहतींत समृद्धीचे सुवर्णयुग प्रस्थापित केले, पण आशियात, आफ्रिकेत व इतरत्र स्मशानशांतता पसरवली. भांडवलशाहीने आफ्रो-आशियाई देशातील लोकसंख्या वाढू दिली पण त्यांची आर्थिक घडी मोडून काढली. दुनियेतील दोन-तृतीयांश मानवसमुदायासाठी भांडवलसंचय करण्याची जबरदस्त कामगिरी खाजगी भांडवलास मुळीच पेलवणारी नाही. मानवजातीस भांडवल पुरविण्याचे आपले प्राथमिक काम भांडवलशाही पार पाडू शकणार नाही. भांडवलशाही साऱ्या दुनियेत पसरविण्याचा प्रयोग फसणार ही गोष्ट काळ्या दगडावरच्या रेघेसारखी स्पष्ट झाली आहे.

दारिद्र्य आणि युद्ध ही भांडवशाहीचीच दोन राक्षसी अपत्ये होत. दोन-तृतीयांश दुनियेसाठी दारिद्र्य व उरलेल्या दुनियेसाठी युद्ध! पण आपल्याच या दोन अपत्यांचा नाश करण्याचे सामर्थ्य भांडवलशाहीत नाही.

दुनियेच्या दोन-तृतीयांश भागातून भांडवलशाही-सरंमजामशाही यांचे त्वरित उच्चाटन केले पाहिजे याविषयी शंका नसावी. दुनियेच्या या भागातील लोकांनी भांडवलशाही म्हणजे शारीरिक व वैचारिक दारिद्र्य असेच समीकरण मांडले असणार. लोकांच्या तोंडात चार घास भरविण्याचे सामर्थ्य भांडवलशाहीत नसून त्यांना सदैव अर्धपोटी व अधुनमधुन भुके व उपाशी ठेवण्याचे काम भांडवलशाही करत राहणार. भांडवलदारी उत्पादन नफेबाजीवर आधारित असते, आणि या अविकसित देशात नफेबाजीस वाव कुठे असणार? सिनेमा, औषधे व विशेषत: सट्टेबाजीत अशा नफेबाजीस वाव असला तरी छोटी अवजारे, घरे किंवा अन्न यांत नफेबाजीस वाव कमीच.

सामाजिक मालकी आणि खाजगी मालमत्तेच्या संबंधातून उत्पादन-साधनांना मुक्त करणे हे कम्युनिस्ट तत्त्वज्ञान आहे. सारे कम्युनिस्ट सिद्धांत व मानवी संस्कृतीसंबंधी कम्युनिस्ट कल्पना आता चुकीच्या ठरत आहेत. ज्या भागात तांत्रिक ज्ञान अविकसित आहे व लोकसंख्या भरपूर आहे त्या भागातील उत्पादक शक्तीही अविकसित असतात. अशा या भागातील भांडवलशाहीची उत्पादक पद्धत खिळखिळी होत आहे, पण भांडवलशाहीच्या समृद्धीतून कम्युनिझम उभारता येईल ही आशा फोल ठरली आहे. ज्या प्रदेशांची लोकसंख्या प्रचंड असून उत्पादक शक्ती अल्पशा

आहेत अशा प्रदेशात भांडवलशाहीच्या अवशेषांवर कम्युनिझम उभारण्याची संधी मात्र अधूनमधून उपलब्ध होते.

भांडवलदारी उत्पादनाचे संबंध मोडल्यानंतर कम्युनिझम भांडवलशाहीच्या उत्पादनतंत्राचा स्वीकार करत असतो. आपले तंत्र विकसित करणे भांडवलशाहीस अशक्य झाल्यावर ते काम आपण करू शकतो व करतो असा कम्युनिझमचा दावा. आर्थिक चौकटीची कम्युनिस्ट पद्धतीने पुनर्रचना करण्याचा प्रयोग सोव्हिएट रशिया व आग्नेय युरोप यात थोडयाफार प्रमाणात यशस्वी झाला याचे कारण म्हणजे या देशांचा अफाट विस्तार व तेथील नैसर्गिक संपत्ती लक्षात घेता त्यांची लोकसंख्या माफक होती. पूर्व आशियात एका कठोर हुकूमशाहीच्या या प्रयोगास निश्चित यश मिळाले असे म्हणता येणार नाही.

कम्युनिस्ट तत्त्वप्रणाली विजयी झाली व उत्पादक शक्ती भांडवलदारी पद्धतीतून मुक्त झाल्या म्हणजे आंतरराष्ट्रीयवाद राष्ट्रवादावर अंतिम विजय मिळवेल असे मानले जात होते. कम्युनिस्ट विचारसरणीची ही आंतरराष्ट्रीयवादी भूमिका अनेकांना तिच्याकडे आकर्षीत होती. परंतु पहिल्या कम्युनिस्ट राज्याची (सोव्हिएट रशिया) इतर राष्ट्रांबरोबरील वर्तणूक व जागतिक कम्युनिस्ट चळवळीतील संघर्ष यांवरून राष्ट्रवाद अजूनही या युगातील किती प्रभावी शक्ती आहे तेच दिसून आले.

भांडवलशाहीच्या शृखलातून उत्पादनशक्ती कम्युनिस्ट क्रांतीमुळे एकदा मुक्त झाल्यावर शासनसंस्था आपोआप नष्ट होईल व लगेच विश्वबंधुत्व रूढ होईल ही अपेक्षाही सर्वस्वी खोटी ठरली आहे. एक नवीन, सुसूत्रित विचारसरणीच मानव जातीस नवी आशा दाखवू शकेल, नवी संस्कृती उभारू शकेल.

अशी ही नवीन व सुसूत्रित विचारसरणी दुनियेस देण्याची पात्रता समाजवादात आहे. परंतु युरोपात वाढलेल्या पारंपारिक पद्धतीत आज समाजवादाचा गाडा रुतला आहे. युरोपियन समाजवादाच्या इतिहासातील वैशिष्टयांवरून एक विश्वव्यापक तत्त्व बनविले गेले व दुनियेच्या अविकसित दोन-तृतीयांश भागास हे तत्त्व जसेच्या तसे लावले गेले तर ती मोठी दुर्दैवी घटना ठरेल. युरोपियन समाजवाद धीमा, घटनात्मक व समृद्धीचे वाटप करणारा होता. यापुढे, बाकीच्या जगासाठी समाजवादाने क्रांतिकारी, व आवश्यक तिथे घटनाबाह्य मार्ग अवलंबून उत्पादन वाढविण्यावर भर दिला पाहिजे. हुकूमशाही पद्धतीने विजयी ठरण्यापेक्षा लोकशाही मूल्यांचा संभाळ करीत आम्ही पराभव पत्करू, अशी श्रद्धा बाळगण्याबद्दल युरोपियन समाजवाद्यांनी चिरंतन कीर्ती मिळविली आहे. समाजवाद सत्तारूढ असताना घटनात्मक मार्गांनी प्रगती करण्याचा आदर्शच त्यांनी घालून दिला. पण आपले स्थान विरोधीपक्षात असताना समाजवादाने आंदोलनाचा मार्ग अवलंबिला

पाहिजे. कायदे बनविणे किंवा मतपरिवर्तन करणे हे मार्ग नेहमीच खुले नसतात. विशेषतः अविकसित भागात वर्गसंघर्षांची जोड त्यांना दिली पाहिजे.

वर्गसंघर्षातूनच भांडवलशाही नष्ट करता येईल आणि भांडवलशाही नष्ट होईपर्यंत दुनियेतील दोन तृतीयांश जनतेला पहिले पाऊलही उचलता येणार नाही. भांडवलशाहीविरोधी वर्गसंघर्षाचे दोन प्रकार आहेत. एकीकडे भांडवलशाही नष्ट करत असताना दुसऱ्या बाजूने तिला खतपाणी घालणारा वर्गसंघर्ष एक प्रकारचा. दुसऱ्या प्रकारचा वर्गसंघर्ष समाजवाद जाणत असतो. युरोपियन समाजवादाने लोकांचे जीवनमान उंचावून केलेली कल्याणकारी राज्याची स्थापना, किंवा राष्ट्रीय सीमा न ओलांडता स्थापलेली समाजवादी समाजरचना ही चिरंतन गौरव चिन्हे आहेत.

समाजवादी सिद्धांत भक्कम पायावर उभारण्याप्रमाणे दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे सिद्धांत प्रत्यक्षात उतरविणाऱ्या मार्गांची चिकित्सा. राष्ट्रीय जीवनाची पुनर्रचना करणे व जनतेची इच्छाशक्ती संघटित करून तिला आवाज फोडणे ही ध्येये डोळ्यासमोर ठेवून सारी कृती केली पाहिजे. अन्यायांविरुद्ध झगडणारी, समाजाची पुनर्रचना करणारी, जनतेची इच्छाशक्ती संघटित करून जनतेचा आवाज उठविणारी पार्टी बनण्याचे प्रयत्न संयुक्त सोशलिस्ट पार्टीने अविरत चालू ठेवले पाहिजेत. पार्टीच्या तीन चेहऱ्यांची चिन्हे म्हणजे फावडे ( रचना ), मन ( लोकशाही ) व तुरुंग (आंदोलन ). सरकार प्रस्थापित केल्यावर आपण काय करू ते पार्टीने सत्तारूढ होण्याआधी लहान मोठ्या प्रयोगांतून जनतेसमोर ठेवले पाहिजे.

खऱ्याखुऱ्या क्रांतिकारी चळवळीची मुळे तळाच्या रचनात्मक कार्यातच असतात. संसदीय कृतीचा लगाम क्रांतीने आपल्याला घालून घेण्याचे कारण नाही. मतदान हा जनतेच्या इच्छेचा महान आविष्कार असला तरी अनेक वर्षांतून एखाद्या वेळी ते नोंदविले जाते. सत्याग्रहाच्या मार्गातून जनजागृतीची चळवळ सतत चालू न ठेवल्यास मतदानास यांत्रिक शरणागतीचे स्वरूप प्राप्त होऊ शकते. सत्याग्रह व वर्गसंघर्ष यांचा आशय एकच. सच्चेपणा ताकदवान करणे व दुष्प्रवृत्तींना आळा घालणे या दोन्ही गोष्टी त्यामुळे आपोआप साध्य होतात. सत्याग्रह व वर्गसंघर्ष हिंसात्मक मार्गांनी अथवा लबाडीने चालविणे योग्य ठरणार नाही.

सामाजिक परिवर्तनासाठी हिंसा–अहिंसेच्या मार्गांच्या चर्चेस स्वतंत्र भारतीय प्रजासत्ताकात नवा अर्थ प्राप्त झाला आहे. एका बाजूस कृतिशून्य अहिंसेची तरफदारी करण्याचे व्रत अधिकृत गांधीवाद्यांनी व इतर काही मंडळींनी घेतले आहे, तर दुसऱ्या बाजूने चौकशीविना धरपकडीचे सत्र, निशस्त्र जमावावर पोलिसी गोळीबार ही सरकारी हिंसा व पाशवता, आणि दीर्घकाळच्या शरणागतीनंतर जमावातर्फे हिंसा व पाशवी वर्तन यांची अशी ही गोळा बेरीज सर्वत्र आढळून येते.

१८७८०



या असल्या प्रकारात, वैयक्तिक किंवा विशाल पातळीवरील सत्याग्रहाचा जोरदार हस्तक्षेप झाल्याचे दृश्य भारतात दिसत नाही. आजची चौकट केवळ हिंसात्मक मार्गानेच बदलता येईल हा पारंपरिक विश्वास फोल ठरविण्यासाठी तरी समाजवाद्यांनी सत्याग्रहाच्या मार्गांचा निर्णायक रीत्या उपयोग केला पाहिजे.

नवीन मानवी संस्कृती निर्माण करण्याच्या संदर्भात भांडवलशाही व कम्युनिझम सारखेच निरर्थक आहेत, असे संयुक्त सोशलिस्ट पार्टीस वाटते. संसोपा सोव्हिएट व अॅटलांटिक पद्धतींना सारख्याच चांगल्या-वाईट लेखते व या दोन्ही गटांना बाजूला सारून तिसरा गट बांधावा आणि एका समान दुनियेतील समान मानवांची नवी संस्कृति उभारावी असे संसोपाचे ध्येय आहे. केवळ एकाच राष्ट्रातील नव्हे तर देशादेशांतील, अखिल दुनियेतील मानवात समानता प्रस्थापित केली गेली तरच अशी नवी दुनिया उभारता येईल.

परराष्ट्रधोरणात सह-अस्तित्वाचा पुरस्कार करणारी मंडळी सांगतात की भांडवलशाही आणि कम्युनिस्ट पद्धती व गट गुण्यागोविंदाने नांदू शकतील. अणुशस्त्रांमुळे निर्माण झालेली कोंडी फोडता येत नसल्यामुळे व शीतयुद्धातील तणातण असह्य झाल्यामुळे काही अनिश्चित काळ विश्रांती घेण्यासाठी उभय गट आज सह-अस्तित्वाचा पुरस्कार करीत आहेत. तिसरी शक्ती व तिसरा गट बलवान होऊन या दोन परस्पर-विरोधी, व एकमेकांकडे संशयाने व शत्रुत्वाने बघणाऱ्या पद्धतींना शांततेने नांदावयास भाग पाडू शकेल.

दुष्प्रवृत्तींना आळा घालण्याच्या भावनेतून मिळते-जुळते घेण्याची वृत्ती निर्माण होते तर आपला विचार दुसऱ्यावर न लादण्याच्या भूमिकेतून सहअस्तित्वाचा पुरस्कार केला जातो. या दोन्ही प्रवृत्तींना एकत्रित आणणाऱ्या उच्च मनोभावनेतून दोन भांडखोर गटांना जरब बसवू शकणाऱ्या तिसऱ्या नव्या गटाची प्रतीक्षा केली जाते. या तिसऱ्या शक्तीची आर्थिक व सैनिकी ताकद वाढू लागल्यावर तिचे नैतिक आवाहनही प्रभावी ठरू लागेल. हे दोन भांडखोर गट त्यामुळे एकमेकांजवळ व या तिसऱ्या शक्तीजवळ येऊ लागतील.

दुनिया समान बनेल तेव्हाच खरे निशस्त्रीकरण होऊ शकेल. दुनियेचा विकसित तृतीयांश भाग व अविकसित दोन तृतीयांश भाग यांच्या आर्थिक ताकदीत मुळीच समतोल नाही. दुनियेच्या नशीबवान भागास आपली वैशिष्टचे टिकविता यावीत यासाठी मग वेगवेगळे कलह माजतात व शस्त्रास्त्रांची वेडी शर्यत सुरू होते.

सध्या दिली जाणारी परदेशी मदत ही, ती मदत स्वीकारणाऱ्या राष्ट्रांना मानहानीकारक आणि धोकादायक ठरते व त्यांच्या गरजा कदापि भागवू शकत नाही. अशी मदत मागासलेल्या राष्ट्रांना नेहमीच भ्रष्ट करते व 'जैसे-थे' वादी शक्तींच्या हाती सत्ता टिकवते. एखाद्या विश्वविकास संस्थेमार्फतच ही मदत

मागासलेल्या देशांना दिली गेली पाहिजे. प्रत्येक राष्ट्राने या संस्थेस यथाशक्ती मदत करावी व आपल्या गरजेनुसार मदत घ्यावी.

आजचे आंतरराष्ट्रीय झगडे, विविध देशांच्या कृत्रिम विभाजनातून किंवा एखाद्या भूमीवर कोणाचे सार्वभौमत्व आहे यावरून निर्माण झालेले दिसतात. या झगड्यांच्या, दोन गटांतील ( सोव्हिएट व अँटलांटिक ) संघर्षाशी संबंध जोडला गेल्यामुळे समेटाची शक्यता कमी होत जाते. हे आंतरराष्ट्रीय झगडे मिटविण्यासाठी संसोपा कोणते उपाय सुचवते ? सध्या अस्तित्वात असलेल्या राष्ट्रांना मान्यता द्यावी, कृत्रिम रीत्या फाळणी केलेले देश शांततामय मार्गांनी पुन्हा एकसंघ करावेत, पराभूत राष्ट्रे व हल्ले चढविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मोक्याच्या जागा यांच्या तटस्थतेची हमी देऊन त्यांच्या शस्त्रसाठ्यांवर मर्यादा घालावी—अशा वास्तवतावादी उपयांमुळे हे आंतरराष्ट्रीय तंटे सोडविता येतील.

समाजवादाच्या तत्त्वाचा आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्धारपूर्वक वापर केल्यास नव्या जगाची निर्मिती करता येईल. समाजवादाच्या विश्वव्यापी सिद्धांतास पुढील सात क्रांत्यांतून साकार बनविले पाहिजे.

१ स्त्री-पुरुष समानतेची क्रांती.

२ वर्णभेदावर आधारलेल्या विषमतेचे उच्चाटण.

३ जन्म व जात यांवर आधारलेल्या विषमतेचे उच्चाटण.

४ परदेशी जुलूम नष्ट करून विश्वसरकारची स्थापना.

५ खाजगी मालमत्तेवर आधारलेल्या आर्थिक विषमतेचे उच्चाटण व उत्पादन वाढविण्याच्या योजनांचा संकल्प.

६ व्यक्तिस्वातंत्र्यावरील आक्रमणाचा पाडाव.

७ शस्त्रसाठ्यांविरुद्ध भूमिका घेऊन सत्याग्रहाचा पुरस्कार.

संयुक्त सोशलिस्ट पार्टी या सात क्रांत्यांना वाहून घेत आहे.

# राजकीय कार्यक्रम

## घटनात्मक सुधारणा

१ ) संयुक्त सोशलिस्ट पार्टी भारतीय घटनेत दुरुस्ती व सुधारणा सुचवेल, ती पुढील गोष्टींसाठी–

( अ ) सामाजिक परिवर्तन झपाट्याने करण्यासाठी,

( आ ) राज्ययंत्रणेची व राजकीय चौकट लोकशाहीवादी करण्यासाठी,

( इ ) सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी व जनतेचे क्रियाशील सहकार्य मिळविण्यासाठी,

( ई ) नागरी स्वातंत्र्यावरील बंधने उठविण्यासाठी.

२ ) हीच गोष्ट अधिक स्पष्टपणे सांगावयाची झाल्यास, मालमत्तेचे हक्क व नुकसानभरपाईसंबंधीच्या तरतुदीत दुरुस्ती करावी लागेल ( कलम १६ ); मागासलेल्या वर्गासाठी जागा राखून ठेवणे, स्थानिक संस्थांचा घटनात्मक दर्जा ठरविणे व नव्या तरतुदी घालणे ( कलम ३१ ) ; राज्यसभा व विधानपरिषदा रद्द करणे व जुन्या राजामहाराजांचे तनखे बंद करणे याही दुरुस्त्या आवश्यक आहेत. मूलभूत हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी कोणत्याही नागरिकाला कोर्टात जाता यावे म्हणून कलम ३५८ व कलम ३२ ( ४ ) गाळण्याची मागणी संसोपा करेल. प्रतिबंधक स्थानबद्धतेचा कायदा हा नित्याचा कायदा होऊ नये म्हणून खऱ्या आणीबाणीच्या परिस्थितीतच त्याचा वापर केला जावा अशी सुधारणा संसोपा सुचवेल. स्थानबद्धतेच्या हुकुमांची न्यायालयीन छाननी करता आली पाहिजे अशीही दुरुस्ती संसोपा सुचवेल. वटहुकूम काढण्याच्या शक्तीवरही मर्यादा घालण्याची सूचना केली जाईल. पंचवार्षिक योजना, आर्थिक धोरण व तत्संबंधीचे कायदेकानू यांची चर्चा करणाऱ्या तज्ज्ञांची एक नूतन विधान परिषद ( सेकंड चेंबर ) चालविण्याचा प्रयोग संसोपा करून बघेल.

## नागरी स्वातंत्र्य

१ ) सेनादल, शस्त्रधारी कॉन्स्टेबल्स व पोलिस आणि धोरणे ठरविणाऱ्या राज्ययंत्रणेतील व व्यवस्थापक वर्गातील अधिकारी यांचा अपवाद वगळल्यास इतर

सर्व सरकारी नोकरांना राजकीय पक्षांचे सदस्य होण्याचा अधिकार दिला जाईल.

२ ) पंचायती व म्युनिसिपालिटचा यांसारख्या निमसरकारी संस्थांवरील, आणि रेल्वे व नागरिक संरक्षण खात्यांसकट सार्वजनिक क्षेत्रांतील सर्व सेवकांच्या राजकीय व लोकशाही हक्कांवरील सारी नियंत्रणे उठविली जातील.

३ ) साध्या पोलिस दलाच्या सदस्यांना आपापल्या संघटना बांधून आपापली गाऱ्हाणी सोडविण्याचा हक्क दिला जाईल.

४ ) कोणत्याही नागरिकाचा विनाकारण छळ किंवा अटक केली जाणार नाही अशा तऱ्हेने गुन्हेगारी कायद्यात सुधारणा केली जाईल.

५ ) न्यायदान गतिमान व माफक खर्चाचे करण्यासाठी कायदेशीर कारवायांचे एक व्यासपीठ स्थापण्यात येईल.

६ ) न्यायासन व शासन ( ज्युडिशिअरी व एक्झिक्युटिव ) यांची एकमेकापासून संपूर्ण फारकत केली जाईल. कोणालाही पकडल्यानंतर चोवीस तासांत अगदी नजीकच्या मॅजिस्ट्रेटपुढे उभे केले जाईल.

७ ) ऑक्टोबर १९६२ मधील चिनी आक्रमणानंतर सरकारने पुकारलेली व ताश्कंद निवेदनानंतरही कायम ठेवलेली आणीबाणीची परिस्थिती रद्द करण्यात येईल. नजीकच्या काळात परदेशी आक्रमणाचा स्पष्ट धोका असतानाच आणीबाणी घोषित करणे समर्थनीय ठरते. चिनी विस्तारवादाचा धोका तर आणखी कित्येक वर्षे कायम राहाणार आहे व आणीबाणी घोषित करण्याची घटनेतील तरतूद इतक्या दीर्घकालासाठी वापरता येणार नाही. हा धोका टाळण्याचे मार्ग म्हणजे नेहमीचे कायदेकानू, काटेकोर दक्षता व योग्य धोरणे हेच होत. असामान्य सत्ता हाती कायम ठेवण्याच्या इच्छेतूनच हिंसा, पाशवता व नोकरशाहीची अतिरेकी कृत्ये उद्भवतात. अशी ही असामान्य सत्ता आणीबाणीच्या नावाखाली बळकावण्यामुळे घटनेला काळीमा फासला गेला आहे ! अशी ही लुच्चेगिरीची आणीबाणी व भारतसंरक्षण कायद्याच्या हिडीस तरतुदी संसोपा रद्द करील.

## विकेंद्रीकरण

साम्राज्यवादी–नोकरशाही पद्धतीचे सारे अवशेष नष्ट करून खरी लोकशाही स्थापण्यासाठी, संयक्त सोशलिस्ट पार्टी पुढील बदल घडवून आणील.

( १ ) जिल्हा पंचायतीच्या निवडणुका अप्रत्यक्ष पद्धतीऐवजी प्रत्यक्ष रीत्या घेतल्या जातील. स्थानिक संस्थांतील सर्व जागा निवडणुका घेऊनच भरल्या जातील व त्यावर कोणाचीही नियुक्ती केली जाणार नाही. मागासलेल्या जाती, हरिजन, आदिवासी, महिला यांच्यासाठी जागा राखून ठेवण्यात येतील.

( २ ) जिल्हाधिकाऱ्याची ( कलेक्टर ) जागा रद्द करून, लोकांनी निवडलेल्या जिल्हा समितीस जिल्हाधिकाऱ्याचे सारे अधिकार दिले जातील.

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकम
अनुक्रम ५५८२० दि: निबंध
क्रमांक २९२२ नोंद दि: २१।३।८७



(३) म्युनिसिपल कमिशनर व प्रमुख अधिकारी ( चीफ ऑफिसर ) यांच्या नेमणुकी राज्य–सरकारऐवजी म्युनिसिपालिटचा करतील आणि हे अधिकारी लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींच्या सल्ल्याने चालतील.

(४) जिल्हा समिती म्युनिसिपालिटी व पंचायती यांचा दर्जा घटनेतच ठरविला जाईल.

(५) विकास–योजनांतील किमान चौथा हिस्सा स्थानिक संस्थांमार्फत खर्चिला जाईल.

(६) ज्या उद्योगधंद्यांचे सामाजिकरण करण्यात आलेले आहे त्यांची मालकी व त्यांचे व्यवस्थापन स्थानिक संस्थांकडे सोपविले जाईल.

(७) शहरातील जमिनीचे भाव ठरविण्याचा अधिकार राज्य सरकार व म्युनिसिपालिटी यांचा असेल. त्यांची मालकीही राज्य सरकार व म्युनिसिपालिटी यांच्याकडे असेल. नागरी–योजना, स्वस्त घरांच्या योजना इ. हाती घेतल्या जातील.

(८) साऱ्या शहरातील जमिनीवर म्युनिसिपालिटीचे नियंत्रण राहील व कोणत्याही व्यक्तीस एकापेक्षा अधिक घर मिळणार नाही.

(९) मुंबई, कलकत्ता, मद्रास, कानपूर, बंगलोर यांसारख्या अफाट वाढलेल्या शहरात नवे उद्योगधंदे सुरू करता येणार नाहीत. विधानसभांची खास परवानगी घेऊनच अपवादात्मक प्रकरणी परवानगी दिली जाईल. उद्योगधंद्यांचे पद्धतशीर विकेंद्रीकरण व विविध राज्यांच्या औद्योगिक प्रगतीत समतोल ही दोन तत्त्वे डोळ्यांसमोर ठेवूनच उद्योगीकरणाची योजना हाती घेतली जाईल.

रेसकोर्स, क्लब, व करमणूक केंद्रे वसविणाऱ्या भव्य खुल्या मैदानांवर भारतातील एक टक्का उच्च लोकांची आज मक्तेदारी चालते. या जागांचा घरबांधणी, शाळाबांधणी, हॉस्पिटलबांधणी, व खेळांची मैदाने म्हणून साऱ्या जनतेसाठी वापर केला जाईल.

## संसदीय कार्यपद्धतीतील सुधारणा

आपल्या संसदीय संस्थांचे कामकाज अधिक प्रभावीपणे कसे चालू शकेल याच भूमिकेतून संसदीय कार्यपद्धतीतील सुधारणांच्या प्रश्नाकडे बघितले पाहिजे. जनतेची सुखदुःखे, आशाआकांक्षा ज्या प्रमाणात संसदेत प्रतिबिंबित होतील त्याच प्रमाणात ती जनतेच्या आदरास पात्र होईल. संसदीय कार्यपद्धतीमुळे महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा सुलभ व्हावी, आपला गैरकारभार लपविण्यासाठी किंवा विरोधकांचा आवाज बंद करण्यासाठी संसदेचा सरकारने उपयोग करता कामा नये. केवळ शिक्कामोर्तबासारखा संसदेचा उपयोग करण्याचे धोरण सत्ताधारी पक्षाने अवलंबिल्यास संसदेचे सारे नष्ट होईल.

संसदीय कार्यपद्धतीने अल्पमतातील गटांच्या हक्कांचे संरक्षण केले पाहिजे.

जनहिताच्या प्रश्नांची चर्चा करण्याची, मंत्र्यांची उलट तपासणी घेण्याची व शक्तिशाली राज्ययंत्रणेची बारकाईने पाहणी करण्याची खरी संधी निर्माण केली पाहिजे. ब्रिटिश संसदीय कार्यपद्धतीची पुरेपूर छाननी करून तिच्यातील उदारमतवादी व लोकशाहीवादी तत्त्वे आपण स्वीकारली पाहिजेत, जरूर तिथे त्यांच्यांतही सुधारणा केली पाहिजे. सत्ताधारी पक्षास सोयीस्कर वाटेल तेव्हाच ब्रिटिश संसदीय संकेतांचे दाखले देण्याची आजची पद्धत आपण सोडून दिली पाहिजे !

घटनेच्या ११८ (१) कलमानुसार आपल्या कार्यपद्धतीची नियमावली (स्टँडिंग ऑर्डर्स व रूल्स ऑफ प्रोसिजर) आखण्याचा अधिकार दोन्ही सभागृहांना असतो. पण या नियमांसंबंधी लोकसभेने कधीही सविस्तर चर्चाच करू नये ही मोठी खेदाची गोष्ट होय. १९५४ पर्यंत कार्यपद्धतीची नियमावली सभागृहापुढे ठेवण्यात देखील आली नव्हती, व या नियमावलीतील बदलाच्या सूचना सभागृहापुढे संमतीसाठी ठेवण्याची पद्धतही घटना कार्यान्वित झाल्यानंतर पुऱ्या चार वर्षांनी सुरू झाली.

## लहरी नियम

सध्याची कार्यपद्धती अनेक बाबतींत अध्यक्षांना (स्पीकर) संपूर्ण, हुकुमशाही अधिकार बहाल करते. याचा परिणाम असा होतो की कायद्याच्या राज्याऐवजी सत्ताधारी पक्षातील एका व्यक्तीच्या (अध्यक्ष) लहरीचा खेळ सुरू होतो. अध्यक्षपदी आपली निवड झाल्यानंतर आपल्या पक्षाशी असलेले सर्व संबंध तोडण्याची ब्रिटिश प्रथा आपल्याकडे रूढ नाही व त्यामुळे अध्यक्षांच्या सारासार निर्णय घेण्याच्या सत्तेस भारतात तरी कमीत कमी वाव दिला पाहिजे. सारासार निर्णय घेण्याच्या या सत्तेचा, या कल्पनेचा भारतात भरपूर गैरवापर झालेला आहे व तिला लगाम घातले गेले तरच तिचा योग्य उपयोग होऊ शकेल.

अध्यक्षांच्या स्थानाचा लौकिक व निःपक्षपातीपणा वाढावा यासाठी सत्ताधारी व विरोधी पक्षांनी काही संकेत निर्माण केले पाहिजेत, पाळले पाहिजेत. या मुद्द्याचे अधिक स्पष्टीकरण करता येईल.

(अ) भारतीय संसद व विधानसभा यातील अध्यक्षांनी, अध्यक्षपदी आपली निवड झाल्यावर आपापल्या पक्षांचे राजीनामे देऊन, पक्षीय पातळीपलीकडे गेले पाहिजे.

(आ) संसदेत किंवा विधानसभेत अपक्षीय उमेदवार म्हणून अध्यक्षांनी पुन्हा निवडणूक लढविण्याचा संकेत निर्माण केला पाहिजे. या वेळी राजकीय पक्षांनी त्यांच्याविरुद्ध उमेदवार उभे करू नयेत.

(इ) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती किंवा राज्यपाल यांसारख्या राजकीय जागा अध्यक्षांना त्यांच्या निवृत्तीनंतर देऊ केल्या जाऊ नयेत. अशा जागा देऊ केल्या तरी अध्यक्षांनी त्या स्वीकारू नयेत.

(ई) आपली मुदत संपल्यानंतर सेवानिवृत्त अध्यक्षांना सन्मानाने जगता येईल असा भत्ता त्यांना देण्यात यावा.

घटना, सर्वमान्य कायदे किंवा कार्यपद्धतीची नियमावली ज्या गोष्टींविषयी स्पष्ट मार्गदर्शन करते तिथे त्यापासून ढळण्याचा प्रश्नच उद्‌भत नाही. यात फेरफार करण्याच्या प्रयत्नांमुळे काही सदस्यांवर किंवा अल्पमतातील गटांवर अन्याय होण्याची शक्यता निर्माण होते. नियमावलीने एखादा मुद्दा संपूर्णपणे स्पष्ट केला नसल्यास अध्यक्ष ती नियमावली मार्गदर्शक मानून तो मुद्दा सोडवू शकतात.

सभासदांनी विचारलेले प्रश्न कार्यपद्धतीच्या नियमात बसतात याच गोष्टीची तेवढी शहानिशा अध्यक्षांनी करावी. त्यचप्रमाणे विचारलेल्या प्रश्नांना मंत्री महाशयांकडून सुसंगत उत्तरे वदवून घेण्याचा अधिकार अध्यक्षांना दिला पाहिजे. अध्यक्षांविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडण्यासाठी ५० खासदार एकत्र आले पाहिजेत हा नियमही बदलला पाहिजे. अगदी एका खासदारास असा ठराव मांडावासा वाटला तरी त्याला ती परवानगी दिली पाहिजे. विशेषाधिकारभंगाचा ठराव मांडण्यासाठी अध्यक्षांची आगाऊ संमती घेण्याचा नियमही घटनेतील तत्त्वाशी विसंगत आहे. संसदेने आपल्या विशेषाधिकारांचा कायदा बनविला पाहिजे. या विशेषाधिकारांचे कोड बनविले गेले म्हणजे भारतीय नागरिक व वृत्तपत्रे यांच्या हक्कांवर अतिक्रमण होणार नाही असे संयुक्त सोशलिस्ट पार्टीस वाटते.

## विरोधकांची भूमिका

जनतेच्या आकांक्षा व्यक्त करण्यासाठी आणि सरकारवर टीकास्त्र उगारून सरकारला पेचात पकडण्यासाठी विरोधी पक्षांच्या आमदार–खासदारांना विधानसभा लोकसभात पाठविले जाते–सत्ताधारी पक्षाशी हवामानाच्या गोष्टी बोलण्यासाठी किंवा काव्यशास्त्रविनोदात मशगूल होण्यासाठी नव्हे ! एखाद्याची भाषा धारदार असली किंवा त्याचा युक्तिवाद आपल्याला झोंबला म्हणून सत्ताधारी पक्षास अल्पमतवाल्या पक्षावर धाकदडपशाही करण्याचा किंवा नियमावलीचे उल्लंघन करण्यासाठी अध्यक्षांवर दडपण आणण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.

संसद-सदस्यास पहिल्याच फटक्यात सारे सेशन हुसकण्याची पद्धत लोकसभेत असली तरी इंग्लंडमधील हाऊस ऑफ कॉमन्सची प्रथा वेगळी आहे. आपले विरोधी पक्ष आधीच कमजोर व दुभंगलेले असून सत्ताधारी पक्षास इतके प्रचंड बहुमत लाभलेले असल्यामुळे या हुकूमशाही सत्तेचा स्वच्छंद वापर केला जाणे अपरिहार्य ठरते. भारतीय संसदेत अशा स्वच्छंद, गैरवापराचे अनेक नमुने आढळतात. म्हणूनच यासंबंधीचा नियम सुधारला पाहिजे. इंलंडच्या हाऊस ऑफ कॉमन्सच्या नियमाचा आपण कित्ता गिरवल्यास अध्यक्षांची सत्ता कमी होणार नाही पण सत्ताधारी व बहु-मतवाल्या पक्षाच्या लहरीपणास आळा बसेल; खासदारांवर केलेली उपाययोजना एका

फटक्याची असण्याऐवजी टप्प्याटप्प्याची बनेल.

महत्त्वाच्या संसदीय समित्या अध्यक्षांनी नियुक्त करण्याचे तत्त्वही सयुक्त सोशलिस्ट पार्टीस नामंजूर आहे. प्रमाणबद्ध प्रतिनिधित्वाच्या तत्त्वानुसार या समित्या निवडल्या गेल्या पाहिजेत. या महत्त्वाच्या समित्यांवर काम करण्यासाठी विविध राजकीय पक्षांनी आपल्या कसलेल्या सदस्यांना नेमावे.

प्रश्नोत्तराचा तास, अल्पमुदतीचे प्रश्न, लक्षवेधी प्रस्ताव, अल्पावधीची चर्चा व सर्वसारण चर्चा ही सध्याची संसदीय कार्यपद्धती सरकारी कामकाजाची महिती मिळविण्यास अपुरी पडते. सरकारी कामकाज उत्तरोत्तर अधिकाधिक गुंतागुंतीचे बनत असून त्याची काळजीपूर्वक चौकशी–पाहणी करण्यासाठी ‘ समिती–पद्धत ’ अत्यावश्यक आहे.

सुरुवातीस काही विभागांपुरत्या समित्या स्थापण्याचा प्रयोग करून बघता येईल. व आस्तेआस्ते सरकारी यंत्रणेच्या साऱ्या कामकाजात त्यांचा वापर करता येईल. आपआपल्या विभागाच्या कामकाजात तज्ज्ञ बनलेल्या किंवा तज्ज्ञ होऊ इच्छिणाऱ्या सदस्यांनाच या समित्यांवर घेण्यात यावे. सरकारचे महत्त्वाचे कागद-पत्र व पुरावापत्र अभ्यासण्याचा, साक्षी घेण्याचा आणि आवश्यक असल्यास जाहीर चौकशीचा अधिकार या समितीस दिला पाहिजे.

सारासार निर्णय घेण्याचा आपला अधिकार मर्यादित होईल या भीती-मुळे मंत्र्यांकडून या सूचनेस विरोध होईलच. पण या समित्या स्थापल्या गेल्या नाही तर राज्ययंत्रणेची छाननी होणार नाही, संसदीय प्रस्तावांची तज्ज्ञांकडून योग्य पाहाणी होणार नाही किंवा भावी संसदपटू व भावी मंत्री तयार होणार नाहीत.

भारतातील संसद व विधानसभा लोकांच्या आदरास पात्र ठरण्यासाठी त्यांच्या जुनाट कार्यपद्धतीत या सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. वास्तविकत: या सुधारणा आधीच करावयास पाहिजे होत्या. संसदेच्या प्रतिष्ठेसंबंधीच्या निव्वळ गप्पा मारण्यात काय अर्थ आहे !

# आर्थिक धोरण

आपल्या राष्ट्रीय कारभारातील गोंधळ आज पराकोटीस पोचला असून विविध प्रकारचे प्रश्न आपल्यापुढे आ वासून उभे राहिले आहेत. राष्ट्रीय क्रांतीचे काँग्रेस पक्षाने किती खच्चीकरण केले ते अन्नाचा कायमचा तुटवडा, भडकणारे भाव, विविध क्षेत्रातील वाढती विषमता, संपत्तीचे विषम वाटप आणि वाढता भ्रष्टाचार यांसारख्या गोष्टींवरून स्पष्ट होईल.

काँग्रेस राजवटीत चलनवाढीने भयानक स्वरूप धारण केले असून रुपयाची किंमत युद्धपूर्व कालातील अडीच आण्यांपर्यंत घसरली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळी औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रात भारताचा जगात आठवा क्रमांक लागत होता, पण आज भारताचे स्थान चौदाव्या क्रमांकापर्यंत घसरले आहे. शेतकी क्षेत्रातही आपली अवस्था केविलवाणी आहे. अन्नधान्याची आयात दरवर्षी २० लाख टनांपासून वाढत वाढत १२० लाख टनांपर्यंत गेली आहे. हे अन्नधान्य विकत घेण्यावर आजतागायत २८० कोटी रुपये खर्च झाले. या सगळ्याचा परिणाम असा झाला आहे की आज आपण परदेशांचे ९०० कोटी रुपये देणे लागतो !

रुपयाच्या अवमूल्यनामुळे तर एका फटक्यात हे अफाट कर्ज ५७·५ टक्क्यांनी फुगले आहे. अवमूल्यनानंतर भारतीय मालाची निदान निर्यात वाढेल अशी अपेक्षा होती, पण प्रत्यक्षात मात्र निर्यात घटलेली दिसते !

भारत–पाक युद्ध चालू झाल्यावर परदेशी मदत 'तात्पुरती' थांबविण्यात आली होती. दीर्घकालच्या मदतीची शक्यता आता फारशी दिसत नाही.

औद्योगिक कच्च्या मालाचा तीव्र तुटवडा आता जाणवू लागला असून, धातूविषयक व इंजिनीयरिंग उद्योगधंद्यातील उत्पादन चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्याच वर्षी विलक्षण घटले आहे.

इतर देशांच्या तुलनेत आपल्या आर्थिक विकासाची गती फारच मंद आहे. सोळा वर्षांपूर्वी चीनही साधारणतः आपल्याच पातळीवर होता. आज त्याच चीनने बऱ्याच क्षेत्रांत आपल्याला मागे टाकले आहे. अन्न व आर्थिक साहाय्य यांच्यासाठी साऱ्या दुनियेपुढे झोळी पसरण्याच्या आपल्या धोरणामुळे भारताच्या

प्रतिष्ठेस जबरदस्त हादरा बसला आहे.

एखादी किरकोळ मलमपट्टी लावून वरा होण्यासारखा हा किरकोळ रोग नाही! यासाठी काही मूलभूत उपाययोजनांची आवश्यकता असून, सध्याच्या सरकारला नेमक्या याच उपाययोजना करणे जमण्यासारखे नाही. बोलणे व चालणे किंवा उक्ती व कृती, यांतील विसंगती हेच या सरकारचे वैशिष्टय आहे. हे सरकार व ही चौकट उलथून पाडणे, ही जनतेपुढील पहिली कामगिरी आहे.

सध्याच्या भांडवलदारी–सरंजामशाही अर्थरचनेतून समाजवादी अर्थरचनेकडे आणि मक्तेदारीवादी काँग्रेस राजवटीतून संपूर्ण समाजवादी सरकारकडे ही वाटचाल भारतीय जनतेला करायची आहे. वैयक्तिक व व्यापक सत्याग्रह आणि वर्गसंघर्ष यांच्या वाढत्या जोषात या वाटचालीचे पडसाद उमटतील. या जनआंदोलनातूनच लोकांच्या उठावास धार येईल, देशातील आर्थिक व राजकीय संस्था आणि शासनाचे स्वरूप यांच्यांत क्रांतिकारक बदल होतील. पुढे दिलेल्या आर्थिक कार्यक्रमाच्या आधारावर जनतेला पर्यायी सरकारे स्थापन करता येतील व धिटाईची नवीन धोरणे आखता येतील.

## नियोजन

काँग्रेसच्या आर्थिक नियोजनाची संपूर्ण दिवाळखोरी पुढील गोष्टींवरुन स्पष्ट होते. (१) शेतकी व अन्नधान्य उत्पादनांतील 'जैसे थे'; (२) औद्योगिक विकासाची कूर्मगती; (३) सतत वाढती बेकारी आणि (४) एक टक्का लोकांना एकूण राष्ट्रीय उत्पादनातील फार मोठा हिस्सा गिळंकृत करता आल्यामुळे सतत वाढणारी आर्थिक विषमता, उत्पन्नातील विषमता व राहणीच्या पद्धतीतील विषमता. ज्या वर्षी भारतातील उत्पादन जैसे थे राहिले व दरडोई उत्पन्न घटले, नेमके त्याच वर्षी चीनने भारतावर हल्ला केला ही घटना मोठी सूचक आहे.

अध:पाताच्या या दरीतून राष्ट्रउभारणीचे काम समानतेच्या वातावरणातच शक्य होईल. जास्तीत जास्त समता, सर्व क्षेत्रांतील काटकसर व जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवणे या तीन अटी पुऱ्या केल्यासच योजनेत जास्तीत जास्त भांडवल गुंतवण्याचा प्रयत्न यशस्वी होऊ शकेल. भारताने आपला थोडासा आर्थिक विकास घडवून आणला असला तरी, नव्याने स्वतंत्र झालेल्या इतर देशांच्या तुलनेत हा विकास अनुल्लेखनीय आहे व आपल्या गरजा भागविण्याच्या दृष्टीनेही सर्वस्वी असमाधानकारक आहे. शिवाय, उत्पादन व संपत्ती यांतील ही अल्पशी वाढही मूठभर लोकांचा भपका व ऐषआराम टिकविण्यासाठी वापरली गेली. जनतेचे दारिद्र्य, दु:ख किंवा रोगराई यात काहीच सुधारणा झाली नाही. भांडवलाची गुंतवणूक करण्यासाठी व आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी संयुक्त सोशलिस्ट पार्टी प्रथम समानतेची क्रांती घडवून आणील व किसान–कामगारातील

ध्येयवादाची भावना प्रज्वलित करील.

भारतीय जनतेतील छोट्या छोट्या गटांचे जीवनमान टप्प्याटप्प्याने आधुनिक पाश्चात्य आदर्शांप्रमाणे वाढवावयाचे, की अतिशय आस्ते आस्ते का होईना, पण दीर्घ मुदतीत साऱ्या भारतीय जनतेचे जीवनमान सुधारावयाचे याचा निर्णय भारतीय योजनाकारांनी घेतला पाहिजे. या दोन मार्गांपैकी पहिला मार्ग आहे काँग्रेसचा व दुसरा आहे संयुक्त सोशालिस्ट पार्टीचा. काँग्रेसछाप नियोजनात दर वर्षी काही मोजके लाख लोक आधुनिक पद्धतीचे जीवन जगू लागतील. नियोजनाच्या समाजवादी आखणीत, खेडेगावात पिण्याच्या पाण्यासाठी नळ पुरविणे व शौचालये बांधणे यांसारख्या प्राथमिक गरजा भागविणे व मुलभूत उत्पादन-साधने निर्माण करणे, या गोष्टी सर्वप्रथम केल्या जातील. काँग्रेसछाप नियोजनामुळे संपत्तीतील व उत्पन्नातील विषमता वाढते, सामाजिक जाणीव मरते, मूल्ये ढासळतात व भ्रष्टाचार माजतो. भीषण दारिद्र्य व कमालीची विषमता ही जुळी भावंडेच आहेत. एका टोकाला श्रीमंती व भपका आणि दुसऱ्या टोकास घाण व गरिबी असे हे आजचे चित्र आहे. या नियोजनात जनता कशी सहभागी होईल? या नियोजनात सारे भांडवल कसे गुंतवले जाईल? या नियोजनात गुंतवलेल्या भांडवलाचा तरी योग्य वापर कसा होईल?

## उत्पन्नातील प्रादेशिक विषमता

समाजातील एक टक्का सधन वर्ग आणि साठ टक्के गरीब जनता यातील तफावत हा झाला आर्थिक विषेमतेचा एक पैलू. मोठमोठी शहरे आणि खेडोपाड्यातील ग्रामीण भारत यांतील विलक्षण विषमता, आणि तौलनिक दृष्ट्या विकसित राज्ये आणि मागासलेली राज्ये यांच्या दरडोई सरासरी उत्पन्नातील विषमता या दोन्हीही गोष्टी तितक्याच चिंताजनक आहेत.

ही प्रादेशिक विषमता कशी निर्माण झाली? गेल्या ५० ते २०० वर्षात परदेशी सरकारांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराची केंद्रे व ब्रिटिश राजवटीस राजकीय दृष्ट्या मोक्याची वाटणारी शहरे यांच्या विकासासाठी आपले बहुतेक सारे भांडवल गुंतवले. विकासाचा हा ढाचा व ही पद्धत बदलण्यासाठी काँग्रेस सरकारांनीही तिळमात्र प्रयत्न केले नाहीत.

जिल्हानिहाय व राज्यानिहाय दरडोई उत्पन्नाची आकडेवारी जमविण्याचे काम सरकारने, अधिकृत नियोजनाच्या १५ वर्षांत पुरे केलेले नाही! ही आकडे-वारी उपलब्ध होईपर्यंत विकास योजनेतील प्रादेशिक समतोल साधला जाणार नाही व आपले नियोजनही अर्थपूर्ण होऊ शकणार नाही.

आंतर–जिल्हा व आंतर–राज्य उत्पन्नांतील फरकाची एक अनधिकृत पहाणी घेण्यात आली होती. या पाहाणीनुसार १९५५-५६ मध्ये बिहार, उत्तरप्रदेश, व

ओरिसा या तीन राज्यांतील नागरिकांचे मासिक सरासरी उत्पन्न अनुक्रमे १२।। रु., १५ रु. व १५.६ रु. इतकेच होते. कलकत्ता शहरामुळे पश्चिम बंगाल व मुंबई नगरीमुळे महाराष्ट्र या राज्यांतील मासिक उत्पन्नांचे दरडोई आकडे २४.६ रु. व २४ रु. असे होते आणि पंजाबमधील सरासरीही २३ रु. असल्याचे आढळून आले. आणि पाच वर्षांनंतर या परिस्थितीत काहीच सुधारणा झालेली नसल्याचे दुसऱ्या पाहणीत आढळून आले. त्याच अनधिकृत संस्थेच्या पाहणीनुसार १९६०-६१ मध्ये दिल्ली, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल व पंजाब येथील दरडोई मासिक सरासरी उत्पन्न अनुक्रमे ७२.६ रु., ३९ रु., ३८.७ रु. व ३७.६ रु. असे होते. पण बिहार, राजस्तान व ओरिसा या राज्यांतील हीच आकडेवारी अनुक्रमे १९.२ रु., २२.३ रु. व २३ रु. अशी होती.

भारतातील दारिद्र्याची भीषणता बिहार ( विशेषतः उत्तर बिहार ), उत्तर प्रदेश ( विशेषतः पूर्व व उत्तर विभागातील डोंगराळ भाग ) आणि ओरिसा राज्यातील बऱ्याच जिल्ह्यांत आढळते. गेल्या पाच वर्षांत दरडोई उत्पन्न वाढले नाही व उलटपक्षी प्रादेशिक विषमता मात्र वाढली आहे. समाजवादी धर्तीच्या पद्धतशीर नियोजनाने हा समतोल साधण्याचा हेतुपूर्वक प्रयत्न संयुक्त सोशलिस्ट पार्टी करेल.

## समानता

समानता हा तर समाजवादी सिद्धांतांचा गाभा आहे. राष्ट्रीयीकरण, कर-आकारणी व मिळकतीसंबंधीची नीती आदी उपाययोजनांमार्फत समानतेचे तत्त्व साकार करण्यासाठी संयुक्त सोशलिस्ट पार्टी झटेल. सारे मासिक उत्पन्न व खर्च यांवर हजार रुपयांची मर्यादा घालून आर्थिक असमानता एकास दहा ( १ : १० ) या प्रमाणापर्यंत मर्यादित केली जाईल. मासिक हजार रुपये उत्पन्न किंवा खर्च करण्याची मर्यादा घालताना सारे भत्ते व साऱ्या सुखसोयी त्यात अंतर्भूत धरल्या जातील. या पाठोपाठ खाजगी मालमत्तेवरही अशीच कमाल मर्यादा घालण्यात येईल. मंत्री, खासदार, आमदार, राजे–महाराजे व भांडवलदार यांच्या मिळकतीच्या व मालमत्तेच्या काही भागांचे राष्ट्रीयीकारण करून ह्या प्रक्रियेस सुरुवात केली जाईल. संसोपाच्या मते उत्पन्नावर १ : १० या प्रमाणाची मर्यादा घातल्यामुळे उत्पादन वाढविण्यास पुरेशी चालना मिळेल.

प्राथमिक शिक्षण हे केवळ मोफत व सक्तीचे नसेल तर समानही असेल, साऱ्या खास प्राथमिक शाळा रद्द केल्या जातील.

रेल्वे व बस प्रवासात एकच एक वर्ग असेल

## भांडवल संचय

समाजवादी रचनेचा प्रश्न हा खऱ्या अर्थाने भांडवलसंचयाचा प्रश्न आहे.

काटकसर, त्याग आणि कमाल समानता यांच्या आधारावरच हा प्रश्न सोडविता येईल असे संयुक्त सोशलिस्ट पार्टीचे मत आहे.

उत्पन्न व दारिद्रय यांवरील कमाल मर्यादा, स्वयंस्फूर्त श्रमदान, भांडवला-वरील कर ( कॅपिटल लेव्ही ) व खर्चावरील कर ( एक्सपेंडिचर टॅक्स ) आदी उपाययोजनांतून आर्थिक रचनेसाठी आवश्यक असलेले भांडवल उभे करता येईल. आर्थिक विकासाची गती वाढल्यावर भांडवलसंचयही फुगत जाईल आणि त्याचबरोबर दरिद्रीनारायणाचे जीवनमान सुधारेल.

## शेतकी

१ ) बेकिफायतशीर शेतीवरील जमीनसारा ( लँड टॅक्स ) रद्द केला पाहिजे.

२ ) जमिनीचे फेरवाटप करून सारे दलाल नाहीसे केले जातील. आर्थिक दृष्टचा प्रमाणभूत मानलेल्या ( इकॉनॉमिक होल्डिंग ) जमिनीच्या तिपटीपेक्षा अधिक जमीन कोणत्याही कुटुंबास राखता येणार नाही.

३ ) प्रत्यक्षात जमीन कसणाऱ्यास जमिन दिली पाहिजे. लबाडीचे व्यवहार, जमिनीच्या बदल्या, शेतकऱ्यांची व शेतमजुरांची हकालपट्टी असल्या गोष्टी थांबविल्या पाहिजेत.

४ ) पिकाचे वाटप करण्याची पद्धत नष्ट केली पाहिजे. जमीन कसणाऱ्यास आपल्या श्रमाचे फळ मिळालेच पाहिजे. ज्या भागात जमीनदाराचा वाटा ५० टक्के व त्यापेक्षाही अधिक आहे, त्या भागात जमीन कसणाऱ्याच्या वाटचास पिकाचा पाऊण हिस्सा येईल असा कायदा झाला पाहिज. या कायद्याचे काटेकोर पालन केले जाईल अशीही दक्षता बाळगली पाहीजे.

५ ) शेतमजूरांसाठी किमान वेतन ठरवून, ते वेतन त्यांच्या पदरी पाडणारी यंत्रणा उभारली पाहिजे. किमान वेतनाची अंमलबजावणी करण्यासाठी शेतमजुरांच्या संघटनांचे सहकार्य घेतले जाईल.

६ ) नवनवीन जमीन नांगरण्यासाठी भूसेनेची निर्मिती. पंचायती व किसान-सघटना यांच्या नेतृत्वाखाली उत्पादनवाढीची छोटी छोटी कामे करणाऱ्या स्वयंसेवक पथकांची स्थापना.

७ ) शेतकी उत्पादनाच्या उत्पन्नास हातभार लावण्यासाठी पेरू, आंबे यांसारख्या विशिष्ट मोसमात होणाऱ्या फळांच्या बागा वाढविण्यास प्रोत्साहन देऊन या फळांचा रस काढणाऱ्या व हवाबंद डब्यांतून तो साठविणाऱ्या फॅक्टरींची स्थापना. हिमालयाच्या पायथ्यासारख्या डोंगराळ भागात फळबागा लावण्याची मोहीम सरकारने काढली पाहिजे व त्याचबरोबर खाजगी रीत्या निर्मिलेला स्थानिक माल विकत घेण्याची अधिकृत यंत्रणाही सरकारने बांधली पाहिजे. दुधदुभते व अंडी वाढविण्याच्या योजनांचाही सरकारने पाठपुरावा केला पाहिजे.

८) जमिनीचे फेरवाटप संपूर्णपणे झाल्यानंतर सध्याच्या जमिनसाऱ्याऐवजी (लँड रिव्हेन्यू) टप्पेवारीचा शेतकी उत्पन्नावरील कर आकारला गेला पाहिजे.

९) शेतकऱ्याच्या जीवनात स्थैर्य आणण्यासाठी पिकांचा विमा उतरविण्याची योजना आखली पाहिजे.

१०) शेतकी कर्जाविषयी उदार धोरण.

११) दरिद्री शेतमजूर, हरिजन, आदिवासी व महिला यांना कर्जमुक्त करून, सरकारने एक तर ही कर्जे रद्द केल्याचे जाहीर करावे व त्याचा काही भार स्वतःवर घ्यावा.

१२) सक्तीच्या धान्य-वसूलीतून बेकिफायतशीर शेतीस सूट दिली जावी व वड्या जमीनदारांकडून मात्र उत्पादनाच्या टप्पेवारीनुसार वसुली केली जावी.

### पाटबंधारे व कालवे

धान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी गरीब शेतकऱ्यांना पाटबंधारे व कालवे यांची फुकट सोय करून द्यावी व इतरांसाठी स्वस्त दराने सोय करून द्यावी. समाजवादी नियोजनात या उद्दिष्टांना अग्रक्रम मिळेल.

### दुष्काळ व महापूर

जुन्या दुष्काळ-कायद्याऐवजी नवा व्यापक कायदा करण्यात यावा. या नव्या कायद्यात घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आपल्या नागरिकांचे पोट भरण्याची जबाबदारी सरकारने मान्य केली पाहिजे. 'नैसर्गिक मृत्यू' व 'भूकबळी' यांसारख्या गोष्टींची स्पष्ट व्याख्या या कायद्याने केली पाहिजे. कोणत्याही प्रौढ नागरिकास दररोज दीडशे ग्रॅमपेक्षाही कमी अन्न सतत तीन महिने मिळाल्यास, त्याच्या मृत्यूचे तात्कालिन कारण कोणतेही असो, त्याचा मृत्यू हा भूकबळी असल्याचे या कायद्याने स्पष्ट केले पाहिजे.

(अ) दुष्काळपीडित भागातील लोकांना, निदान ते तग धरू शकतील एवढे जेवण तरी फुकट दिले पाहिजे.

(आ) वारंवार महापुराची आपत्ती का ओढवते याची सरकारने पुरेपूर चौकशी करून योग्य प्रतिबंधक उपाय योजले पाहिजेत. महापुरात ज्यांची पीके, घरे, मालमत्ता, गुरेढोरे वाहून गेली आहेत त्यांची पुरेपूर नुकसानभरपाई देण्याचा भार सरकारने सोसला पाहिजे.

### भावविषयक धोरण

वस्तूंच्या किंमतीतील वाढ रोखवी व त्याचप्रमाणे त्यांची वाजवी किंमतही यावी अशा भूमिकेतून, संयुक्त सोशलिस्ट पार्टी एक समाजकल्याणकारी सुसूत्रित भावविषयक धोरण मांडते. या धोरणाची प्रमुख वैशिष्टये पुढीलप्रमाणे :

१) कारखान्यात बनविलेल्या जीवनावश्यक उपभोग्य वस्तूंची किंमत त्यांच्या

उत्पादन–खर्चाच्या दीडपटीपेक्षा अधिक असू नये. सारे कर व सारा नफा घेऊनच दीडपटीचे हे प्रमाण ठरविण्यात आले आहे.

२ पीक–कापणीच्या हंगामातील व त्याआधीच्या हंगामातील अन्नधान्याच्या भावांत सध्या होत असलेले विलक्षण चढउतार नियंत्रित केले पाहिजेत. या दोन वेळच्या भावांत शेरामागे एक आणा– म्हणजेच सोळा टक्के– यापेक्षा अधिक चढउतार होऊ दिली जाणार नाही.

३ शेतकऱ्यांना शेतमालाची वाजवी किंमत मिळाली पाहिजे. शेतकऱ्यांचा उत्पादनाचा खर्च भरून येईल आणि त्यांना किमान वाजवी जीवनमान मिळेल ही खबरदारी शेतमालाच्या किंमती ठरविताना घेतली पाहिजे.

४ शेतमालाच्या किंमती आणि कारखानदारांच्या किंमती यांच्यांत समानता प्रस्थापित केली पाहिजे.

५ आंतरराष्ट्रीय व्यापारातही समानतेच्या तत्त्वाचा आग्रह धरला जाईल. यामुळेच श्रीमंत देशांकडून गरीब देशांची ( प्राथमिक निर्माते ) पिळवणूक कमीकमी होत जाईल.

६ अन्नधान्याच्या घाऊक व्यापाराचे सामाजीकरण केले पाहिजे.

७ छोट्या व्यापाऱ्यांना राष्ट्रप्रगतीस प्रवृत्त करण्यासाठी घाऊक व्यापाराचे सामाजीकरण केले पाहिजे. संसोपा ही छोट्या व्यापारांचा मित्र आहे. वडे भांडवलदार व वितरक आणि सरकारी बोचक नियंत्रणे व कायदेकानू यांच्या कात्रीत छोटे व्यापारी सापडतात. सर्वसामान्य जनता आणि छोटे व्यापारी यांच्या हितसंबंधांची सांगड घालून व्यापक जनहित साधता येईल.

८ भारतातील जनतेला पुरेसे अन्न मिळेपर्यंत, अन्नाची निर्यात थांबवली पाहिजे.

९ अन्नधान्य व खाद्यवस्तू यांच्यावरील विक्रीकर रद्द केला पाहिजे.

## औद्योगिक धोरण

ज्या उद्योगधंद्यांसाठी पगारी कामगार ठेवावे लागतात अशा साऱ्या उद्योगधंद्यांचे सामाजीकरण केले पाहिजे असे संयुक्त सोशलिस्ट पार्टीचे धोरण आहे. सामाजीकरणाचा हा कार्यक्रम टप्पेवारीने हाती घेता येईल. लोखंड, पोलाद, इंजिनीयरिंग, रासायनिक द्रव्ये, वीज, खनिज द्रव्ये, साखर, कापड, सिमेंट, विमा व बँकिंग, आयात-निर्यातीचा व्यापार यांसारख्या महत्त्वाच्या धंद्यांचे सामाजीकरण पहिल्या टप्प्यात केले जाईल.

सरकारी क्षेत्राचे ( पब्लिक सेक्टर ) कामकाज अकार्यक्षम व उधळपट्टीचे असून, कामगार आणि नोकरशाही यांचे उत्पन्न व सुखसवलती यांतील विषमतेच्या बाबतीत सार्वजनिक क्षेत्राची खाजगी क्षेत्राशी ( प्रायव्हेट सेक्टर ) आज स्पर्धाच

चालली आहे, असे संसोपास वाटते. सार्वजनिक क्षेत्रातील या उणिवा भरून काढून, कामगार आणि सर्वसामान्य गिऱ्हाईक यांच्या मतानुसार उद्योगधंद्यांचे व्यवस्थापन करण्याचा प्रयत्न संसोप करील.

औद्योगिक क्षेत्रातील परिस्थिती मोठी चिंताजनक आहे. आपले वाढते परावलंबित्व, परदेशी भांडवलाची वाढती गुंतवणूक ( रिझर्व बॅंकेच्या आकडेवारी-नुसार १९४८ ते ६३ या पंधरा वर्षांत २५६ कोटी रु. पासून ६८१ कोटी रु. पर्यन्त वाढ ) आणि भारतातील भांडवलदार, उद्योगपती व बडे व्यापारी आणि परदेशी कंपन्या यांचे लागेबांधे यामुळे मोठी धोकादायक परिस्थिती निर्माण होत आहे. तेलकंपन्यांना दर वर्षी ३० ते ५० टक्के फायदा होतो व त्यामुळे गेल्या दहा वर्षांत त्यांनी गुंतवलेल्या भांडवलाच्या तिपटीने रक्कम त्यांच्या हाती आली असेल ! हे उदाहरण म्हणजे इतर भारतीय भांडवलदारांना लूटमारी व झटपट नफेबाजी करण्याचे आमंत्रणच आहे. सरकारने या परदेशी मालमत्तेचा ताबा तावडतोब घ्यावा अशी संसोपाची मागणी आहे.

## कामगारविषयक धोरण

१ दमदार संयुक्त कामगार चळवळीवर संसोपाचा विश्वास आहे. लोकशाही तत्त्वांवर आधारलेल्या एका संघटनेखाली देशातील साऱ्या कष्टकरी जनतेस आणण्या-साठी संसोपा अहर्निश झटेल.

२ कामगार चळवळीतील एकजुटीमुळे, वाटाघाटी व करार करण्याची कामगारांची ताकद विलक्षण वाढेल. त्यामुळे कामगारवर्गाची कृती अधिकच धारदार व तेजस्वी बनेल.

३ कामगार संघटनेत सुधारणा करून ती पुनर्घटित करण्याचा प्रयत्न संसोपा करील. योग्य अंतर्गत निवडणुका, लाचलुचपतीचे उच्चाटन आणि राजकारण-विरोधी व राजकारणापासून अलिप्त राहण्याच्या प्रवृत्तींशी यशस्वी झगडा, या तिन्ही गोष्टींविषयी संसोपा आग्रही भूमिका घेईल.

४ एकामागून एक पुरोगामी अशा पुढील उपाययोजनांचा अवलंब करून संसोपा कामगारवर्गास न्याय मिळवून देईल.

(अ) संघटित क्षेत्रातील विविध उद्योगधंद्यांसाठी वेगवेळ्या वेतन-मंडळांची (वेजबोर्ड) नेमणूक.

(आ) असंघटित क्षेत्रांसाठी किमान-वेतन समित्यांची स्थापना.

(इ) भाववाढीची झळ लागू नये म्हणून महागाई भत्त्याची जीवनमान ( निर्देशांकाशी ) सांगड.

(ई) सरकारी क्षेत्रात ( पब्लिक सेक्टर ) कामगारकायद्यांची काटेकोर अंमलबजावणी.

(उ) सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीच्या नियमावलीची पुनर्रचना.

(ऊ) पुढील गोष्टींसाठी सविस्तर कायदेकानू बनविणे: (१) कामगार युनियनना सक्तीची मान्यता, (२) प्रातिनिधिक युनियनचा दर्जा ठरविण्यासाठी ठराविक मुदतीच्या अंतराने कामगारांचे मतदान, (३) संपफोड्या कारवायांवर बंदी, (४) नोकरीची हमी व लहरी बडतर्फीपासून संरक्षण, (५) कामगारांच्या मासिक उत्पन्नाच्या एक टक्का इतकी सक्तीची युनियन सदस्यता–फी.

(ओ) बोनस कमिशनमधील बहुसंख्यांच्या अहवालानुसार काही पुरोगामी तरतुदींसकट बोनस कायद्यात सुधारणा आणि सार्वजनिक क्षेत्रातील व्यापारी संस्थांतही याच कायद्याचा वापर.

(औ) कामगारवर्गातून अधिकारीवर्गाची वाढती भरती व त्यांना लगेच प्रशिक्षणाची सोय. वृद्धकाली पेन्शन व बेकारी भत्ता या योजना आखून आस्ते आस्ते त्यांचा लाभ साऱ्या नागरिकांना मिळू शकेल असा संसोपाचा प्रयत्न असेल.

# सामाजिक कार्यक्रम

## जातपातींचे उच्चाटण

१ विषमता–विरोधी संघर्षास भारतात आणखी एक दालन आहे. राजकीय व आर्थिक समानतेचा लढा सामाजिक क्षेत्रात हीलढविला पाहिजे. सरंजामशाही-भांडवलशाही यांच्या शोषणविरोधी संघर्षाशी सामाजिक समानतेच्या लढयाची सांगड घातली तरच तो संघर्ष यशस्वी होऊ शकेल.

२ समानता व समान संधी यांचा एकच अर्थ लागत नाही व त्यांची व्याख्या एकच नाही ही गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे. जन्मावर आधारलेल्या धर्मसत्तेची व वर्णव्यवस्थेची चौकट हे जिथे आपल्या समाजाचे वैशिष्टय, तिथे केवळ समान संधीच्या तत्त्वातून सामाजिक समतेकडे वाटचाल करता येणार नाही. गुणवत्ता व पात्रता या संबंधीच्या प्रचलित कल्पनेमुळे प्रत्यक्ष व्यवहारात हरिजन, आदिवासी व मागासलेले वर्ग यांना संधी मिळत नाही, नाकारली जाते. वाजवी काळात समाजातील मागासलेल्या वर्गांनी पुढारलेल्या वर्गांना गाठावे यासाठी त्यांना विशेष संधी मिळवून देण्याच्या तत्त्वाचा आपण स्वीकार केला पाहिजे.

३ मागासलेपणाच्या कल्पनेची आधी व्याख्या केलीच पाहिजे. यासाठी पहिली कसोटी सामाजिक स्थानाचीच असेल. जातिसंस्थेत एखाद्या जाती-जमातीचे पारंपारिक स्थान कोणते आहे ? आर्थिक परिस्थिती, शैक्षणिक प्रगती व राजकीय सत्ता यांचाही या संदर्भात विचार केला पाहिजे. मागासलेपणाची व्याख्या ही दोन वर्गांच्या तुलनेच्या चौकटीतच केली जात असल्यामुळे, सदैव बदलल्या अशा या परिस्थितीत तिचा अर्थ कसा लावावा ? आज मागासलेल्या स्थितीत असलेला वर्ग आपला विकास करवून घेईल व मग कदाचित उच्चवर्णीयांच्या प्रवृत्ती याही वर्गात दिसू लागतील. अशा परिस्थितीत हा वर्ग ' जैसे थे ' चा समर्थक बनेल व मागासलेल्या वर्गांना विशेष संधी देण्याच्या तत्त्वास विरोध करू लागेल. याचाच अर्थ असा की कोणते वर्ग मागासलेले व कोणते वर्ग पुढारलेले याची वर्गवारीही बदलत्या परिस्थितीनुसार केली पाहिजे.

४ सद्य:परिस्थितीत मागासलेल्या वर्गांत हरिजन, आदिवासी, महिला, हिंदु समाजातील मागे पडलेले गट, आणि अल्पसंख्यांकातील अविकसित जमाती या सर्वांची गणना केली पाहिजे. भारताच्या एकूण लोकसंख्येतील ८० टक्क्यांपेक्षा अधिक लोक आज याच वर्गात मोडतात.

५ आर्थिक पिळवणूक व आर्थिक विषमता यांविरुद्धचा लढा, उत्पन्नावर कमाल मर्यादा व जमिनीचे फेरवाटप यांचा लढा, उच्चवर्णीय व सधन वर्गाने इतरांच्या पिळवणुकीसाठी चालविलेल्या इंग्लिश भाषेच्या वापराविरुद्ध व जनभाषांच्या प्रस्थापनेचा लढा आणि आर्थिक विकासाचा वेग झपाट्याने वाढविण्याचा लढा– या साऱ्या जनआंदोलनामुळे समान समाजाच्या निर्मितीस मोठाच हातभार लागेल. पण या आंदोलनांना, मागासलेल्या वर्गांना विशेष संधी व सवलती देण्याच्या हेतुपूर्वक धोरणाची साथ दिली पाहिजे. या तत्त्वाची सुस्पष्ट व्याख्या अशी—या मागासलेल्या वर्गासाठी सर्व क्षेत्रांतील किमान साठ टक्के जागा राखून ठेवल्या पाहिजेत.

६ भारतातील जनआंदोलनातील आजच्या उणिवांची पुढील कारण आहेत.

(अ) भारतातील प्रमुख राजकीय पक्षांवर उच्चवर्णीय पुढाऱ्यांचा पगडा.

(आ) आदिवासी, मागासलेल्या जाती या संघटनांचे जमातीवादी आणि एकांतवादी स्वरूप, उच्च वर्णीयांचे प्रभुत्व व जमातीवाद या दोन दुष्प्रवृत्तींपासून जनआंदोलनांना मुक्त करण्याचे काम संयुक्त सोशलिस्ट पार्टीने केले पाहिजे.

७ विशेष संधीच्या या तत्त्वास संसोपाने आचरणात आणले व संसोपाच्या उच्चवर्णीय कार्यकर्त्यांनी हा विशाल उदारमतवादी दृष्टिकोण अंगीकारला तर मागासलेल्या वर्गात नवविश्वास निर्माण होईल, संसोपा हा आपला पक्ष असल्याची भावना फैलावेल व वातावरण क्रांतिकारी होण्यास प्रचंड हातभार लागेल.

८ आपल्या हेतूंच्या पुराव्यादाखल संसोपा या तत्त्वाचा वापर (अ) पक्ष-समित्यांत व (आ) लोकसभा–विधान सभा–म्युनिसिपालिटी यांच्या तिकीटवाटपात करील.

९ मागासलेल्या वर्गातील विद्यार्थी–विद्यार्थिनींना वसतिगृह व शिष्यवृत्त्या यांच्या खास सवलती दिल्या पाहिजेत. व मुफ्त पाठ्यपुस्तके दिली पाहिजेत.

## शिक्षणविषयक धोरण

१ निरक्षरता दहा वर्षांत नाहीशी करण्यासाठी साक्षरता-सेना स्थापन केली पाहिजे.

२ शिक्षण-पद्धतीची फेररचना केली पाहिजे. विविध भाषांचे वरकरणी ज्ञान संपादण्यापेक्षा संबोधनावर व खऱ्या ज्ञानावर, तांत्रिक आणि वैज्ञानिक शिक्षणावर भर दिला पाहिजे.

३ आवश्यक असल्यास सकाळचे व संध्याकाळचे वर्ग चालवून समाजातील

अधिकाधिक घटकांना शिक्षणाची संधी व दारे खुली केली पाहिजेत. केवळ नोकऱ्यांत विशेष संधीचे तत्त्व वापरण्यात समाधान न मानता, सर्व शैक्षणिक संशोधनाची दालने प्रत्यक्षात सर्वांस खुली ठेवली पाहिजेत.

४ राष्ट्रीय संशोधन व रसायन शाळा ( लॅबोरेटरीज ) यांचीही पूर्णपणे नवरचना केली पाहिजे. ग्रामीण विकास, विकेंद्रीकरण व वाढती रोजगारी ही तीन उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून विज्ञानाची उद्योगधंद्यांशी व छोटया यंत्रांच्या निर्मितीशी सांगड घातली पाहिजे.

५ जातीय नावाच्या शैक्षणिक संस्थांना सरकारी मदत दिली जाऊ नये.

६ सरकारी व खाजगी शाळामास्तरांच्या वेतनमानात, सुखसोयी इत्यादीत कोणताही फरक असता कामा नये.

## प्राथमिक शिक्षण

प्राथमिक शिक्षण हे केवळ मुक्त व सक्तीचेच नव्हे तर, एकसाची व सर्वांस सारखेच असले पाहिजे. साऱ्या खास खाजगी प्राथमिक शाळा रद्द केल्या पाहिजेत.

## महिला व युवक

१ खेडयापाडयांतील महिलांच्या हालअपेष्टा कमी करण्यासाठी स्पर्धापद्धतीने संडास त्वरित बांधले पाहिजेत व नळाच्या स्वच्छ पाण्याची सोय केली पाहिजे.

२ शारीरिक संस्कृती, युवक केंद्रे व खेळ यांना सरकारने अशा तऱ्हेने उत्तेजन द्यावे की ऑलिंपिक क्रीडास्पर्धात भारताची कामगिरी सुधारली पाहिजे.

३ आंतर-वर्ण विवाह करणाऱ्यांना सरकारी नोकऱ्यांत प्राधान्य दिले पाहिजे. सर्व सरकारी नोकरांना वर्षांत किमान दोनदा एका पंक्तीत जेवण्याची सक्ती केली पाहिजे.

## भाषाविषयक धोरण

१ जनतेच्या दृष्टिकोणातूनच भाषेच्या प्रश्नाचा विचार केला पाहिजे.

२ आपल्या सार्वजनिक जीवनातून इंग्रजी भाषेचे तावडतोब उच्चाटन व्हावे अशी संयुक्त सोशलिस्ट पार्टीची भूमिका आहे. राज्यकारभार व शिक्षण यांचे माध्यम म्हणून इंग्लिशचा वापर करण्यास संसोपाचा अनेक कारणामुळे विरोध आहे.

३ प्रथमतः इंग्रजी आहे एक सर्वस्वी परकीय भाषा. एका छोटया अल्पसंख्याक गटालाच तिचे पुरेपूर आकलन होईल.

४ इंग्लिश भाषेचा वापर असाच चालू ठेवल्यामुळे शिक्षणाच्या प्रसारास अडथळा येतो, खऱ्या ज्ञानापेक्षा वरवरचे वाक्प्रचार वापरण्याची वृत्ती वळावते व एका परदेशी भाषेवर प्रभुत्व मिळविण्याच्या खटाटोपातच विद्यार्थ्यांची मेहनत व ताकद खर्ची होते. इंग्लिशचा वापर चालू ठेवल्यामुळे, संकुचित छोटयाश वर्गाच्या हातात सत्ता केंद्रित होते आणि सार्वजनिक व्यवहारात जनतेला सहभागी

होऊ दिले जात नाही. त्यामुळे एका अति छोटया वर्गात तुसडेपणाची, उद्धटपणाची भावना निर्माण होते तर जनतेच्या मनात न्यूनगंड घर करू लागतो. या साऱ्या गोष्टीमुळे आपल्या राष्ट्रीय मानहानीचे सदैव स्मरण होत रहाते.

५ इंग्रजीचे उच्चाटन ही लोकशाहीवादी मागणी आहे. आपल्या राज्यातील सार्वजनिक व्यवहारासाठी आपापल्या भाषेचा वापर करण्याच्या भूमिकेतूनच, भाषेच्या आधारावर देशाची पुनर्रचना करण्यात आली. या मूलगामी सुधारणेविना भाषावार प्रांतरचना फोल ठरते !

६ पुढील गोष्टींच्या आधारावर भाषा-पद्धती आखली पाहिजे, निर्मिली पाहिजे.

(अ) हायकोर्ट व इतर कोर्टस्, शिक्षण आणि राज्यकारभार यांचे माध्यम म्हणून, राज्य-पातळीवर प्रांतिक भाषांनी इंग्रजीचे स्थान पटकावले पाहिजे.

बिगर-हिंदी भाषिक राज्यात हिंदीचा वापर स्वेच्छेचा असला पाहिजे.

( आ ) हिंदी भाषिक राज्यांत शिक्षण व राज्यकारभार यांचे माध्यम म्हणून हिंदीने इंग्रजीची जागा घेतली पाहिजे.

( ई ) टेलिप्रिंटरच्या कामासाठी इंग्लिशऐवजी हिंदी व प्रांतिक भाषा यांचा वापर केला पाहिजे. इंग्लिश भाषेतील दैनिकांना सरकारी किंवा सरकारी संस्थांच्या जाहिराती देणे बंद केले पाहिजे आणि त्या पैशाचा विनियोग भारतीय भाषांतील वर्तमानपत्रे स्थापण्यास व मजबूत करण्यांस केला पाहिजे.

( इ ) हिंदी भाषिक विभागात, राज्यपातळीप्रमाणे केंद्रीय पातळीवरील व्यवहारातही ( सर्व केंद्रीय खात्यांत ) हिंदीने इंग्लिशची जागा घेतली पाहिजे. बिगर-हिंदी भाषिक राज्यांना, त्यांच्या मर्जीनुसार, केंद्रीय पातळीवर व केंद्रीय कामासाठी इंग्रजीचा वापर करता येईल. पण बिगरहिंदी भाषिक राज्यांतील केंद्रीय कचेऱ्यांचे कामकाज इंग्रजीऐवजी त्या त्या राज्यांच्या भाषांतून चालले व इंग्रजीचे तावडतोब उच्चाटन झाले तर संसोपास अधिक आनंद होईल. यात बिगर-हिंदी भाषिक राज्यांवर हिंदी लादण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही व तशी गल्लत कोणी करू नये, हे संसोपास येथे स्पष्ट करावेसे वाटते.

( उ ) बिगरहिंदी भाषिक प्रदेशांत, हिंदीच्या माध्यमातून शिकविणारी काही केंद्रीय विश्वविद्यालये असली पाहिजेत.

(ऊ) शाळा-कॉलेजांच्या अभ्यासक्रमात इंग्लिश हा सक्तीचा विषय असू नये. केवळ इंग्लिश भाषेच्या ज्ञानाच्या अभावामुळे भारतातील सर्वोच्च मानाची जागा कोणासही नाकारली जाता कामा नये.

(ओ) विश्वपरिचय किंवा विश्वज्ञान यांचे दालन खुले होण्यासाठी इंग्लिश भाषा आत्मसात केली पाहिजे ही कल्पना संयुक्त सोशलिस्ट पार्टीस चुकीची वाटते. रशियन, जपानी, चिनी, स्पॅनिश, जर्मन आदी भाषा ऐच्छिक विषय घेऊन त्यांचा

अभ्यास करण्यास संसोपा उत्तेजन देईल. या भाषांतून सरळ सरळ—म्हणजेच इंग्रजीसारख्या भाषेच्या माध्यमातून नव्हे—भारतीय भाषांत भाषांतरे करण्यासाठी संसोपा उत्तेजन देईल.

(औ) लोकसभेतील एकाच वेळी अनेक भाषांत भाषांतर करण्याच्या पद्धतीत साऱ्या भारतीय भाषा समाविष्ट केल्या जाव्यात असे संसोपास वाटते. म्हणजेच बिगर-हिंदी भाषिक खासदार आपापल्या मातृभाषेतून बोलू लागतील.

साऱ्या क्षेत्रांत भारतीय भाषांचा प्रत्यक्ष वापर झाला तरच त्या समृद्ध होतील. त्या समृद्ध होईपर्यंत वाट पहाण्याचा साधा अर्थ असा की त्या कधी वापरल्याच जाणार नाहीत याची दक्षता घेणे ! संसोपाच्या मते संस्कृत, पर्शियन आदी भाषांचा वारसा भारतीय भाषांकडे आलेला आहे व त्यामुळे त्या महान भाषा होऊ शकतील. पण त्यासाठी आधुनिक कामाकरता त्यांचा सदैव वापर करणे अत्यावश्यक आहे.

## आदिवासी

१ सध्याचे जाचदायक जंगलकायदे आणि पोलिस व जंगल अधिकारी यांचा त्रास, यांतून आदिवासींना मुक्त केले पाहिजे. जंगलव्यवस्थापनात आदिवासींना भागीदार करून त्यांना जंगल-नियंत्रणास जबाबदार केले पाहिजे.

२ जळण-सरपण व झाडाची पाने गोळा करण्याच्या आदिवासींच्या हक्कांना जपले पाहिजे.

३ जंगल विभागात सध्या घातलेल्या, पण पूर्वी नांगरल्या जाणाऱ्या आदिवासींच्या जमिनी त्यांना परत केल्या पाहिजेत.

४. नववसाहती व शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या नवनवीन जमिनी यांत आदिवासी व हरिजन यांना प्राधान्य दिले पाहिजे.

५ आदिवासी व हरिजन यांना घरबांधणीसाठी नव्या जागा पुरविल्या पाहिजेत.

## समाजविकास

नोकरशाहीची उधळपट्टी आणि राज्यकारभाराचा नित्याचा खर्च यांवर, समाज विकास योजनांच्या नावाखाली होणारा वारेमाप खर्च थांबवून, गरीब शेतकऱ्यांना मदत करणारी ग्रामीण मदतीची नवी समाज-विकास योजना आखली पाहिजे.

खेड्यांतील सहकारी प्रवृत्तीस व चळवळीस सरकारतर्फे कमाल उत्तेजन दिले पाहिजे.

# उच्चपदस्थांच्या भ्रष्टाचाराचा प्रश्न

कामराज योजनेनुसार बढती मिळून गृहमंत्री बनलेल्या श्री. गुलझारीलाल नंदांनी १९६३ अखेरीस उच्च रवाने एक नाट्यपूर्ण घोषणा केली. उच्चपदस्थांच्या भ्रष्टाचाराचा प्रश्न सोडविण्याचा आपण निर्धारपूर्वक प्रयत्न करू, व त्यात आपल्याला अपयश आल्यास आपल्या उच्चपदाचा राजीनामा देऊ अशी त्यांची ही घोषणा होती.

भ्रष्टाचार नाहीसा करून देशाची नीतिमत्ता सुधरविण्यासाठी नंदाजींनी भारत सेवक समाज व भारत साधु समाज यांच्या नेतृत्वाखाली सदाचार समित्या संघटित करण्यातही पुढाकार घेतला.

राज्यकारभार स्वच्छ असावा आणि आर्थिक उलाढाली प्रामाणिकपणाच्या असाव्यात यासाठी कोणती धोरणे आखली गेली आणि ती कितपत यशस्वी झाली ? गेल्या तीन वर्षांतील सरकारी कामगिरीचा आज आढावा घेतल्यास या प्रश्नांची नकारार्थी व निराशाजनक उत्तरे मिळतात. श्री. नंदांना आपला प्रभाव पाडता आला नाहीच, पण खुद्द त्यांनाच बिनबोभाट स्थानभ्रष्ट करण्यात आले! भ्रष्टाचार-विरोधी नंदाजींचा दुबळेपणा त्यांना स्वतःलाच असा नडला.

भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी श्री. संथानम् यांच्या नेतृत्वाखाली नेमण्यात आलेल्या उच्च पातळीवरील समितीने, राज्ययंत्रणेतील लाचलुचपतीचा प्रश्न मिटविण्यासाठी 'दक्षता–समिती' स्थापण्याची सूचना केली होती. किमान १० आमदारांनी एखाद्या मंत्र्याविरुद्ध आरोप केल्यास त्याची चौकशी करण्यासाठी एक राष्ट्रीय मंडळ ( पॅनल ) स्थापावे अशीही शिफारस संथानम् समितीने केली होती. समितीचे म्हणणे असे होते की—" पंतप्रधानांच्या सल्ल्यावरून राष्ट्रपतींनी एक राष्ट्रीय मंडळ नेमावे आणि मंत्र्यांवरील आरोपांची चौकशी करावयाची असेल तेव्हा राष्ट्रपतींनी या मंडळातून एक तात्पुरती समिती नेमावी. आमच्या मते हाच रास्त मार्ग आहे. . .सत्कृद्दर्शनी या आरोपात कितीपत तथ्य आहे याची शहानिशा करणे हे या समितीचे कर्तव्य असावे. योग्य प्रसंगी केंद्रीय पाहणी खात्यास ( सी. बी. आय. ) चौकशी करून अहवाल सादर करावयाचा आदेश देण्याचा अधिकार या समितीस असला पाहिजे. . . ."

१९६३ ते १९६६ या तीन वर्षांच्या कालखंडात पंजाब, ओरिसा, काश्मीर, बिहार, राजस्थान व म्हैसूर या ६ राज्यांच्या मुख्य मंत्र्यांविरुद्ध आणि केंद्रीय अर्थमंत्री श्री. टी. टी. कृष्णम्माचारी यांच्याविरुद्ध पंतप्रधानांकडे अथवा राष्ट्रपतींकडे निवेदने सादर केली गेली. बिहार व राजस्थान यांच्या मुख्य मंत्र्यांविरुद्ध तर दोन-दोन निवेदने सादर केली गेली !

पंजाबचे मुख्य मंत्री कै. कैरों यांच्याविरुद्ध फारच गंभीर स्वरूपाचे आरोप होते. पंजाबमधील संयुक्त आघाडीच्या नेत्यांनी आणि पंजाबच्या सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठित असलेल्या अनेक व्यक्तींनी हे आरोप वारंवार केले. अखेर अतिशय नाईलाजास्तव पंतप्रधान नेहरूंनी, या आरोपांची चौकशी करण्यासाठी माजी प्रमुख न्यायाधीश श्री. दास यांच्या एकसदस्य चौकशी कमिशनची नेमणूक करण्यास होकार दिला.

श्री. नेहरूंच्या निधनानंतर दास कमिशनने आपला अहवाल सादर केला. पंजाबच्या मुख्य मंत्र्यांचे व्यवहार लवाडीचे आहेत असे या अहवालात चक्क म्हटले असल्यामुळे , श्री. कैरों यांनी मुख्य मंत्रिपदाचा त्याग करावा अशी त्यांची मनधरणी काँग्रेसच्या बडचा बडचा नेत्यांनी केली.

ओरिसाचे मुख्यमंत्री श्री. बिरेन मित्रा आणि ओरिसाचे माजी मुख्य मंत्री श्री. बिजू पटनाईक यांच्या प्रकरणी वेगळी पद्धत वापरण्यात आली.

केंद्रीय गृहखात्याच्या हाताखाली वेगवेगळचा फाइल्स व कागदपत्ने अभ्यासण्याचा आदेश केंद्रीय पाहणी खात्यास ( सी. बी. आय. ) दिला गेला. या पाहाणीच्या आधारावर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या एका उपसमितीने निर्णय घेतला की जबाबदार जनसेवकांकडून अपेक्षित असलेल्या उच्चपातळीपासून ओरिसाचे हे आजीमाजी मुख्यमंत्री ढळले व त्याबद्दल त्यांना या अधिकारपदावरून मोकळे केले जावे.

म्हैसूर व बिहारच्या मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत आणखीच एक वेगळी पद्धत अवलंबिली गेली. त्यांच्या विरुद्ध केलेल्या आरोपांचा खुलासा केंद्रीय गृहमंत्र्यांनी आपल्याकडे मागवला व आपणच असा निवाडा केला की सकृत्दर्शनी त्या आरोपात तथ्य दिसत नाही आणि हे प्रकरण तिथेच मिटविण्यात यावे.

मध्यंतरीच्या कालखंडात माजी अर्थमंत्री श्री. टी. टी. कृष्णम्माचारी यांच्याविरुद्ध एक आरोपपत्र तयार केले गेले आणि या आरोपांची शहानिशा करण्यासाठी राष्ट्रपतींनी स्वतंत्र न्यायालयीन चौकशी सुरू करावी अशी मागणी ११ सभासदांनी केली. यावर पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींनी वेगळाच उपाय सुचविला. या आरोपपत्रातून अर्थमंत्र्यांविरुद्ध प्राथमिक केस उभी केली गेली आहे का याविषयी सुप्रीम कोर्टाच्या प्रमुख न्यायमूर्तींचा सल्ला आपण घेऊ व मगच आपले मत बनवू असे शास्त्रीजी म्हणाले. पण श्री. कृष्णम्माचारींनी या गोष्टीस विरोध दर्शविला.

त्यांच्या मतें अर्थमंत्री व पंतप्रधान यांचे संबंध इतके घनिष्ठ होते की हा निर्णय एखाद्या त्रयस्थावर सोपविण्याची जरुरी नव्हती; शिवाय एवढ्या महत्त्वाच्या जागी असलेल्या आपल्या सहकाऱ्याविषयी पंतप्रधानांच्या मनात तिळमात्र शंका असली तर त्यांना (कृष्णम्माचारींना) मंत्रिमंडळातून वगळणेच योग्य. या सूचनेस शास्त्रीजींनी काही संमती दिली नाही व आपल्या जागेचा राजीनामा देण्याचा निर्णय कृष्णम्माचारींनी घेतला.

ही वेगवेगळी प्रकरणे आणि त्यासाठी सरकारने वापरलेल्या वेगवेगळ्या पद्धती यांवरुन एकच गोष्ट दिसून येते व ती म्हणजे उच्चपदस्थांच्या भ्रष्टाचारासारख्या महत्त्वाच्या प्रश्नास सुस्पष्ट तत्त्वांची कसोटी लावण्यास सरकार धजले नाही—मग एकीकडे सरकार कितीही शौर्याच्या घोषणा करो! वैयक्तिक गटबाजीच्या व पक्षीय दडपणामुळे सरकारचा हा प्रयत्न फसला.

गेल्या दोन वर्षांत सरकारला असे अनेक प्रश्न विचारण्यात आले होते की ज्यांची उत्तरे प्रामाणिकपणे दिली गेली असती तर या उच्चपदस्थांची वशिलेबाजी, पक्षपात व लाचलुचपत यांना आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याचा प्रयत्न बराचसा सफल होऊ शकला असता. मंत्री व त्यांचे चिटणीस यांच्याहून फक्त एक पिढीच्या अंतरावर असलेल्या त्यांच्या जवळच्या नातेवाइकांना कोणतेही परमिट-लायसन्स दिले जाऊ नये अशीही सूचना करण्यात आली होती.

सेवानिवृत्त मुलकी अधिकाऱ्यांना खाजगी क्षेत्रात (प्रायव्हेट सेक्टर) नोकरी करू न देण्याचे धोरण सरकारने पुढे चालवावे असाही प्रयत्न करून बघण्यात आला. एक व्यक्ती अशा तऱ्हेने दोन्ही क्षेत्रात वावरल्यामुळे पक्षपात व भ्रष्टाचार बळावतो या भूमिकेतूनच हा प्रयत्न झाला. न्यायासनाचे स्वातंत्र्य सुरक्षित राखण्यासाठी, न्यायाधीशांचा उपयोग न्यायालयीन कामासाठीच व्हावा व न्यायाधीशांची नेमणूक राजदूत व मंत्री म्हणून केली जाऊ नये, हा संकेत सरकारने पाळावा असे विरोधी पक्षाचे म्हणणे होते.

पण या साऱ्या बाबतींत आलेल्या अनुभवाचे सार असे आहे की मंत्र्यांच्या विरुद्ध केलेल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी कोणतेही मार्गदर्शक तत्त्व मानण्यास सरकार उत्सुक नव्हते.

परमिट—लायसन्स यांच्या साऱ्या अर्जांची छाननी करण्यासाठी एक स्वतंत्र मंडळ नेमावे ही साधी सूचनाही सरकारला पसंत पडली नाही.

सरकारी पुढारी समाजवादाच्या गप्पा अहोरात्र खुशाल मारोत, पण मालमत्तेच्या प्रश्नासंबंधींच्या त्यांच्या दृष्टिकोणाशी समाजवादी आदर्श पूर्णपणे विसंगत आहेत. सरकारी पुढारी, वडेबडे सरकारी अधिकारी आणि व्यापारी यांची १९ वर्षांपूर्वीची संपत्ती व जीवनमान, आणि त्यांचीच आजची मालमत्ता, उत्पन्न व खर्च

या दोन गोष्टींची तूलना व चौकशी केल्यास महात्मा गांधींच्या उच्च आदर्शापासून ही मंडळी ढळल्यामुळे त्यांचे किती अध:पतन झाले आहे तेही स्पष्ट होईल. संपत्ती, मालमत्ता, थाटमाट आणि भपका यांच्या हव्यासातूनच हा हाहाकार माजला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील पुढाऱ्यांच्या मालमत्तेच्या काही भागाचे राष्ट्रीयीकरण न केल्यास, आणि त्यासंबंधी काही ठाम भूमिका न घेतल्यास, लाचलुचपत व काळा पैसा यांचा प्रश्न कधीच सुटणार नाही. या क्रांतिकारी सूचना अमलात आणण्यास आजचे काँग्रेस सरकार असमर्थ आहे. व म्हणूनच भ्रष्टाचार नष्ट करण्यासाठी संयुक्त सोशलिस्ट पार्टी पुढील चार कलमी कार्यक्रम सुचवीत आहे.

१ दहा आमदारांनी मागणी केल्यास, मंत्र्यांवरील लाचलुचपतीच्या आरोपांची स्वतंत्र न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे.

२ सेवानिवृत्त झालेल्या मुलकी सेवकांना खाजगी कंपन्यात नोकरी स्वीकारता येणार नाही.

३ हायकोर्टातील व सुप्रीम कोर्टातील आजी-माजी न्यायाधीशांना, न्यायालयीन स्वरूपाचेच काम दिले जाईल.

४ कोणताही मंत्री व चिटणीसपदावरील मुलकी अधिकारी यांच्या पुढेमागे असलेल्या एका पिढीतील त्यांच्या जवळच्या नातेवाइकांना परमिट-लायसन्स दिली जाणार नाहीत.

# संरक्षण धोरण

आशिया खंडातील आणि साऱ्या दुनियेतील बदलती परिस्थिती आणि तंत्रशास्त्र व संहारक शस्त्रनिर्मिती यांची अविरत क्रांती, या दोन गोष्टींच्या संदर्भातच भारताच्या संरक्षणाचा प्रश्न अभ्यासला पाहिजे.

साम्राज्यशाहीच्या सुवर्णयुगात, भारतातील आपले हितसंबंध जपण्यासाठी ब्रिटिशांनी एक विशिष्ट संरक्षणव्यवस्था संघटित केली. नौदलाचे तळ, लष्करी चौक्या आणि आपल्या आधिपत्याखालील प्रदेश यांचे जाळे ब्रिटिशांनी विणले ते अशा हेतूने की नेपोलियनचा फ्रान्स, झारचा सोव्हिएट रशिया आणि उफाळणारा जपान यांच्या खऱ्या किंवा कल्पित हल्ल्यांपासून आपले संरक्षण तर व्हावेच—पण आपल्या आवडत्या वसाहतींशी दळणवळणाचे रस्तेही नेहमी खुले रहावेत.

भारतातील ब्रिटनची राजकीय भूमिका हा या संरक्षण योजनेमागील मुख्य मुद्दा होता. भारतातून ब्रिटिश फौजा मागे घेण्यात आल्यामुळे ही योजना व ही आखणी कोसळली. स्थानिक जनता चूपचाप असून प्रभुत्वासाठी दोन प्रतिस्पर्धी साम्राज्यशाही शक्ती झगडत आहेत या जुन्या चित्राऐवजी आता चित्र दिसते ते स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्रांचे. व या नव्या संदर्भातच भारताच्या संरक्षणाचा विचार झाला पाहिजे.

भारतातील व इंडोचायना विभागातील ब्रिटिश साम्राज्य लयास गेले आणि 'त्याच्या जागी' छोटीमोठी राष्ट्रे निर्माण झाली. त्यामुळे या राष्ट्रांसाठी व या साऱ्या भूप्रदेशासाठी संरक्षणाचे नवे प्रश्न निर्माण झाले. राष्ट्रवादाच्या लाटेने जुना साम्राज्यवादी ढाचा साफ धुऊन काढला, पण त्याच्या जागी नवी बुद्धिवादी चौकट काही उभारली गेली नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा कालखंड अनेक कारणांमुळे विलक्षण महत्वाचा होता. हा कालखंड बदलाचा, स्थित्यंतराचा कालखंड होता. आपला पुराणकालीन वारसा आणि महात्मा गांधी यांच्यामुळे भारतास सर्वत्र प्रतिष्ठा लाभलेली होती व दुनियेतील गुलाम जनतेत तर भारताचा लौकिक फार मोठा होता. शेजारच्या राष्ट्रांतील घटनांवर आपली छाप उमटविण्याचे सामर्थ्य त्या वेळी भारताच्या अंगात होते.

## गमावलेल्या संधी

जगाच्या इतिहासात असे काही कालखंड येतात की जेव्हा ऐतिहासिक घडामोडींना नवे वळण देता येते व त्यांच्या पाठोपाठ असेही कालखंड येतात की जेव्हा आंतरराष्ट्रीय संबंध स्थिरावलेले व साचेबंध बनतात. अशा घटना घडल्यानंतर धोरणांची दिशा सहजासहजी बदलता येत नाही व जुन्या धोरणाचे परिणामही चटकन धुऊन काढता येत नाहीत. दुसऱ्या महायुद्धानंतरचा जमाना हा असा एक कालखंड होता. साम्राज्यशाही झपाट्याने अस्तास जात होती व सामाजिक परिवर्तनाच्या चवळवळीकडे प्रथमच सारी सूत्रे जात होती. दुनियेतील दोन देशांची दोन जबरदस्त गटांत फाळणी होण्यास तेव्हा अशी भीतिदायक चालना मिळाली नव्हती किंवा या दोन गटांच्या लष्करी करारांनी आशियाई देशांना जखडून टाकलेले नव्हते. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान या नात्याने नेहरूंना दक्षिण आशियाई देशातील संबंधांची नवरचना करता आली असती, अॅटलांटिक आणि सोव्हिएट गटांपासून अलिप्त असलेली संरक्षण योजना आखता आली असती. पण नेहरूंनी ही महान संधी वाया दवडली.

संरक्षण योजनेची क्रांतिकारक फेररचना करण्याच्या मार्गात भारतापुढे अनेक अडथळे उभे होते ही गोष्ट खरी आहे. भरतखंडाच्या फाळणीमुळे कोणताच प्रश्न सुटला नाही. उलट त्यामुळे भारताच्या रक्षणाचा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा झाला आणि आंतरराष्ट्रीय संबंध अधिकच बिघडले. फाळणी हा फारतर दबावाखाली मान्य केलेला तात्पुरता तोडगा होता. पण काँग्रेसी पुढाऱ्यांनी त्याला अंतिम निर्णयाचे स्वरूप दिले. भारत-पाक वादात नाक खुपसून या दोन राज्यांना एकमेकांविरुद्ध लढविण्याची संधी त्यामुळे परदेशी सत्तांना मिळाली.

फाळणीचा दुसरा परिणाम असा झाला की भरगच्च संरक्षण-अंदाजपत्रकाचा भार भारतीय अर्थरचनेवर पहिल्यापासून पडला. १९४७–४८ मधील काश्मीर युद्धात आपली हजारो माणसे मृत्युमुखी पडली व त्याचबरोबर फारमोठी आर्थिक हानीही भारताला सोसावी लागली. या युद्धाचा शेवट अकस्मात झाला आणि परकीय दडपणामुळे झालेल्या शस्त्रसंधीनुसार काश्मीरचा किमान एकतृतीयांश भाग पाकिस्तानी आक्रमकांच्या हाती राहिला. युद्धविरामाची सरहद्दही मोठी अजब होती व काश्मीर–लडाखबरोबरील भारताचे दळणवळणाचे पहिले मार्ग त्यामुळे असुरक्षित राहिले. अमेरिकेबरोबरील करार आणि पश्चिम आशियाई व दक्षिण आशियाई लष्करी करार यांमुळे पाकिस्तानला अशी एक संरक्षणयंत्रणा उभारता आली की जिचा भार एरवी पाकिस्तानी अर्थव्यवस्थेस पेलणे अशक्य होते. पाकिस्तानची फौज वाढली व अधिक सुसज्ज बनली याचा परिणाम साहजिकच असा झाला की भारतासही शस्त्रास्त्रांवरील आपला खर्च वाढवावा लागला. छोट्या

प्रमाणावरील शस्त्रास्त्र-शर्यतीस अशी सुरवात झाली. या शर्यतीचा ताण भारताच्या आर्थिक घडीवर पडला आणि आपल्या परराष्ट्रधोरणातील उपक्रमशीलता नाहीशी होऊ लागली.

आणि भारत-पाक संबंधात हस्तक्षेप करण्यामागील अमेरिकन उद्दिष्ट नेमके हेच होते! पाकिस्तानी राजकारणी नेत्यांच्या भारत-विरोधी प्रवृत्तीचा अमेरिकेने मोठ्या धूर्तपणे उपयोग करून घेतला व भारतापेक्षा पाकिस्तानी लष्कर श्रेष्ठ बनविण्याचे आमिष त्यांच्या डोळ्यासमोर नाचविले. सोव्हिएट गटास पुरेपूर वेढणे आणि भारताच्या औद्योगिक विकासास खीळ घालून अमेरिकन मदती-साठी भारतास लाचार बनविणे या दोन्ही गोष्टी अमेरिकेने एका फटक्यात साधल्या.

या कारवायांपासून केवळ पोलादी निर्धार आणि इच्छाशक्ती भारतास वाचवू शकली असती. पण संरक्षण आणि परराष्ट्र धोरण या बाबतींत ब्रिटिशांनी घालून दिलेली चाकोरी सोडण्याची तयारी नेहरूंच्या भारताने दाखविली नाही.

चीनमधील घालमेल लक्षात घेता, शांत हिमालयीन सीमारेषा स्फोटक बनेल ही गोष्ट कोणत्याही डोळस माणसास सांगावी लागली नसती. एखाद्या दमदार पंतप्रधानाने या हिमालयीन राज्यांना परदेशी नियंत्रणापासून व स्थानिक सरंजाम-शाहीपासून मुक्त करण्याचे धोरण पत्करले असते. स्वतंत्र भारताच्या पहिल्या पंतप्रधानांनी तिबेटला स्वतंत्र राज्याचा दर्जा बहाल केला असता आणि नेपाळ-भूतान-सिक्कीम राज्यांत लोकशाहीवादी बदल घडवून आणण्यात सक्रिय मदत केली असती. याउलट आपल्या आत्मघातकी धोरणामुळे चिनी संकट थेट आपल्या दरवाज्यापर्यंत येऊन थडकले!

या साऱ्या गोष्टी आता इतिहासजमा झाल्या असून त्यांची चर्चा करण्यामुळे आजच्या प्रश्नांचे उत्तर कसे सापडेल, असा प्रश्न यावर विचारला जाईल. या प्रश्नाचे साधे उत्तर असे की केवळ आपल्या शासनाच्या कालखंडापुरता विचार करणे हे अहंमन्य राजकारणी माणसाचे लक्षण आहे. दूरगामी विचारांचा विचार करण्यातच मुत्सद्दीपणा दिसतो. एखाद्या देशाचा संरक्षणाचा विचार हा पोकळीत केला जाऊ शकत नाही. आपण असा विचार करतो की देशाच्या सार्वभौमत्वास धोका कुणाचा आहे? कारण, आक्रमकांविषयीच्या आपल्या अंदाजावरूनच आपल्या फौजांची कामगिरी सुस्पष्ट होऊ शकते व शस्त्रास्त्रे योग्य व पुरेशी आहेत की नाही याचा आढावा घेता येतो.

सोव्हिएट रशिया किंवा अमेरिका यांच्याशी आपला लष्करी तंटा होईल असा अर्थातच भारताचा आडाखा नाही. या दोन्ही देशांशी आपले संबंध मित्रत्वाचे आहेतच; शिवाय त्यांच्या शस्त्रसामर्थ्यास आपण तोंड देऊ शकू हा विचारच कमालीचा अवास्तव आहे. आपली इच्छा असली तरीही ही गोष्ट नजीकच्या काळात अशक्य

आहे. एकमेकांचा नाश करण्याचे सामर्थ्य आज या दोन बड्या राष्ट्रांत आहे आणि भारताचा नाश करण्याचे सामर्थ्य त्यांच्या हातात आहे ही गोष्ट विवाद्य ठरते.

वास्तववादी दृष्टिकोणांतून विचार केल्यास, या दोन बड्या राष्ट्रांचा हस्तक्षेप टाळून, एखाद्या सार्वभौम देशाचा संपूर्णपणे लष्करी पाडाव करण्याची ताकद, या दोन बड्या राष्ट्रांखेरीज आज तिसऱ्या राष्ट्रात नाही. या दोन बड्या राष्ट्रांचे मतैक्य असल्यास ते इतर देशातील कोणतेही असले युद्ध लगेच थांबवतील, आणि त्यांच्यातच मतभेद असल्यास जागतिक युद्ध भडकू शकेल.

१९६२ च्या ऑक्टोबर महिन्यात चीनने आपल्या उत्तर सीमेवर केलेला हल्ला आणि चिनी फौजांची अचानक व एकतर्फी माघार या दोन घटनांवरून हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. अमेरिका-रशिया या दोन बड्या राष्ट्रांच्या दडपणामुळे माघार घेतल्याचा इन्कार चीनने वरवर केला असला तरी या दोन बड्या राष्ट्रांशी मोठ्या स्वरूपाचा झगडा टाळण्याच्या भूमिकेतूनच चीनने माघार घेतली ही गोष्ट स्पष्ट आहे. चीनच्या लष्करी कारवाया रशियास मान्य नव्हत्या आणि चिनी फौजांच्या आगेकुचीबरोबर अमेरिकन हस्तक्षेपाची शक्यताही वाढू लागली होती. या दोन्ही घटनांची चीनला दखल घ्यावीच लागली.

कच्छच्या रणातील भारत-पाक संघर्षात आणि त्यानंतर १९६५ च्या सप्टेंबर महिन्यातील काश्मीर व पश्चिमी आघाडीवरील भारत-पाक संघर्षात हीच गोष्ट दिसून आली. भारत व पाक या दोन देशांत विशाल प्रमाणावर युद्ध जुंपण्यास दोन्ही बड्या राष्ट्रांचा विरोध होता. या वेळी शस्त्रसंधीसाठी अमेरिकी व रशियन हस्तक्षेप आग्रही व जोरदार स्वरूपाचा होता. युद्धविरामासाठी राजकीय,राज नैतिक व लष्करी दडपणांचा वापर उभय बड्या राष्ट्रांनी मुक्तहस्ते केला.

या साऱ्या आंतरराष्ट्रीय झगड्यात, चीनबरोबरील १९६२ च्या सीमातंट्यातील भारतीय शस्त्रांचा पराभव काय किंवा १९६५ मधील भारताची पाकिस्तानवरील तथाकथित मात काय हे दोन्ही जयापजय कोणत्याही कसोटीवर निर्णायक स्वरूपाचे मानता येणार नाहीत. या दोन्ही प्रसंगी भारताला जे राजकीय धक्के बसले त्याला कारणीभूत होता खंबीर राष्ट्रीय इच्छाशक्तीचा अभाव व आपली चुकीची धोरणे.

चीन-पाकिस्तान यांच्या आगामी आक्रमणापासून आपल्या सीमांचे संरक्षण करण्यासाठीच नव्हे तर गेलेली भूमी परत मिळविण्यासाठी संरक्षण धोरण आखले पाहिजे. शस्त्रास्त्रांच्या सज्जतेपेक्षाही ही खरी राजकीय व राष्ट्रीय इच्छाशक्तीतील चुरस आहे. खंबीर राष्ट्रीय उद्दिष्टांची जाणीव व आर्थिक कोंडी यामुळे आपल्या सुरक्षा योजनेतील उणीवा निर्माण झाल्या व या उणीवांमुळे आपले परराष्ट्रधोरण व संरक्षण धोरण फसत गेले. या उणीवा भरून निघेस्तोवर, १९४७ मधील

…ग्रंथ संग्रहालय, ठाण. स्थापना
अनुक्रम ७५८२४ वि: निबंध
क्रमांक २९२२ नों: दि: २१/३/०१



सीमा पुन्हा प्रस्थापित करण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट सफल होणार नाही.

सर्व आघाड्यांवरील सर्व प्रतिस्पर्ध्यांच्या शस्त्रास्त्रांच्या तोडीची शस्त्रास्त्रे बाळगण्याच्या कल्पनेवर भारताची संरक्षण योजना प्रामुख्याने किंवा संपूर्णपणे अवलंबून राहाणार असेल तर मात्र आपल्यापुढे मोठा धोकाच निर्माण होईल. याचे कारण असे की संरक्षणाचे अंदाजपत्रक आणि शस्त्रास्त्रांची व युद्धसाहित्याची खरेदी यासंबंधीचे निर्णय मग दिल्लीस स्वतंत्रपणे घेता येणार नाहीत; प्रथमत: कराची व नंतर वॉशिंग्टन यांच्या निर्णयानुसार हे निर्णय घेतले जातील !

## महत्त्वाचे चार मुद्दे

विमाने, टँक्स आणि इतर महागड्या पण रूढ शस्त्रास्त्रांचा छोटासा संच भारताकडे, आहे पण या शस्त्रसंचयाच्या तौलनिक आधुनिकतेवर भारताचे संरक्षण अवलंबून नाही. संरक्षण योजनेत या शस्त्रांचे स्थान महत्त्वाचे आहेच पण केवळ त्यांच्यावरच आमच्या संरक्षणाची भिस्त आहे असे मानणे चुकीचे ठरेल.

शास्त्रशुद्ध संरक्षण धोरणातील महत्त्वाचे चार मुद्दे पुढीलप्रमाणे :– (१) सुस्पष्ट राष्ट्रीय उद्दिष्ट, (२) सामाजिक मिलाफ, (३) आर्थिक गतिमानता, आणि (४) खंबीर राष्ट्रीय इच्छाशक्तीने प्रेरित झालेली कार्यक्षम लष्करी यंत्रणा.

आमची राष्ट्रीय उद्दिष्टे कोणती आहेत ? : (१) फाळणीमुळे भारत व पाकिस्तान या राज्यांत निर्माण झालेला संघर्ष मिटविणे, आणि (२) एकतर तिबेट पुन्हा आझाद करणे किंवा किमान कैलास, मानससरोवर आणि ब्रह्मपुत्रा यांच्या काठाने उत्तर सीमा पक्की करणे हीच आपली राष्ट्रीय उद्दिष्टे असू शकतात. केवळ लष्करी मार्गाने ही उद्दिष्टे साध्य होणार नाहीत, पण प्रथमत: ही उद्दिष्टे अतिशय स्पष्टपणे आपल्या डोळ्यांसमोर ठेवली तरच त्यांना पोषक अशी परिस्थिती आपण निर्माण करू शकू.

मध्यंतरीच्या काळात आपली अर्थरचना गतिमान करण्याच्या व सामाजिक मिलाफ निर्माण करण्याच्या कार्यास आपण वाहून घेतले पाहिजे. नुसते मोठ्या प्रमाणावर आधुनिक युद्धसाहित्य खरेदी करून काम होणार नाही. त्याचप्रमाणे या उपाययोजना न करता , आपल्या साऱ्या प्रश्नांवर रामबाण उपाय म्हणून ‘ ॲटम बाँब ’चा आश्रय घेणेही आत्मघातकी ठरेल.

राष्ट्रीय भावना व सामाजिक मिलाफ यांच्या अभावी भारत देश परकीय आक्रमणांची शिकार होत आला आहे. आणि आझादीच्या एकोणीस वर्षांत आपल्या संरक्षण योजनेतील हा कच्चा दुवा जसाच्या तसा राहिला आहे. एकीकडे केंद्र सरकार राष्ट्रीय एकात्मतेच्या परिषदा भरवीत आहे तर दुसरीकडे राष्ट्रीय एकजूटीस तडा जाईल असे वर्तन तेच सरकार करीत आहे ! जुनी सामाजिक चौकट नष्ट होईपर्यंत नवा, एकसंघ समाज कसा निर्माण होईल ? सरंजामशाही, नोकर-

ग्रंथालय … प्रा. क्र. १८१५०.
… शाखा (स्थल प्रत)

शाही व धनिक व्यापारी यांचे वर्चस्व प्रथम संपुष्टात आणले पाहिजे. आणि मूठभर उच्च-वर्णीयांचीच या सत्ताधारी वर्गात भरती होत असल्यामुळे, हा सत्ताधारी वर्ग समाजव्यवस्थेच्या शिखरावर आरूढ झाला आहे.

या वर्गाचे वर्चस्व आपल्या लष्करातील अधिकारी वर्गातही प्रतिबिंबित होते. भारताच्या फौजी यंत्रणेवर याचा अनिष्ट परिणाम झाल्याविना राहाणार नाही. मालमत्ता आणि खर्च यांतील समानता आणि शोषित वर्गांना विशेष संधी या तत्त्वांवर भारताचे धोरण आखले गेले तरच सामान्य माणसाच्या देशप्रेमास साद घालता येईल.

## आजची चलती नाणी

समाजवादाच्या गप्पा दिवसरात्र मारल्या गेल्या तरी विषमता कमी होण्या-ऐवजी अलीकडे वाढतच गेली आहे. सार्वजनिक जीवनातही ध्येयवादाची जागा नागड्या स्वार्थाने घेतली आहे. जीवनमूल्ये ढासळल्यामुळे भ्रष्टाचार बोकाळला आहे. धैर्य, त्याग व स्वाभिमान या गुणांची आता कोणालाच चाड उरली नसून भेकडपणा, भपका व खुषमस्करी हीच आजची चलती नाणी बनली आहेत.

सरतेशेवटी अर्थरचनेची गतिमानता व तिचा विकासाचा वेग आणि तिची उत्पादनशक्ती यांच्या भक्कम पायावरच कोणत्याही देशाचीं संरक्षणक्षमता उभी राहू शकते. हा पाया जितका सखोल असेल, त्याच प्रमाणात राष्ट्रीय जबाबदारी पार पाडण्यासाठी संरक्षण-यंत्रणेच्या गरजा भागविल्या जातील.

संरक्षणावरील खर्च वाढत वाढत नऊशे कोटी रुपयांपर्यंत पोचला असला तरी, राष्ट्रीय उत्पन्न व एकूण महसूल लक्षात घेता हा खर्च भरमसाट नाही असे आपल्याला अनेक संरक्षण मंत्र्यांनी समजावले आहे. पण हा केवळ शब्दच्छल आहे; ही केवळ आकड्यांची कसरत आहे. कमकुवत भारतीय जनतेवर किती प्रचंड बोजा पडला आहे या गोष्टीकडे या आकडेवारीचे दुर्लक्षच झाले आहे. निर्णायक महत्त्वाचा माल तयार करणाऱ्या भागाचा व वर्गाचा आर्थिक विकास झपाट्याने करणे निव्वळ तांत्रिक दृष्टयाही महत्त्वाचे ठरते. देशाच्या सुरक्षिततेस असलेला धोका लक्षात घेता, आपल्या नियोजनातील हा अपुरेपणा फारच चिंतास्पद वाटतो.

## शस्त्रास्त्रांसाठी परावलंबी

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध घोषणा देणाऱ्या काँग्रेसी पुढाऱ्यांनी, स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रकुलासंबंधी कोलांटी उडी मारून धोरण साफ बदलले आहे. हेच पुढारी आता हिरीरीने ब्रिटिशधार्जिण्या धोरणाचा सर्वत्र पुरस्कार करतात. परराष्ट्रीय धोरण व संरक्षण योजना, राजकीय व कायदेशीर कल्पना, व्यापार व साहित्य, आर्थिक तत्त्वज्ञान व सांस्कृतिक देवाणघेवाण, भांडवलाची गुंतवणूक आणि शिक्षणाचे व राज्यकारभाराचे माध्यम—या साऱ्याच बाबतींत

भारतात ब्रिटिशांचा प्रभाव फार मोठा आहे.

भारताच्या संरक्षणखात्यात ब्रिटिश प्रभाव क्षणोक्षणी, ठायीठायी जाणवतो. एका लष्करी वार्ताहराने यासंबंधी काही दिवसांपूर्वी लिहिले :

" वेगवेगळे हुकुम देताना वापरल्या जाणाऱ्या फार तर एक हजार हिंदी शब्दांचा अपवाद वगळल्यास, भारतीय फौजांचे शिक्षण व कामकाज इंग्लिश भाषेच्या माध्यमातून चालते. सैनिकी पुस्तकांची अजूनही हिंदीत भाषांतरे झाली नसून बरेचसे साहित्य सरळ इंग्लंडमधून येते. आज वस्तुस्थिती अशी आहे की एक इंग्रजी सोडून इतर परदेशी भाषांशी आपण अपरिचित राहिलो असल्यामुळे इंग्लंड व्यतिरिक्त इतर देशांकडून शस्त्रास्त्रे आणण्यात अडथळे निर्माण होतात.

" भारतीय नौदलातील साऱ्या जहाजांवर ब्रिटिश छाप स्पष्टपणे पडलेली दिसते. भारतीय हवाई दलाची हल्ला करण्याची ताकद ब्रिटन-निर्मितच आहे. आणि भारतीय सेना बराच परदेशी माल विकत घेत असल्या तरी त्यातील अनेक जिनसा ब्रिटनमध्ये बनविलेल्या असतात. शस्त्रास्त्रांची सतत निगा राखावी लागते व ती सतत दुरुस्त करावी लागतात हे लक्षात घेता, भारतीय सैनिकी यंत्रणा ब्रिटिश मदतीवर फार अवलंबून आहे असे निष्कर्ष काढणे चूक ठरणार नाही. "

एका परदेशी सत्तेच्या सद्‌भावनेवर आपले संरक्षण खाते इतक्या लाचारपणे अवलंबून असावे ही गोष्ट साऱ्या देशभक्तांना अस्वस्थ केल्यावाचून रहाणार नाही. विशेषतः ज्या देशास परराष्ट्रीय धोरणात अलिप्ततावादाचा पुरस्कार करावयाचा आहे त्या देशाने स्वावलंबनातून स्वरक्षणाचा मार्ग शोधला पाहिजे; कमीत कमी वेळात हे परावलंबित्व नष्ट केले पाहिजे.

पण खरेच बोलावयाचे झाल्यास या बाबतीत भारताचा इतिहास व भारताची कामगिरी केवळ दयनीय आहे.

सरकारी ( पब्लिक ) व खाजगी ( प्रायव्हेट ) क्षेत्रांतील भारताच्या औद्योगिक विकासासंबंधी अनेक भ्रामक समजुती प्रचलित आहेत. एखाद्या वस्तूचा ८० ते ९० टक्के भाग भारतात बनविला जातो ही शुद्ध थापाथापी आहे. इंजिनियरींग साहित्य व अनुभव आणि तांत्रिक ज्ञान या बाबतीत भारत स्वावलंबी बनत असल्याचे खोटे चित्र त्यामुळे निर्माण होते. सत्य परिस्थिती मात्र अशी आहे की ' महत्त्वाच्या माला'संबंधी परदेशी आयातीवरच आपली सारी भिस्त आहे. सुपरसॉनिक जेट विमाने भारतात बनविण्यासंबंधीची अलीकडची सारी जाहिरातबाजी हे एक बडे थोतांड आहे. भोळसट भारतीय जनतेची साफसाफ फसवणूक आहे.

भारतात ' मानवी ताकदीची कमतरता नसल्यामुळे ', ' छोटी शस्त्रास्त्रे ' आणि ' भलीमोठी सेना ' यांच्या गप्पातून पर्यायी किंवा पूरक संरक्षण योजना तयार होत नाही. ही मानवी ताकद क्रांतिकारी कळकळीने व कल्पनांनी झपाटलेली

नसल्यास व राष्ट्रीय पुनर्रचनेच्या सेनेत तिचे रूपांतर न केल्यास, ती ताकद कुचकामी ठरेल. क्रांतिकारी समाजपरिवर्तनातून क्रांतिकारी कळकळ निर्माण होऊ शकेल व त्यानंतर मात्र निःशस्त्रीकरणासकट अगणित शक्यता निर्माण होतात. पण सद्यः– परिस्थितीच्या संदर्भात 'गनिनी डावपेच' व 'अहिंसक प्रतिकार' या दोन्हीही गोष्टींच्या संघटना निरर्थक बनतात.

आपल्या फौजांना जास्तीत जास्त कार्यक्षम ठेवणे हे सेनानीचे व तंत्रज्ञांचे काम आहे तर जनजागृतीतून क्रांतिकारी ताकद उभी करणे हे राजकीय नेत्यांचे काम आहे.

आधीच दाखविल्याप्रमाणे, भारतीय अंदाजपत्रकातील संरक्षण खर्च झपाट्यान वाढत गेला आहे. याचा भार गरीब जनतेवर पडतो व ही परिस्थिती चिंताजनक आहे. संरक्षणावर एवढा प्रचंड खर्च केल्यावरही संरक्षण संघटनेच्या तयारीविषयी कोणत्याही प्रकारची हमी देता येऊ नये यामुळे परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागल्याचे भय निर्माण होते.

आपल्या फौजांविषयीचा आपला दृष्टिकोण हा मोठा विचित्रच आहे. बेफिकीर व नसती भावनाप्रधानता यांच्या विचित्र मिश्रणातून हा दृष्टिकोण तयार झाला आहे. भारतीय राजकीय नेत्यांचा इतिहास व त्यांची पार्श्वभूमी अहिंसक आणि युद्धाचे वावडे असलेली अशीच आहे. संरक्षण प्रश्नाच्या वस्तुनिष्ठ अभ्यासास ही पार्श्वभूमी पोषक नाहीच पण जाचक ठरते. सक्तीच्या लष्करीकरणाच्या अभावी या दृष्टिकोणात अपराधी जाणीवेची व हळवेपणाची भर पडली आहे. या दृष्टि-कोणामुळे चोखंदळपणा इतका मारला गेला आहे की अनेक प्रश्नांभोवती विनाकारण गुप्ततेचे जाळे पसरवण्यात आले आहे. लोकसभेस व देशास इतकी त्रोटक माहिती पुरविली जाते की आपल्या संरक्षण योजनेची कार्यक्षमता व तिचे अपुरेपण यासंबंधी कोणताही वास्तववादी अंदाज बांधणे अशक्य ठरते. तज्ज्ञांच्या साहाय्याने बनविलेली लोकसभेची स्थायी समितीच आपल्या संरक्षण योजनेतील अकार्यक्षमता व उधळ-पट्टी थांबविण्यात लोकसभेस व भारतीय जनतेस मदत करू शकेल. कायम स्वरूपाची स्थायी-समितीच कागदपत्र मागवू शकेल, साक्षी घेऊ शकेल आणि संरक्षण खात्याच्या कारभाराची छाननी करू शकेल. ९०० कोटी रुपयांच्या संरक्षण अंदाजपत्रकाचा अभ्यास करण्यासाठी लोकसभेत फक्त १० तासांची सर्वसाधारण चर्चा घडविणे ही पद्धत चुकीची आहे. पब्लिक अकाउंटस् कमिटीच्या पाहणीस मृत्यूनंतरच्या चौकशीचे रूप येते. या पाहणीच्या निष्कर्षाचा व शिफारशींचा सरकार वरवर पहाता स्वीकार करते, पण जुन्या चुकांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कायम स्वरूपाचे कोणतेही उपाय योजले जात नाहीत.

संरक्षणविषयक व संरक्षणसंबंधित उद्योगधंद्यांची अवस्था तर केविलवाणी

आहे. त्यांच्या कामकाजाची कोणतीही माहिती लोकांना उपलब्ध नसते आणि त्यामुळे तज्ज्ञांच्या पाहणीपुढे न टिकणारे टोलेजंग दावे केले जातात. इतर शास्त्रां-प्रमाणे लष्करी शास्त्रातील संशोधनही बोगस आहे व या शास्त्रातील भरीव कामगिरी शोधूनही सापडणार नाही. पक्षपात आणि स्थानिक गुणवान माणसांकडे दुर्लक्ष यांच्या तक्रारी नेहमी कानी येतात. सैनिकी संशोधन विभागाच्या फेररचनेची वेळ आता आली असून, यशापयश ठरविण्याचे काही शास्त्रीय माप मानलेच पाहिजे. आपल्या संरक्षणाच्या समस्येची कल्पना येण्यासाठी लोकसभेस आणि जनतेस अधिक माहिती दिली पाहिजे. यासाठी आवश्यक असलेले सर्व बदल करण्याचा संकल्प संयुक्त सोशलिस्ट पार्टी सोडत आहे.

# परराष्ट्र धोरण

अलिप्तता किंवा तटस्थता यांचे तत्त्व हे भारतीय व आफ्रो-आशियाई परराष्ट्रीय धोरणातील प्रमुख सूत्र आहे. तथापि तटस्थतेच्या तत्त्वाचा एकच एक अर्थ लावला जात नसून वेगवेगळे लोक त्याचा वेगवेगळा अर्थ लावतात. अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राने एकोणिसाव्या शतकात अवलंबिलेला एकांतवाद हा झाला तटस्थतेचा एक प्रकार. युरोपमधील राष्ट्रीय व राजघराण्यांच्या झगड्यात आपण पडावयाचे नाही व आपल्या अंतर्गत मतभेदात युरोपला हस्तक्षेप करू द्यावयाचा नाही, ही विचारसरणी अमेरिकन तटस्थतेमागे होती. पूर्वेस ॲटलांटिक महासागर आणि पश्चिमेस पॅसिफिक महासागर या नैसर्गिक तटबंद्यांनी अमेरिकेचे रक्षण आधीच सोपे झाले होते व समृद्ध अमेरिका उभारण्याच्या कार्यात आपण मग्न रहावे अशी त्यांची मनोभावना होती. युरोपियन संस्कृतीचा वारसा ते सोडत होते असा याचा अर्थ नव्हे. आपल्या पूर्वजांच्या देशातील असह्य धार्मिक हटवाद व राजकीय छळ यांच्या विरुद्ध अमेरिकनांची प्रतिक्रिया तीव्र स्वरूपाची होती हाच याचा खरा अर्थ.

वड्या राष्ट्रांतील संघर्षाची झळ आपल्याला लागू नये या भावनेतून राजकीय आघाड्या व संघर्ष यांच्यापासून चार हात दूर रहावे अशा प्रकारची तटस्थता लष्करी दृष्ट्या दुबळी राष्ट्रे आचरणात आणतात. मानवी संस्कृतीच्या विशाल कक्षेबाहेर जाण्याचा हा प्रयत्न नसतो. प्रतिस्पर्धी गटांशी व्यापारी मालाची व विचारांची देवाण-घेवाण चालू असतेच. सत्तेसाठी चाललेल्या आंतरराष्ट्रीय झगड्यापासून ही राष्ट्रे अलिप्त राहू शकतात ते केवळ नशिबाच्या हवाल्यावर किंवा विशिष्ट परंपरेमुळे; त्यांचे संरक्षण एरवी नेहमीच धोक्यात असते. अशा प्रकारच्या तटस्थतेचे उदाहरण म्हणजे स्वित्झर्लंड व काही अंशी स्वीडन. स्वित्झर्लंडच्या तटस्थतेचा मान नाझी जर्मनीने राखला होता आणि आजही कम्युनिस्ट व ॲटलांटिक गट राखत आहेत. पण तरीही अशा तटस्थ स्वित्झर्लंडची संस्कृती व समाजरचना पश्चिम युरोपियन देशांपेक्षा वेगळी नाही. अशा या तटस्थतेचा विचार पारंपरिक सैनिकी संघर्षाच्या संदर्भातच केला पाहिजे.

बडी राष्ट्रे आणि प्रतिस्पर्धी गट यांच्य संघर्षात असेही प्रसंग उद्भवतात की जेव्हा लष्करीदृष्टचा प्रतिस्पर्धी गट समतोल असतात व त्यामुळे पेचप्रसंग निर्माण होतो . ही कोंडी फोडून, ज्या स्फोटक प्रदेशांत प्रतिस्पर्धी गटांचा प्रभाव केंद्रित झाला आहे, अशा किमान प्रदेशातील संघर्ष सौम्य करण्याची आवश्यकता त्यातून निर्माण होते. फ्लँडर्सच्या ऐतिहासिक लढाईमुळे गाजलेल्या फ्रान्स–जर्मनी युद्धात बेल्जमला अशा स्फोटक व धोकादायक प्रदेशाचे रूप आले होते. बेल्जमची तटस्थता बेल्जमच्या जनतेच्या इच्छाआकांक्षांतून निर्माण झाली नव्हती, तर प्रतिस्पर्धी गटातील लष्करी झगडा सौम्य करून तणातण कमी करण्यासाठी बड्या राष्ट्रांच्या मुत्सद्द्यांनी केलेली सोयीस्कर तजवीज होती.

तटस्थतेचा आणखी एक प्रकार म्हणजे दुसऱ्या महायुद्धातील फ्रँकोचा स्पेन व तुर्कस्थान यांचे डावपेच. नव्या आघाड्या उघडण्यास उत्सुक नसलेल्या प्रतिस्पर्धी गटांना या दोन दुबळ्या देशांतील धूर्त मुत्सद्द्यांनी एकमेकांविरुद्ध खेळविले. उभय गटांतील अंतर्गत हेवेदावे आणि उभय गटांच्या लष्करी ताकदीची परिस्थिती यांचा स्पेन-तुर्कस्थानाने भरपूर लाभ उठविला आणि युद्धाच्या झळा आपल्या देशांपर्यंत पोचू दिल्या नाहीत.

कम्युनिस्ट व ॲटलांटिक समाजरचनेतील लष्करी झगड्यातून आता कोंडी निर्माण झाल्यामुळे, दुसऱ्या महायुद्धातील या अपवादात्मक उदाहरणाचा आता रूढ साचा बनला आहे ! युद्धोत्तर काळातील या वैशिष्ट्याचा अर्थबोध होण्यासाठी पुढील तीन मुद्दे नीट समजवून घेतले पाहिजेत : (१) अति संहारक थर्मो-न्युक्लियर अस्त्रे बनविण्याच्या आणि दुनियेतील कोणत्याही ठिकाणी अचूकपणे ही अस्त्रे टाकण्याच्या शास्त्राचा विकास; (२) साम्राज्यशाहीचा अस्त व राष्ट्रवादाचा उठाव या दोन कारणांमुळे आफ्रिका व आशिया खंडांत अनेक सार्वभौम राष्ट्रांचा उदय; (३) प्रतिस्पर्धी गटातील समतोल बिघडण्याची शक्यता असलेले लाओससारख्या स्फोटक प्रदेशांचे अस्तित्व.

नव्याने स्वतंत्र झालेल्या आफ्रो-आशियाई देशांतील जनतेच्या मनात साम्राज्य-वाद पिळवणुकीच्या आठवणी अजून ताज्या आहेत. या जनतेची आर्थिक पिळवणूक पाश्चात्य राष्ट्रे अजूनही करीत आहेत. एकेकाळचे सत्ताधीश व एकेकाळचे गुलाम यांच्या जीवनमानातील दरी सदैव रुंदावत असून या गोष्टीची जाणीव रेडिओ, चित्रपट व वर्तमानपत्रे यांच्या द्वारा त्यांना दररोज करून दिली जात आहे. या गोष्टींमुळे आफ्रो-आशियाई जनतेच्या मनात पाश्चिमात्यांविषयी असलेला सुप्त असंतोष अधिकच भडकवला जात आहे. साहजिकच या आफ्रो-आशियाई देशांतील सत्ताधारी वर्गांना कळून चुकले आहे की सत्तेच्या राजकारणामुळे आपल्याला तटस्थतेचे, अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारावे लागणार. विसाव्या शतकातील

आजच्या जमान्यात प्रातिनिधिक सरकारचा देखावा कायम ठेवावा लागतो, पण जनतेच्या किमान गरजाही सत्ताधाऱ्यांना पुऱ्या करता येत नाहीत. अशा परिस्थितीत आपली सत्ता व आपले विशेष अधिकार टिकविण्यासाठी (आफ्रो-आशियाई देशांतील) या सत्ताधारी वर्गांना आंतरराष्ट्रीय राजकारणात तटस्थतेचे डावपेच खेळावे लागतात. आपल्या देशात सामाजिक परिवर्तन झाल्यास प्रथमतः हे सारे प्रस्थापित हितसंबंध नष्ट होतील याची स्पष्ट जाणीव असल्यामुळे या सत्ताधारी वर्गांना आपल्या देशात सामाजिक परिवर्तन टाळावयाचे असते. अशा सत्ताधारी वर्गास जनतेचा सक्रिय पाठिंबा मिळणे अशक्यच असते आणि अशा परिस्थितीत जागतिक कम्युनिस्ट चळवळीचा डोळा आपल्याकडे वळू नये व आपल्या देशातील कम्युनिस्ट चळवळीचे आकर्षण कमी व्हावे म्हणून आफ्रो-आशियाई देशांतील हे सत्ताधारी वर्ग हेतुपूर्वक बडया राष्ट्रांना एकमेकांविरुद्ध खेळवतात. अशा निव्वळ डावपेचांवर आधारलेल्या तटस्थतेची अनेक रूपे आहेत. अशी तटस्थता कधी विश्वबंधुत्वाचा बुरखा पांघरते, तर कधी नेहरूंच्या भारताप्रमाणे —व काही प्रमाणात नेहरुनंतरच्या भारताप्रमाणे—ही तटस्थता बडया राष्ट्रांच्या संघर्षात प्रामाणिक दलालाची भूमिका बजावते. कधीकधी ही तटस्थता, नासीरच्या इजिप्तसारख्या लढाऊ देशांच्या काही विशिष्ट प्रादेशिक उद्दिष्टचांच्या पूर्ततेसाठी झटते.

### क्रांतिकारक अलिप्तता वेगळीच

निव्वळ डावपेचांवर आधारलेल्या तटस्थतेचे रूप यापैकी कोणतेही असो. आपल्या देशात आर्थिक-सामाजिक क्रांतीसाठी झटणाऱ्या जनतेच्या क्रांतिकारक अलिप्ततावादापेक्षा ती मूलतः वेगळीच आहे. अशी ही क्रांतिकारक अलिप्तता सध्याच्या सर्व समाजपद्धती व त्यांचे संघर्ष निरर्थक असल्याचे जाहीर करते आणि नवसमाजनिर्मितीसाठी सहभागी होण्याचे आवाहन दुनियेतील जनतेस करते. दोस्त राष्ट्रे (अलाइज) आणि केंद्रीय गट (सेंट्रल पॉवर्स) यांच्या १९१७ मधील झगडयाकडे पाहाण्याचा लेनिनचा दृष्टिकोण असाच क्रांतिकारक अलिप्ततेचा होता. रशियातील क्रांतिकारी समाजपरिवर्तनाच्या प्रयोगाच्या भक्कम पायावर आधारलेल्या रशियन परराष्ट्र धोरणाचा जगावर सुरवातीस विलक्षण प्रभाव पडला. भारतीय परराष्ट्र धोरणाचे अधिकृत प्रवक्ते कोणताही दावा करोत, पण भारताला असा प्रभाव कधीच पाडता आला नाही, ही वस्तुस्थिती आहे !

याचे कारणही फारसे शोधावयास लागत नाही. कॉंग्रेसी सरकार हे कधीही क्रांतिकारी सरकार नव्हते व आजही तसे नाही. दुनियेतील कोणत्याही देशापेक्षा भारतातच क्रांतीच्या घोषणा अधिक केल्या जात असतील; पण नित्य वापराने तो शब्दही भारतात निरर्थक व निरुपद्रवी बनविण्यात आला आहे! भारताच्या पंचवार्षिक योजना व सरकारी कार्यक्रम यांना जहाल शब्दांचा साज चढविण्यात आला

असला तरी त्यांना अभिप्रेत असलेल्या समाजवादास वाढत्या खाजगी क्षेत्राबरोबर ( प्रायव्हेट सेक्टर ) गुण्यागोविंदाने नांदायचे आहे आणि आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणासही या समाजवादाचा विरोध नाही. कॉंग्रेसला अभिप्रेत असलेल्या या समाजवादी नियोजनात परदेशी भांडवलास उत्तेजन मिळते व आर्थिक-सामाजिक विषमता वाढत जाते. सरकारी क्षेत्रातील ( पब्लिक सेक्टर ) नोकरशाही, राजकीय पुढारी व मालमत्तादारी वर्ग हे तिन्ही वर्ग भारतीय जनतेची पिळवणूक करण्यासाठी एक झाले आहेत.

स्वतंत्र भारत गेल्या १९ वर्षांत दुनियेस कोणताही सिद्धांत, कोणताही संदेश देऊ शकला नाही. आध्यात्मिक मूल्यांविषयीची भारतीय प्रवचने आता कोणासही फसवू शकत नाहीत. बुद्ध जयंती व गांधी जयंती उत्सवांनीही या ढोंगबाजीवर पांघरूण घालता येत नाही. भारताच्या अधःपतनास आता सीमाच उरलेली नाही. दुनियेस देण्यासारखा भारताचा एकमेव संदेश आम्ही आज विसरलो असलो तरी अगणित अमेरिकन निग्रो, आफ्रिकन्स व काही युरोपियन लोक अणुबाँब व रॉकेट यांच्या जमान्यात गांधीजींच्या सत्याग्रहाच्या शस्त्राचा प्रभाव पाडून दाखवते आहेत !

भारताचे अलिप्ततावादी धोरण संपूर्णपणे चैतन्यशून्य धोरण आहे. वसाहतवादाचा खात्मा करण्यासारख्या मूलभूत प्रश्नावरही रशियाच्या क्रुश्चेवने व त्याच्या वारसदारांनी पुढाकार घेतल्यावरच युनोने या विषयावरील निवेदन मंजूर केले. भारताचा 'समाजवादी' कार्यक्रम किती मिळमिळीत आहे याचे एक उदाहरण म्हणजे केनेडी-जॉन्सन यांनी केलेल्या दक्षिण अमेरिका व इतर देश यांच्या सामाजिक-आर्थिक सुधारणांशी भारत पूर्णपणे सहमत आहे. सरंजामशाहीचे अवशेष नष्ट करणे व सरकारच्या पुराणकालीन पद्धती बदलविणे हेच या सुधारणांचे स्वरूप असून, या सौम्य-शेतकी-आर्थिक व शासकीय सुधारणांनी आर्थिक-सामाजिक चौकटीस कुठेही धक्का बसणार नाही. या सुधारणांत खाजगी मालमत्तेविषयी सुस्पष्ट असे क्रांतिकारी धोरण नाही व याउलट मालमत्तादार वर्गाची समाजरचनेवरील प्रत्यक्ष तात्त्विक पकड बळकट करणारी ही उपाययोजना आहे. दक्षिण अमेरिकेत ही लक्ष्मणरेषा ओलांडण्याचा व परदेशी कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा प्रयत्न एखाद्या देशाने सुरू केला—उदाहरणार्थ क्यूबा—तर लगेच त्या देशाशी मित्रत्वाचे नाते नाहीसे होते.

भारतीय तटस्थतेचा खरा अर्थ केवळ आंधळ्या लोकांनाच दिसणार नाही ! ब्रिटिश राष्ट्रकुलाशी राजकीय गट्टी, स्टर्लिंग गटाचे सभासदत्व, काही विशिष्ट देशांकडून शस्त्रास्त्रखरेदी, एका गटाशी लागेबांधे गुंतलेल्या 'भारत सहाय्य मंडळा'वर आर्थिक मदतीसाठी पराधीन—या चार स्पष्ट गोष्टींवर भारताची

तटस्थता आज आधारित आहे. भारताच्या तटस्थतेचा फारतर एवढाच अर्थ लावता येईल की कोणत्याही लष्करी गटात भारत औपचारिक रित्या सामील झालेला नाही, युनोत आपण कधी रशियन गटाची तर कधी अॅटलांटिक गटाची तळी उचलून धरतो व आजच्या जागतिक संघर्षातील मध्यस्थ व शांतिदूत म्हणून चिरंतन किर्ती मिळवावी असे भारताच्या पुढाऱ्यांना वाटते. पण भारताचा विस्तार व लोकसंख्या इतकी प्रचंड आहे, आपले भौगोलिक स्थान इतके मोक्याचे आहे आणि रशियन-अॅटलांटिक गटांतील संघर्षात आज असा पेचप्रसंग निर्माण झालेला आहे की, डाव-पेचांवर आधारलेल्या या तटस्थतेचा भरघोस फायदा भारतातील सत्ताधारी वर्गास मिळाला. श्री. घनश्यामदास बिर्ला हे आजच्या भारतीय परराष्ट्र धोरणाचे उत्साही समर्थक आहेत ते काही उगाचच नव्हे ! या परिस्थितीशी आता अमेरिकेने व इतरांनीही मिळते-जुळते घेतले असून, भारताची ढासळती अर्थव्यवस्था सावरण्या-इतकी मदत ते आपल्याला देत आहेत. आणि रशियाचा स्नेहभाव संपादन करून तर येथील सत्ताधारी वर्गाने भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे खच्चीकरण केले आहे. भारताची सत्ता प्रतिगाम्यांच्या हातात जाऊ नये म्हणून कॉंग्रेस पक्षातील 'पुरोगामी गटास' नेहमी पाठिंबा दिला पाहिजे असा एक दूरवर फैलावलेला भ्रम भारतीय तटस्थतेने निर्माण केला आहे. या एका भावनेतूनच प्रभावी विरोधाची भूमिका भारतीय कम्युनिस्ट पार्टीने सोडून दिली आणि त्यामुळे दोन परस्परविरोधी गटांत ती दुभंगली गेली.

ही भारतातील विशिष्ट व आगळी परिस्थिती आहे. भारत बडे राष्ट्र बनण्याची शक्यता नेहमीच संभवते. आपली इच्छा असती तर वेगळी भूमिका आपण पार पाडू शकलो असतो. पण नव्याने स्वतंत्र झालेले बहुसंख्य देश दुनियेच्या कारभारात फार मोठी कामगिरी बजावण्याची फारशी आशा बाळगू शकत नाहीत. अशा परिस्थितीत औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या या देशांनी अलिप्ततेचे धोरण का स्वीकारले असावे ?

याची पाच कारणे सांगता येतील. लष्करी करारांपाठोपाठ येणारे परकीय लष्करी नियंत्रण अथवा हस्तक्षेप टाळून, परदेशी मदतीचा फायदा मात्र मिळू शकतो. हे झाले पहिले कारण.

दुसरे कारण म्हणजे एखाद्या बड्या राष्ट्राशी लष्करी करार केल्यावर संरक्षण व्यवस्थेवर बेसुमार व प्रमाणाबाहेर खर्च करावा लागतो आणि परदेशी लष्करी मदतीचे डोस सतत न मिळाल्यास, संरक्षण खर्चाचा हा बोजा अर्थव्यवस्थेस पेलवत नाही. याचा दुसरा परिणाम असा होतो की अंतर्गत व्यवहारात सैन्याचे महत्त्व वाढते व आज ना उद्या लष्करी राजवट प्रस्थापित होऊन नागरी स्वातंत्र्य नष्ट होते. थायलंड कोरिया व पाकिस्तान यांचा अनुभव या बाबतीत जमेस धरता येईल.

आपल्याशी लष्करी करार करणाऱ्या देशाचे मत व पाठिंबा बडी राष्ट्रे गृहीतच धरतात आणि याउलट तटस्थांची मात्र मनधरणी केली जाते. हे झाले तिसरे कारण.

उभय बाजूंकडून जास्तीत जास्त सवलती उपटण्याचे व्यवहारी उद्दिष्ट किंवा विशाल क्रांतिकारक उद्दिष्ट साध्य करण्याचे स्वातंत्र्य तटस्थ देशास मिळत असते, हे चौथे कारण सांगता येईल.

सरतेशेवटी वर दाखविल्याप्रमाणे आपल्या अंतर्गत राजकारणाभोवती एक भिंत बांधून अंतर्गत तणातण कमी करण्याचे व आंतरराष्ट्रीय झगड्यांच्या फेऱ्यात न सापडण्याचे राजकारणही तटस्थ राष्ट्रास खेळता येते.

## तटस्थतेचा आणखी एक पैलू

सध्याच्या लष्करी कोंडीतून तटस्थतेचा आणखी एक पैलू प्रकाशात आला. तटस्थतेच्या कल्पनेची सुरवातीस हेटाळणी करण्यात आली, पण सोव्हिएट व अॅटलांटिक गटांतील स्फोटक संघर्ष मिटविण्याचा एक हुकमी तोडगा म्हणून आता अलिप्ततावादाकडे बघितले जात आहे. कम्युनिस्ट गट आणि साम्राज्यवादी गट यांच्या संघर्षात तटस्थतेस स्थान नाही अशा घोषणा स्टॅलिन व माओ त्से तुंग यांनी फक्त बारा वर्षांपूर्वी एखाद्या धर्मगुरूच्या आवेशात केल्या होत्या. हुकुमशाही आणि स्वातंत्र्य यांच्या या संघर्षात तटस्थ राहणे अनैतिक असल्याची भूमिका अमेरिकेच्या जॉन फॉस्टर डलेसनीही घेतली होती. पण या दोन गटांनी ऑस्ट्रियन शांतता करारावर सह्या केल्या त्या तटस्थतेच्या आधारावरच! त्यानंतर श्री. केनेडी व व श्री. चाउ एन लाय यांच्यांत लाओसला तटस्थ राष्ट्र ठेवण्याबद्दल एकमत झाले तटस्थतेच्या तत्त्वास रशियाची 'ट्राइका' योजना औपचारिक रीत्या मान्यता देते. कोरिया, व्हिएटनाम व अगदी जर्मनी येथील झगड्यांवर अशाच धर्तीचा तोडगा निघेल हे सांगण्यासाठी आता त्यांची कुंडली मांडण्याची आवश्यकता नाही.

आंतरराष्ट्रीय राजकारणात पदार्पण करताना हा तोडगा भारताला प्रभावीपणे सुचविता आला असता. पण जगाच्या व्यासपीठावर अशी सर्जनशील भूमिक घेण्यात भारत अपयशी ठरला ही घटना दुर्दैवी आहे. श्री. क्रुश्चेव व आणि त्यांचे वारसदार जगाच्या रंगमंचावर नवी धोरणे धैर्याने मांडू शकतात—तर मग, गुलाम जनतेस मतदानाचा हक्क देणे, व्हेटो नष्ट करून आंतरराष्ट्रीय जातिव्यवस्थेचे उच्चाटन करणे, प्रमाणबद्ध प्रतिनिधित्वाच्या तत्त्वावर विश्व-लोकसभेसाठी प्रत्यक्ष निवडणुका घेणे अशा उपाययोजनांतून युनोची क्रांतिकारी फेररचना करण्याची मागणी भारत का करत नाही?

पण तटस्थतेची ही गतिमान कल्पना आणि छोट्या देशांची निष्क्रिय तटस्थता काय किंवा नेहरूंच्या भारताची (व नेहरूनंतरच्या भारताचीही) डावपेचांवर

आधारलेली तटस्थता मूलत: वेगवेगळी आहे. राष्ट्रीय उद्दिष्टे व इतिहासात देशाची भूमिका व देशाचे स्थान यांसारख्या प्रश्नांकडे बघण्याच्या वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून हे वेगळेपण जन्मले आहे. स्वतंत्र भारताला आपले मन व आपली भूमिका अद्याप समजलेली नाही. एकाच माणसाने चिंतन करण्याची जी सवय नेहरूयुगात जडली तिच्यात समाधान मानण्याची प्रवृत्ती टिकेपर्यंत भारतास आपल्या मनाचा थांगपत्ता लागणार नाही.

राष्ट्रीय हित किंवा दुनियेचे हित साधण्याच्या विशाल ऐतिहासिक दृष्टीतूनच भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा परिणामकारकपणा मोजला पाहिजे.

आणि या दृष्टीतून गेल्या २० वर्षांतील भारतीय परराष्ट्र धोरणाचे मूल्यमापन करू लागल्यास त्याची व्यर्थता सहजच दृष्टोत्पत्तीस येते.

या धोरणाने भारताच्या रक्षणाचा प्रश्न सुटला नाही किंवा तिबेट, नेपाळ, भूतान, सिक्कीम व उत्तर सीमेवरील प्रदेश यांच्या लोकशाहीची व स्वातंत्र्याची समस्या सुटली नाही. फिजी, गिनी, मॉरिशस, पूर्व आफ्रिका, सिलोन आदी प्रदेशांतील भारतीयांच्या हितसंबंधांचे रक्षणही या धोरणामुळे झालेले दिसत नाही.

१९४९ नंतरच्या गेल्या अठरा वर्षांत , काँग्रेसी अंमलाखालील भारताने जागतिक महत्त्वाच्या एकाही प्रश्नास आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर वाचा फोडली नाही—मग तो प्रश्न जागतिक स्वातंत्र्याचा असो किंवा विश्वव्यापी भुकेचा असो; सधन व गरीब देशातील वाढत्या विषमतेचा असो किंवा अणुशक्तीच्या मक्तेदारीचा असो; किंवा यूनोच्या सुरक्षा समितीतील कायमच्या व बदलत्या सदस्यत्वाचा प्रश्न असो ! भारताच्या अलिप्ततावादी धोरणास, वागणूकीस व विश्लेषणास एका निरर्थक फॉर्म्युल्याचे स्वरूप असून, त्यास रचनात्मक असे अंगच नाही. भारत–चीन संघर्षात आफ्रो-आशियाई राष्ट्रांनी आपला कित्ता गिरवून हाच फॉर्म्युला बिनदिक्कत वापरला !

भारताच्या परराष्ट्रीय धोरणातील सारी गतिमानता नाहीशी होण्याची तीन कारणे सांगता येतील: एकतर परदेशी सत्तांवर आपण वाढत्या प्रमाणात अवलंबून राहू लागलो आहोत. दुसरे म्हणजे एका बोगस विश्वबंधुत्वाच्या नावाखाली एका परदेशी भाषेचा शिक्षणाचे व राज्य कारभाराचे माध्यम म्हणून अजूनही वापर केला जात आहे. आणि आपल्या गुलामगिरीची साक्ष देणारे परकीयांचे पुतळे, आज सरकार सार्वजनिक स्थानातून हलवीत नाही. यामागील हेतू इंग्लंडला न दुखवण्याचाच आहे.

ही पराधिनता व हा भ्याडपणा—यांच्यामुळेच भारताला अल्जेरियन व केनियन स्वातंत्र्यलढ्याचा निर्भयपणे पुरस्कार करता आला नाही.

आज आफ्रो–आशियाई देशांत गांधीजींच्या भारताकडे क्रांतिदूत म्हणन

कोणीच पहात नाही; तो मान चीनने केव्हाच पटकाविला आहे. भारताने चीन-कडून पत्करलेला मानहानीकारक पराभव आणि त्यानंतर चालविलेले आक्रमक चीनचे लांगूलचालन या गोष्टींमुळे तर आपण दुनियेच्या तुच्छतेचा विषय बनलो आहोत.

काँग्रेस सरकार सदैव अहिंसा व नैतिक मूल्ये यांच जप करत असते. परंतु एका बाजूने एकतर्फी निःशस्त्रीकरणाचा प्रयोग करण्यातील नाखुषी व दुसऱ्या बाजूने प्रत्यक्ष आचरणात मात्र शस्त्रास्त्रांचा वापर– या दुटप्पी धोरणामुळे जगाच्या नजरेत काँग्रेस सरकार ढोंगी ठरले आहे.

राजनैतिक मान्यतेच्या प्रश्नाचाही काँग्रेस सरकारने विचका उडविला आहे. अशा मान्यतेत सैद्धांतिक बंधुभावाचा किंवा तत्त्वमान्यतेचा प्रश्नच उद्भवत नसतो, तर विशिष्ट भूभागावरील परिणामकारक नियंत्रणावरही मान्यता अवलंबून असते. पण जर्मनी व चीन या देशांना ही कसोटी लावण्यास सरकार कच खाते. आपल्यावर पश्चिम जर्मनी नाराज होऊ नये आणि चिनी क्रांतीचा पुरोगामी दोस्त असल्याचे सिद्ध करता यावे या भावनेतूनच ही विसंगती निर्माण झाली. पूर्व जर्मनी आणि फोर्मोसन चीन या दोन्हीही देशांना राजनैतिक मान्यता देणे सुसंगत ठरले असते.

चिनी आक्रमणाविषयीही भारत सरकारचे धोरण अस्पष्ट व कचखाऊ आहे. भारताच्या भूप्रदेशावर पाणी सोडण्याचा व तडजोडीचा घसरता रस्ता भारताने पकडला. स्वाभिमान व प्रतिष्ठा यांच्या गप्पा मारणाऱ्या काँग्रेसने प्रत्यक्षात मात्र भारतीय भूमी बळकविणाऱ्या चीनशी राजनैतिक संबंध तोडण्यास नकार दिला. चिनी स्वातंत्र्यदिनी शुभेच्छा संदेशांची देवाणघेवाण करून व भारतावर आजही आक्रमण करणाऱ्या चीनच्या यूनो सदस्यत्वास पाठिंबा देऊन, या सरकारने स्वाभिमानशून्यतेचा कळस गाठला.

चीन व पाकिस्तान यांनी बळकाविलेली आपली भूमी परत मिळविण्याचा काँग्रेस सरकारचा निर्धार, काँग्रेस पक्षाच्या जाहीरनाम्यास आता जोडण्यात आला आहे. पण ही घोषणा ढोंगी आहे; काँग्रेसच्या दुटप्पीपणाचे असे उदाहरण शोधूनही सापडणार नाही. गेल्या वर्षी भारतीय फौजांनी पाकव्याप्त काश्मिरमधील काही भाग मुक्त केला. हा प्रदेश भारताचा अविभाज्य भाग असल्याचे काँग्रेस पार्टीने सकाळ-संध्याकाळ जाहीर केले, आणि भारत साऱ्या जगात एकाकी पडला तरीही उरीपूंच, हाजीपीर, कारगिल व टिथवाल येथून आम्ही माघार घेणार नाही असे कळकळीचे आश्वासन तेव्हाचे पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांनीही दिले होते. अशा परिस्थितीत काँग्रेस सरकार ताश्कंद निवेदनास मान्यता कशी देऊ शकले? जी भूमी काँग्रेस सरकारही आपली मानते तिचा त्याग करण्यास ते कसे तयार झाले? पण हा दुटप्पीपणा एवढ्यावर थांबला नाही. सियालकोट विभागातील सद्दरह

अतिशय स्पष्टपणे आखलेली असून तिच्यासंबंधी कोणताही वाद नाही. अशा या सियालकोट विभागातील एक छोटासा तुकडा सरळ पाकिस्तानला भेट देण्यात आला !

भारताच्या क्षेत्रफळासंबंधी 'सर्व्हे ऑफ इंडिया' ने प्रकाशित केलेली आकडेवारी आणि भारताने यूनोस सादर केलेली आकडेवारी यांत आश्चर्यकारक तफावत आढळते. परदेशी आक्रमणामुळे भारताने किती प्रदेश गमाविला याची कल्पना या आकडेवारीवरून येते. भारताचे अखंडत्व टिकविण्याच्या आपल्या आद्यकर्तव्यातील काँग्रेस सरकारचे अपयश अक्षम्य आहे.

काँग्रेस सरकारने भारत-पाक संबंध बिघडू दिले आहेत व त्याचबरोबर पाकिस्तानातील अल्पसंख्यांकांची दुःखे हलकी करण्याची तजवीज केली नाही. एकमेकांच्या परराष्ट्रीय धोरणास शह-काटशह देत बसण्याचा हा खेळ थांबविण्यासाठी, संरक्षण योजना परस्परपूरक बनविण्यासाठी व व्यापक एकजुटीच्या पायावर काश्मिर-प्रश्नाचा गुंता सोडविण्यासाठी भारत-पाक महासंघराज्याची कल्पनाही या सरकारने पाकिस्तानपुढे ठेवली नाही.

पाकिस्तानसंबंधी परस्परविरोधी धोरणे चालविण्याचा विचित्र प्रकारही काँग्रेसने अनेकदा केला आहे. बंधुभावाची निवेदने व करार करून भारत-पाक संबंधात मित्रत्वाचे पर्व सुरू झाल्याच्या घोषणापाठोपाठ पाकिस्तानी आगळिकांचा धिक्कार त्याच तोंडाने सुरू होतो. मर्यादित स्वरूपाच्या तडजोडीनंतर तणातण वाढावी, सरहद्दीवरील गोळीबार व्हावा, पंचमस्तंभी कारवायांचे आरोप-प्रत्यारोप सुरू व्हावेत, व्यापारी संबंध बिघडावेत आणि या दोन राज्यांतील दळणवळण थांबावे या गोष्टी अटळपणे घडत रहातात. नेहरू-लियाकत करार, नेहरू-नून करार, पाणीवाटपाचा करार, कच्छ करार, आणि ताश्कंद निवेदन यांचा निष्कर्ष स्पष्ट आहे. भारत-पाक संबंधांना असे भागशः उत्तर सापडणार नाही. एकतर हे संबंध अधिक बिघडतील किंवा १९४७ ची फाळणी रद्द करण्याच्या भूमिकेतून या साऱ्याच छोटयामोठया तंटयांना एका फटक्यात निकालात काढता येईल.

भूतान, सिक्कीम आदी सरहद्दीवरील प्रदेशांत काँग्रेसने लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण केले आहेत. आणि दडपशाही समाजरचनेतील जनतेचा छळ तसाच चालू दिला आहे.

लोकशाहीकरण व सामर्थ्यशाली जनता या दोन गोष्टींच्या पायावरच, चिनी कुरापती व चिनी आक्रमण यांपासून या प्रदेशाचे रक्षण करता येईल.

गतिहीन अर्थव्यवस्था आणि औद्योगिक-शास्त्रीय मागासलेपणा यांतून भारतीय परराष्ट्रीय धोरणातील प्रमुख उणीवा निर्माण होतात.

संयुक्त सोशलिस्ट पार्टी देशाच्या धोरणात मूलभूत बदल घडवून आणील व

त्यासाठी प्रथम कृषी-औद्योगिक विकासाचा भक्कम पाया बांधेल. सक्तीचे लष्करी शिक्षण व विशिष्ट वयातील तरुणांसाठी लष्करभरती यांच्या योजना संसोपा टप्प्याटप्प्याने हाती घेईल आणि जातीवार फलटणी व जातीवार मुदपाकखाने रद्द करून सामाजिक मिलाफ निर्माण करील.

आत्ताच ॲटम बाँब तयार करण्याच्या; किंवा रशियाच्या वा अमेरिकेच्या ( अथवा उभयतांच्या ) संरक्षक अणु-छत्राचा आश्रय घेण्याचा प्रयत्न करण्याच्या फालतू गप्पांकडे देशाचे लक्ष वेधण्याचा खटाटोप संसोपा करणार नाही. त्याऐवजी सामाजिक–आर्थिक क्रांतीच्या व चीनविषयी खंबीर धोरण स्वीकारण्याच्या आपल्या भूमिका संसोपा जोमदारपणे चालवील.

केवळ निःशस्त्रीकरणाच्या वाटाघाटींसाठीच नव्हे तर जगातील दारिद्र्य नष्ट करण्याचा संयुक्त प्रयत्न करण्यासाठी, अमेरिका व रशिया या दोन बड्या राष्ट्रांना एकमेकांजवळ आणण्याची संसोपाची धडपड असेल.

जनतेच्या पातळीवर, संयुक्त सोशलिस्ट पार्टी मुख्यत्वेकरून युरोपातील व विशेषत: आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका येथील साऱ्या सोशलिस्ट पार्टी, पुरोगामी गट व कामगार संघटना यांच्याशी मित्रत्वाचे संबंध जोडेल आणि चिनी कम्युनिस्ट पार्टीचा अपवाद वगळून इतर सर्व कम्युनिस्ट पार्टींना साद घालून पाहील.

अलिप्ततावादाचे तत्त्व सरकारांपुरते मर्यादित असावे असे संयुक्त सोशलिस्ट पार्टीस वाटते. आपल्या साऱ्या कारभारात हस्तक्षेप करण्यास मानवाने शिकले पाहिजे. प्रवास व रोजगारीचा हक्क प्रत्येक मानवास आहे. आपल्या व्यक्तित्वाचा विकास आपल्या आवडत्या ठिकाणी व आपल्या आवडत्या क्षेत्रात करून घेण्याची संधी प्रत्येकाला असली पाहिजे.

क्रमांक ७५८२८ विः निबंध
२९२२ २।३।६७

मुद्रक : वि. ग. माटे, विश्वकर्मा मुद्रणालय प्रा. लि. ४०५ नारायण पेठ, पुणें २.
प्रकाशक : ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४ (W. B.)

मूल्य एक रुपया

१८१६०

REFBK-0018170

REFBK-0018170